पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

शनिवार, दि. २१ डिसेंबर, २०२४ | वर्ष : १२ | अंक : ३४२ | पाने ८ | किंमत २ रुपये

www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com



आतील पानात...

३ विधानसभा निवडणुकीनंतर शिरुर तालुक्यात अवैध धंद्याचा सुळसुळाट

४ सोलर पंप मिळेपर्यंत वीज जोड द्या

५ मैदानी खेळाला व शिक्षणाला अधिक महत्त्व द्या





पान ८ वर..


# राज्य मंत्रिमंडळ खातेवाटपाची प्रतिक्षा; मलईदार खात्यांसाठी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीत चूरस

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीला अभूतपूर्व यश मिळाले. त्यानंतर बहुमत मिळालेल्या महायुतीने सत्तास्थापनेचा दावा केल्यानंतर ५ डिसेंबरला देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची तर एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

त्यानंतर मंत्रिमंडळ विस्तार १० ते १२ दिवस रखडला होता. त्यानंतर १५ डिसेंबरला ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली. खातेवाटपाबाबत महायुतीमधील घटक पक्षांत जोरदार रस्सीखेच पहावयास मिळत आहे. त्यामुळे गेल्या पाच दिवसांपासून खातेवाटप रखडले आहे. महायुतीमधील तीन पक्षातील चुरस पाहता अधिवेशन संपल्यानंतरच राज्य मंत्रिमंडळाच्या खातेवाटपाला मुहूर्त लागण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे उत्सुकता शिगेला पोहचली आहे.

आता निकाल लागून जवळपास २७ दिवसांचा कालावधी झाला तरी मंत्र्यांकडे अद्याप खातेनिहाय कारभार आलेला दिसत नाही. विशेषतः भाजप व शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात सुरवातीपासूनच या ना त्या पदावरून चुरस आहे. त्यामुळे येत्या काळात मंत्रिमंडळाचे खातेवाटप करीत असताना सर्वच घटक पक्षांचे समाधान करण्यासाठी महायुतीच्या नेत्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

मलईदार खात्यासाठी असलेल्या अनेक



इच्छुकांचे महायुती समाधान कसे करणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सुरुवातीच्या काळात विस्तार कोणत्या पक्षाला किती मंत्रीपदे दिली जाणार यावरून रखडला होता. त्यावरून महायुतीमधील भाजप, शिवसेना शिंदे गट, अजित पवार गट यांच्यात रस्सीखेच पाहावयास मिळाली. त्यानंतर महायुतीमधील तीन पक्षांचा फॉर्म्युला ठरला. विस्तारामध्ये इच्छुकांची संख्या लक्षात घेऊन मंत्रिपद देत असताना सर्वांचे समाधान करण्यासाठी नेतेमंडळींना तारेवरची कसरत करावी लागली. दरम्यान, मंत्रिमंडळाचे खातेवाटप अंतिम होण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी बैठक करून खातेवाटपाबाबत अंतिम तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. महायुतीमधील भाजप, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट चांगली खाती मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. एकनाथ शिंदे यांनी महायुती सरकारच्या शपथविधीपूर्वी गृहमंत्रीपदाची मागणी केली होती, मात्र, भाजपने त्याला नकार दिला होता. मात्र, शिवसेनेने गृहमंत्रिपदाची मागणी लावून धरली आहे. त्यामुळे शिवसेनेला गृहमंत्रीपद मिळणार की नाही, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. महायुती सरकारमध्ये शिवसेनेच्या वाट्याला १२ मंत्रिपदे आली आहेत. भाजपकडून गृहखात्याऐवजी महसूल खाते शिवसेनेसाठी सोडले जाईल, अशीही चर्चा आहे. त्यामुळे आता यावर काय तोडगा काढला जाणार याची उत्सुकता लागली आहे. त्यातच दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसकडे अर्थखाते राहणार की त्या बदल्यात अन्य खाते दिले जाणार याची उत्सुकता लागली आहे.

## संक्षिप्त

### आ. रोहित पाटलांनी घेतली अजितदादांची भेट

**जनप्रवास । प्रतिनिधी**

नागपूर : दोन दिवसापूर्वी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार शशीकांत शिंदे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली होती. आता दुसऱ्याच दिवशी तासगाव कवठेमहांकाळचे आमदार रोहित पाटील अजित पवार यांची भेट घेतली. यामुळे आता राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरू आहेत. गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार पटेल, खासदार सुनिल तटकरे यांनी खासदार शरद पवार यांची दिल्लीत भेट घेतली होती. यावेळी खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या, ही भेट शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त होती, असे बोलले जात आहे, तर दुसरीकडे ही भेट राजकीय असल्याची चर्चा सुरू आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी आमदार अमोल मिटकरी यांनी आमदार जयंत पाटील सत्तेत येणार असल्याचा गौप्यस्फोट केला होता. दरम्यान, आमदार रोहित पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. या भेटीआधी त्यांनी माध्यमांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी ही भेट मतदारसंघातील विकास कामासंदर्भात असल्याचे सांगितले होते. रोहित पाटील म्हणाले, मी पत्र देण्यासाठी आलो आहे. मी विधिमंडळात मतदारसंघातील कामाबाबत पत्र देण्याचा प्रयत्न केला. दादा बोलले इथं योग्य दिसत नाही.

### दोन वाहनांची धडक पाचजणांचा मृत्यू

**जनप्रवास । वृत्तसंस्था**

जयपूर : जयपूरमध्ये एलपीजी आणि सीएनजी ट्रकमध्ये भीषण धडक झाली. या धडकेत दोन्ही वाहनांना आग लागली . या अपघातामध्ये ५ जणांचा मृत्यू झाला . पोलिस आणि स्थानिक प्रशासनाने मदतीसाठी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या २० हून अधिक गाड्यांनी घटनास्थळी आगीवर नियंत्रण मिळविले. दरम्यान, सुरक्षेसाठी जवळचा रस्ता वळवण्यात आला होता. या अपघातात १२ ते १५ जण भाजल्याने गंभीर जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी सवाई मानसिंग रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. भानक्रोटा परिसरातील एका खासगी शाळेजवळ हा अपघात झाला. अपघातानंतर मुख्यमंत्री भजनलाल शर्मा हे एसएमएस हॉस्पिटलच्या इमर्जन्सी वॉर्डमध्ये जखमींना पाहण्यासाठी गेले . या अपघाताबाबत जयपूरचे डीएम जितेंद्र सोनी म्हणाले, 'सुमारे ४० गाड्या आगीत जळून खाक झाल्या आहेत. अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. मदतकार्य सुरू आहे. आग आटोक्यात आली असून आता फक्त १-२ वाहने उरली आहेत. या घटनेत सुमारे २३-२४ जण जखमी झाले आहेत.

## सायबर चोरांचा सुळसुळाट; चौघांना ४२ लाखांचा गंडा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : शेअर मार्केटमधील गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याचे प्रलोभन दाखवत सायबर चोरट्यांनी चौघांना ४२ लाख ६१ हजार रुपयांचा आर्थिक गंडा घातला आहे. याप्रकरणी, स्थानिक पोलिस ठाण्यात सायबर चोरट्यांच्या विरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, मागील काही दिवसापासून शहरात सायबर चोरट्यांनी नागरिकांना आपल्या जाळ्यात खेचून कोट्यावधींची आर्थिक फसवणूक केली आहे. नागरिक देखील प्रलोभनाला बळी पडून आपली जमा-पुंजी त्यांच्या हवाली करत आहेत. कोथरूड येथील ५८ वर्षीय व्यक्तीला सायबर ठगांनी १८ लाखाचा गंडा घातला आहे. शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक केल्यावर त्यांना चांगला परतावा देण्याचे बहाण्याने ही फसवणूक करण्यात आली आहे. दुसऱ्या घटनेत पौड रोड कोथरूड येथील ४३ वर्षीय महिलेची देखील अशाच प्रकारे फसवणूक करण्यात आली आहे. महिलेला शेअर ट्रेडिंगमध्ये नफा मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवत १० लाख १५ हजार रुपये घेतले. याप्रकरणी कोथरूड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तिसऱ्या घटनेत टिंगरे नगर येथील ५४ वर्षीय व्यक्तीची शेअर मार्केटमधील गुंतवणुकीच्या आमिषाने ९ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केली आहे. विश्रांतवाडी पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच चौथ्या प्रकरणात वडगावशेरी येथील २७ वर्षीय व्यक्तीला ट्रेडिंगचे वेगवेगळे टास्क देऊन ४ लाख ५६ हजार ८०० रुपयांचा गंडा घातला आहे. चंदननगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## ताम्हिणी घाटात वऱ्हाडाची बस दरीत कोसळली; ५ जण ठार

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : पुण्यातील ताम्हीणी घाटात वऱ्हाडी बसचा मोठा अपघात झालाय. या अपघातामध्ये पाच जणांचा जागीच मृत्यू झाला असून २७ जण जखमी आहेत. पुण्याहून महाडला जाणाऱ्या या बसचा ताम्हिणी घाटात अपघात झाला. ताम्हिणी घाटात वॉटरफॉल पॉईंटजवळ हा भीषण अपघात झाला असल्याची माहिती मिळत आहे. आज (२० डिसेंबर) रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास पुणे दिघी महामार्गावर ताम्हिणी घाटात असणाऱ्या मौजे कोंडेथर गावच्या हद्दीत अपघात झाला. अपघातामध्ये बस पलटी झालीये.



याबाबत मिळालेली माहिती अशी की, पुण्यातून महाड येथील बिरवाडीकडे लग्नासाठी निघालेली खाजगी बस क्र. एम एच १४ जी यु ३४०५ ही पुण्याहून माणगांवकडे येत असताना ताम्हिणी घाटात अवघड वळणावर आल्यानंतर रस्त्याच्या बाजूला पलटी झाली. हा अपघात इतका जास्त भंयकर होता की, पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच माणगांव पोलीस तातडीने घटनास्थळ गाठले. या घटनेमुळे एक खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ताम्हिणी घाटात हा बस अपघात सकाळी दहाच्या आसपास झालाय. माणगाव पोलीस स्टेशन हद्दीत ताम्हीणी घाटात ट्रॅव्हल्सची खाजगी बस पलटी होऊन अपघात झाला आहे. जाधव कुटुंबीय लोहगाव पुणे येथून बिरवाडी महाड येथे लग्न समारंभास जात होते. यादरम्यान ताम्हीणी घाटातील धोकादायक वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने सदर बस पलटी झाली आहे. यामध्ये दोन पुरुष व ३ महिला अशा एकूण ५ जणांचा मृत्यू झाला आहे. २७ जखमी लोकांना बाहेर काढून माणगाव ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. मयताची नावे पुढीलप्रमाणे संगीता धनंजय जाधव, गौरव अशोक दराडे, शिल्पा प्रदिप पवार, वंदना जाधव आणि अनोळखी पुरुष अजुन नांव निश्चित नाही, अशी माहिती सोमनाथ घरगे, पोलिस अधीक्षक रायगड यांनी दिली आहे.

## स्टेरॉईड इंजेक्शनची बेकायदेशीर विक्री; दोन जणांवर गुन्हा दाखल

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : शहरातील विविध व्यायामशाळांमध्ये ( जिम) व्यायाम करणाऱ्या तरुणांना शरीरयष्टी चांगल्याप्रकारे व्हावी या उद्देशाने स्टेरॉईड इंजेक्शन मेफेटर्मिन सल्फेट इंजेक्शन बेकायदेशीररित्या विक्री केल्याप्रकरणी दोन जणांवर शिवाजीनगर पोलिसांनी कारवाई केली आहे. याप्रकरणी आरोपींवर गुन्हा देखील दाखल करण्यात आला असून आरोपींच्या ताब्यातून पाच हजार रुपयांचे बेकायदेशीर १४ स्टेरॉईड इंजेक्शन जप्त करण्यात आली आहे.


शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांनी ही माहिती दिली. या प्रकरणात दीपक बाबुराव वाडेकर ( वय ३२, रा.खडकी) आणि साजन अण्णा जाधव (वय २५, रा. औंध) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस हवालदार तेजस रमेश चोपडे यांनी तक्रार दाखल केलेली आहे. संबंधित आरोपी हे नरवीर तानाजी वाडी येथील इराणी वस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका मोटारीमध्ये बेकायदेशीर स्टेरॉईड इंजेक्शन घेऊन थांबले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. संबंधित इंजेक्शन त्यांनी कोठून आणले, ते कोणाला विक्री करणार होते, त्यांचे अन्य साथीदार कोण आहेत याबाबत तपास सुरु आहे.

## पुण्यात थंडीचा कडाका कमी; तापमान ८ अंशावरून थेट १२ वर

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : गेल्या आठवड्यापासून पुणेकरांना थंडीने गारठून टाकले होते. पण शुक्रवारपासून (दि.२०) किमान तापमानात वाढ झाल्याने थंडीचा कडाका कमी झाला आहे. गुरूवारी किमान तापमानाचा पारा ८ अंशावर होता, तो शुक्रवारी थेट १२ अंशावर पोचला. त्यामुळे पुणेकरांना थंडीपासून काहीसा दिलासा मिळाला.

उत्तरेकडील थंड व कोरड्या वाऱ्यांचे प्रवाह महाराष्ट्राकडे झेपावत आहेत. त्यामुळे राज्यामध्ये थंडी जाणवत आहे. राज्यातील काही भागात थंडीची लाट अजून कायम आहे. काही भागातील तापमानाचा पारा १० अंशांच्या खाली असल्याने हुडहुडी भरत आहे. येत्या दोन दिवसांमध्ये राज्यात थंडी कायम राहणार असली तरी किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. दरम्यान, नैर्ऋत्य बंगालच्या उपसागरात ठळक कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय आहे. ही प्रणाली शुक्रवारी (दि. २०) उत्तर तमिळनाडू दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनाऱ्याला



धडकून जमिनीवर येण्याचे संकेत आहेत. पुण्यात शिवाजीनगरला शुक्रवारी १२.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर सर्वात कमी तापमान असणाऱ्या एनडीए भागात ११.५ अंशावर पारा नोंदवला गेला.

पुढील पाच दिवस म्हणजे मंगळवार दि.२४ डिसेंबरपर्यंत महाराष्ट्रात थंडीची लाट ओसरणार आहे. त्याला सुरवात झाली. किमान तापमानात वाढ होऊन उबदारपणा जाणवू शकतो. पुन्हा वर्षअखेर व नववर्षातील ३० डिसेंबरपासून थंडीत वाढ होण्याची शक्यता आहे. - माणिकराव खुळे, सेवानिवृत्त हवामानतज्ज्ञ यांनी सांगितले.

## तीन घरफोड्यांत साडेसहा लाखाचा ऐवज चोरीला

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : शहरातील नाना पेठ, सॅलिसबरी पार्क आणि धायरी परिसरातील लॉन्ड्री दुकान आणि दोन सदनिका फोडून साडेसहा लाख रुपयांचा ऐवज चोरी गेला आहे. याप्रकरणी, स्थानिक पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. नाना पेठेतील सुनील सोनटक्के यांच्या लॉन्ड्रीच्या दुकानाचे शटर उचकटून चोरट्यांनी सात हजार रुपयांची गल्ल्यातील रोकड चोरी केली. हा प्रकार बुधवारी (१८ डिसेंबर) रोजी घडला आहे.

तर दुसरी घरफोडीची घटना सॅलिसबरी पार्क परिसरात घडली आहे. याबाबत शीला सुशील जैन (वय ५७) यांनी फिर्याद दिली आहे. ही घटना बुधवारी (१८ डिसेंबर) दुपारी दीड ते अडीच वाजताच्या दरम्यान घडली. चोरट्यांनी जैन यांच्या सदिकेतून ४ लाख ६२ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरले. फिर्यादी जैन यांची सदनिका कुलूप लावून बंद असताना, चोरट्यांनी बनावट किल्लीने कुलूप उघडून आत प्रवेश केला. त्यानंतर सोन्याचे दागिने चोरी करून पळ काढळा. पोलीस उपनिरीक्षक कस्पटे पुढील तपास करीत आहेत. तिसऱ्या घटनेत धायरी येथील बेनकर वस्ती परिसरातील गणेश भिकु कदम (वय ४९) यांच्या सदनिकेतून चोरट्यांनी १ लाख ८१ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून पोबारा केला. हा प्रकार १७ ते १९ डिसेंबर या कालावधीत घडला आहे.

## पुणे विमानतळाला 'जगद्गुरु संत तुकाराम महाराज' यांचे नाव देण्याचा ठराव मंजूर

### केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पाठपुराव्याला यश

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : विमानतळाला 'जगद्गुरु संत तुकाराम महाराज' यांचे नाव देण्याचा ठराव विधिमंडळात मंजूर करण्यात आला आहे. पुण्याचे खासदार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी नामकरणासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्याची मागणी करणारा ठराव महाराष्ट्र विधानसभेने गुरुवारी एकमताने मंजूर केला. सध्या या सुविधेला लोहगाव विमानतळ असे संबोधले जाते. पुढील





कार्यवाहीसाठी हा ठराव नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडे पाठवला जाईल.

विमानतळाला संत तुकाराम यांचे नाव देण्याचा निर्णय १७ व्या शतकातील आदरणीय संत आणि कवी यांना श्रद्धांजली दर्शवतो. ज्यांना भगवान विठ्ठलाची भक्ती आणि भक्ती चळवळीतील त्यांच्या योगदानासाठी ओळखले जाते. संत तुकारामांची शिकवण आणि अभंग लाखो लोकांना प्रेरणा देत आहेत. ज्यामुळे ही वाटचाल सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरेला होकार देते.

या विकासादरम्यान, पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ ने आपल्या नवीन एकात्मिक टर्मिनल बिल्डिंग च्या तळघरात दोन प्रगत इनलाइन बॅगेज स्क्रीनिंग सिस्टीम स्थापित करून प्रवाशांची सुविधा वाढवण्यात लक्षणीय प्रगती केली आहे. या अत्याधुनिक प्रणाली १,२०० ते १,४०० बॅग प्रति तास प्रक्रिया करू शकतात, प्री-बार्केशनसाठी सुरक्षा तपासण्या सुलभ करतात.

पुणे विमानतळाचे नाव बदलणे आणि चालू असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे आधुनिक विमानचालन मानकांमध्ये प्रगती करताना त्याच्या वारशाचा सन्मान करण्याची शहराची बांधिलकी अधोरेखित होते . जगद्गुरू संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ हे प्रस्तावित नाव केवळ एका ऐतिहासिक व्यक्तीला आदरांजली वाहणारेच नाही तर परंपरेला प्रगतीशी जोडणारे शहर म्हणूनही पुण्याचे स्थान आहे.

## लिफ्टच्या डक्टमध्ये पडून तरूण मजूर ठार

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : इमारतीच्या बांधकामावेळी सातव्या मजल्यावरून लिफ्टच्या मोकळ्या जागेमध्ये (डक्ट) पडल्यामुळे १९ वर्षीय तरूण मजुराचा मृत्यू झाला. ही घटना २४ नोव्हेंबरला संध्याकाळी सातच्या सुमारास येवलेवाडीतील एका बांधकामस्थळी घडली. याप्रकरणी एकाविरूद्ध कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सनी डाक्टर सोनी (वय १९ रा. लेबर कॉलनी, येवलेवाडी ) असे ठार झालेल्या तरूण मजुराचे नाव आहे. याप्रकरणी डाक्टर सोनी (वय ४१ रा. बलरामपूर, उत्तर प्रदेश ) यांनी फिर्याद दाखल केली आहे.

# अग्रलेख : तरीही शरद पवार, ठाकरे हवेतच...!

महाराष्ट्रातील निवडणूक निकालाचा राष्ट्रीय राजकारणावर परिणाम होईल का, हा प्रश्न या निवडणुकीच्या आधीपासून विचारला जात होता. लोकसभा निवडणुकीचा कल पाहता हरियाणा आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यात भाजपला फटका बसेल असेच मानले जात होते आणि तसे झाले असते तर नक्कीच राष्ट्रीय राजकारणावर परिणाम झाला असता. ज्या सहकारी पक्षांच्या टेकूवर केंद्रात भाजपची सत्ता उभी आहे त्या टेकूंनी अधिक ताणून धरले असते. मोदी कदाचित अधिक अगतिक झाले असते, सहकारी पक्षांच्या दिवसेंदिवस डोईजड ठरणाऱ्या मागण्या मोदी सरकारची डोकेदुखी ठरल्या असत्या आणि कदाचित या सगळ्याला कंटाळून मोदींनी राजीनामा देण्याचा धाडसी आणि धक्कादायक निर्णयही घेतला असता. तसे झाले नसते तरी मोदी सरकारची ताकद खूपच कमी झाली असती.

विरोधी पक्षाची ताकद वाढली असती आणि त्याचा परिणाम पुढे अनेक राज्यातील विधानसभा निवडणुकीत दिसून आला असता; परंतु आधी हरियाणात नंतर महाराष्ट्रात अनपेक्षित निकाल लागले. या दोन्ही राज्यात भाजपने आधीच्या तुलनेत विक्रमी जागा जिंकल्या. हरियाणाचा धक्का पचण्यापूर्वीच विरोधकांना महाराष्ट्रात मोठा धक्का बसला. महाराष्ट्रातील विरोधकांचा पराभव अधिक परिणामकारक ठरला. या पराभवामुळे केवळ काँग्रेसच नव्हे तर विरोधी आघाडीतील उद्धव ठाकरे आणि शरद पवार गटासमोरही मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे, त्यामुळे या एका राज्यातील पराभवाने त्या पक्षाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणार नाही; परंतु उद्धव ठाकरे आणि शरद पवारांच्या पक्षांची सगळी ताकद महाराष्ट्रातच एकवटली आहे.

सध्या हे दोन्ही गट आपल्या निवडून आलेल्या मोजक्या आमदारांसह पुन्हा उभारी वगैरे घेण्याच्या बाता करीत असले तरी गेली अडीच वर्षे आणि पुढची पाच वर्षे सत्तेपासून वंचित राहणे या दोन्ही पक्षांना जड जाणार आहे. विशेषतः शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या पाच वर्षांचा काळ वगळता सातत्याने सत्तेत सहभागी राहिला आहे. त्यामुळेच राज्यात शिंदे सरकार स्थापन झाल्यानंतर शरद पवारांच्या अनेक साथीदारांनी अजित पवारांसोबत सत्तेच्या मांडवात प्रवेश केला. त्यावेळी शरद पवारांनी आपल्या उर्वरित सहकाऱ्यांसह किल्ला लढविला तोच मुळी पुढे येणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पारडे फिरेल या आशेवर. लोकसभेत अपेक्षेपेक्षा अधिक यश मिळाल्यामुळे उद्धव ठाकरे आणि शरद पवार या दोन्ही गटांच्या आशा अधिकच पल्लवित झाल्या.


विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडी पुन्हा एकदा सत्तेत परतणार याची खात्री त्यांना वाटत होती; परंतु विधानसभा निवडणूक निकालांनी या दोन्ही गटांना मुळापासून हादरविले. शिवाय महायुतीचे संख्याबळ इतके भक्कम आहे की कोणतेही समीकरण, कोणतीही जोडतोड महायुतीच्या सत्तेला हादरा देऊ शकतं नाही. शिवाय केंद्रातही भाजपची सत्तेवरील पकड दिवसेंदिवस अधिक मजबूत होत असल्याचे दिसते. केंद्रात आणि राज्यात पुढील पाच वर्षे कोणताही बदल होण्याची शक्यता दिसत नसल्यानेच उद्धव ठाकरे आणि शरद पवार या दोन्ही नेत्यांच्या गटामध्ये अस्वस्थता दिसून येत आहे. उद्धव ठाकरेनी परवा फडणवीसांची घेतलेली भेट केवळ सदिच्छा भेट नव्हती. पुढचे वळण घेण्यापूर्वी केलेली ती चाचपणी होती. पडद्यासमोर किंवा गाध्यमांसमोर हे लोक काय बोलतात त्याला फारसा अर्थ नसतो, खरे राजकारण पडद्याआड शिजत असते.

वास्तविक विधानसभा निकालानंतर एकीकडे महायुतीच्या सत्ता स्थापनेनंतर मंत्रिमंडळ विस्ताराचे अंक सुरूच आहेत. त्यात देवेंद्र फडणवीसांना मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांच्या शपथविधी आणि नंतर मंत्रीमंडळ स्थापनेचे भिजत घोंगडे अखेर मार्गी लागले. त्यातून ज्येष्ठ ओबीसी नेते छगन भुजबळ यांना राष्ट्रवादीतून मंत्रिमंडळात डच्चू, तर एकेकाळी मुख्यमंत्रीपदाच्या स्पर्धेत असणाऱ्या भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांना वगळण्यात आले आहे. त्यावरून नाराजीनाट्याचे पडसाद आणि ते मिटविण्याचे प्रयत्न सुरूच आहेत. अशातच विधीमंडळ हिवाळी अधिवेशन संपत आले तरी खातेवाटपाचा तिढा सुटेना. अशातच पक्ष पराभवाच्या खाईत असतानाही एकीकडे ज्येष्ठ नेते व शरद पवार राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना महायुतीत येण्यासाठी मंत्रिपदाची ऑफर देऊन पायघड्या घातल्या जात आहेत. दुसरीकडे पक्षाध्यक्ष शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचीही अशात सत्तेविना कोंडी सुटण्याचा पेच आहेच.

त्यामुळेच इकडे उद्धव ठाकरेंनी फडणवीसांची भेट घेताच तिकडे दिल्लीत शरद पवारांनी थेट पंतप्रधान मोदींची भेट घेतली. ही भेटदेखील चाचपणीचाच एक प्रयत्न होता. भाजपला राज्यात या दोन्ही पक्षांची तशी काहीच गरज नाही: परंतु लोकसभेत दोन्ही पक्षांचे मिळून असलेले एकूण १७ खासदार भाजपसाठी महत्त्वाचे आहे. विरोधकांच्या एकतेवर आणि काँग्रेसच्या मनोबलावर प्रहार करण्यासाठी या दोन्ही पक्षांना विरोधी आघाडीतून फोडून आपल्याकडे खेचण्यात मोदी आणि शाहांना स्वारस्य असू शकते. या दोन्ही पक्षांना सत्तेची ऊब हवी आहे आणि भाजपला लोकसभेतील आपला खुंटा अधिक मजबूत करायचा आहे,

एकूण गरज दोन्ही बाजूंची आहे. त्यामुळे निकट भविष्यात राज्याच्या आणि केंद्राच्या राजकारणातही धक्कादायक बदल दिसले तर ते अगदीच अनपेक्षित म्हणता येणार नाही. अर्थात उतरत्या वयात शरद पवारांना राजकीय कारकीर्दीचा शेवट गोड व्हावा यादृष्टीने महायुती आणि केंद्रात एनडीएसोबतची ऑफर तशी वाईट नाही. त्यांनी तसा निर्णय घेतला तर एकूणच बदलत्या राजकारणात ते काही अपमानास्पद किंवा त्यांचा एकूणच आतापर्यंतचा पक्ष स्थापना, विलिनीकरणाचा अनुभव पाहता ते काही वेगळे करतात असे नाही. तसे झाल्यास भाजपचीही केंद्रात भक्कम बहुमताची गरज मार्गी लागेल. राहता राहिली उद्धव ठाकरे बाब, तर त्यांना मुंबई महापालिका ताब्यात ठेवण्यासाठी रिस्क घेण्यापेक्षा तडजोड करणेच शहाणपणाचे ठरेल असे उशिरा का होईना शहाणपण सुचले असावे. त्यादृष्टीनेही ते चाचपणी करीत असावेत. तसे झाल्यास उद्धव ठाकरेंना सोबत घेतले तर भाजपला काँग्रेसमुक्तीचा मार्ग मोकळा होऊ शकतो. याचा फैसला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकपूर्वीच होऊ शकेल.

# 'लाडकी बहीण' योजनेच्या जाहिरातीवर किती कोटींचा खर्च



## राजकारण

महायुतीला सत्ता मिळवून देणाऱ्या लाडकी बहीण योजनेच्या जाहिरातीवर किती कोटींचा खर्च झाला माहिती आहे का?

जेव्हापासून अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुती सरकारकडून जाहीर केली, तेव्हापासून विधानसभा निवडणुकीत ही योजना 'गेमचेंजर' ठरणार असल्याचे सरकारकडून वारंवार सांगितले जात होते.

जेव्हापासून अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुती सरकारकडून जाहीर केली, तेव्हापासून विधानसभा निवडणुकीत ही योजना 'गेमचेंजर' ठरणार असल्याचे सरकारकडून वारंवार सांगितले जात होते.

खरंतर लाडकी बहीण ही योजना मध्य प्रदेशमध्ये तेथील निवडणुकीच्या वेळी भाजपकडून राबवण्यात आली होती. तेथे या योजनेचा सत्ताधारी भाजपला फायदा झाला होता. त्यानंतर तसाच प्रयोग महाराष्ट्रात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना निमित्ताने केला गेला, जो यशस्वी देखील ठरला. ज्याप्रमाणे मध्य प्रदेशात महिला मतदारांना आकर्षित करून भाजपला पुन्हा सत्तेत येणे सोपे गेले अगदी त्याप्रमाणे महाराष्ट्रातही महायुतीला आणि खासकरून भाजपला पुन्हा सत्ता प्राप्तीसाठी फायद्याची ठरली, असे जाणकार सांगतात. मात्र, महायुतीला सत्ता मिळवून देणाऱ्या लाडकी बहीण योजनेच्या जाहिरातीसाठी किती खर्च झाला हाही चर्चेचा विषय ठरला आहे.



### योजनेवरून तर्क-वितर्क

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे निकाल लागताच राज्यात नवे मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ विस्तार, खातेवाटपाची जोरदार चर्चा सुरू झाली. इच्छुक, नाराजांच्या मागण्या-व्यथा चर्चेत आल्या. मात्र, त्याचबरोबर महाराष्ट्रातल्या असंख्य महिलांच्या दृष्टीने उत्सुकतेचा व चिंतेचा असलेला लाडकी बहीण योजनेचा मुद्दाही चर्चेत आला. निकालांनंतर आता लाडकी बहीण योजनेत बदल होणार किंवा त्याचे निकष बदलणार, असे बोलले जाऊ लागले.

महायुतीने आश्वासन दिलेली १५०० वरून २१०० रुपयांची वाढही लांबणार असल्याचे सांगितले जाऊ लागले. त्यामुळे यावर अनेक तर्क-वितर्क लावले जात आहेत.

### 'लाडकी बहीण' योजनेवर जाहिरातीचा खर्च का?

विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने अनेक योजना जाहीर केल्या होत्या. या योजनांची पूर्तता करण्यासाठी ३५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहे. यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १,४०० कोटी रुपये इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली आहे.

यात १०० कोटी रुपयांची तरतूद ही जाहिरातीसाठी करण्यात आली आहे. यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आणि आमदार जयंत पाटील यांनी आक्षेप घेतला आहे. लाडकी बहीण योजनेमुळे सरकार सत्तेत आले. जनतेने त्यांना मोठे यश दिले. असे असतानाही पुढील काळात या योजनेच्या जाहिरातीसाठी १०० कोटींच्या खर्चाची तरतूद का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पुरवणी मागण्यांवर बोलत असताना त्यांनी हा संदर्भ दिला आहे

यासंदर्भात देवेंद्र फडणवीसांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेत निवेदन सादर करताना निकषांमध्ये बदल होणार नसून पात्र महिलांना योजनेतून डावलणार नाही, असे आश्वासन दिले.

## अंतरंग



# कांदा : शेतकरी निराश, ग्राहकही हताश

नाशिक परिसरातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये खरीप हंगामातील लाल कांद्याला १२ ते १६ रुपये किलो दर मिळतोय. किरकोळ बाजारात ग्राहकांना प्रतिकिलो ५० ते ७० रुपये आणि काही ठिकाणी तर ८० रुपये मोजावे लागत आहेत. अशी स्थिती का निर्माण झाली, कांदा एकाच वेळी शेतकरी आणि ग्राहकांची कोंडी का करत आहे, नाशिक जिल्ह्यातील बहुतेक सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. शुक्रवारी (१३ डिसेंबर) लासलगाव बाजार समितीत खरीप हंगामात निघालेला लाल कांदा सरासरी ३००० ते ३५०० रुपये क्विन्टल दराने विकला जात होता. सोमवारी (१६ डिसेंबर) कांद्याचे भाव १२०० ते १६०० रुपये किलो रुपये क्विन्टलपर्यंत खाली आले आहेत. राज्यात गेले महिनाभर कांद्याचे दर चढे होते. किरकोळ बाजारात ग्राहकांना शंभर रुपये किलोपर्यंत कांदा विकत घ्यावा लागत होता. मागील रब्बी हंगामातील उन्हाळ कांदा, रब्बी कांदा आता संपला आहे. बाजारात आता उन्हाळ कांदा येत नाही. गेल्या महिनाभरापासून बाजारात खरीप हंगामात नुकताच काढलेला लाल कांदा बाजारात येतो आहे. या लाल कांद्याला पहिल्या पंधरा दिवसांत सरासरी २५ ते ३३ रुपये प्रतिकिलो दर शेतकऱ्यांना मिळाला. मात्र, सध्या हा दर १२ ते १६ रुपये किलोपर्यंत दर खाली आला आहे. शिवाय या कांद्याला निर्यातीसाठी फारशी मागणी नसते. बांगलादेश, श्रीलंका, नेपाळसारख्या शेजारी देशांमध्ये काही प्रमाणात हा कांदा जातो. पण, देशातून होणाऱ्या कांदा निर्यातीवर २० टक्के निर्यात शुल्क असल्यामुळे लाल कांद्याची निर्यात फारशी होत नाही. एकीकडे निर्यातीसाठी कमी मागणी असणे आणि दुसरीकडे बाजारात दर पडल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. कांद्याच्या निर्यातीवर असलेले विविध निर्बंध केंद्र सरकारने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उठविले आहेत. पण, निर्यात धोरणांबाबत केंद्र सरकारने कायमच धरसोडीची भूमिका घेतली आहे. १९ ऑगस्ट २०२३ रोजी कांदा निर्यातीवर ४० टक्के निर्यात शुल्क लागू केले. २८ ऑगस्ट २०२३ रोजी ८०० डॉलरचे किमान निर्यात मूल्य लागू केले. ७ डिसेंबर २०२३ रोजी कांदा निर्यात पूर्णपणे बंद केली. २२ मार्च २०२४ रोजी निर्यात बंदी अनिश्चित काळासाठी वाढविली. ४ मे २०२४ रोजी कांदा पट्ट्यात लोकसभा निवडणुकीसाठी मतदान असल्यामुळे निर्यात बंदी उठवली, पण ४० टक्के निर्यात शुल्क आणि किमान निर्यात मूल्य ८०० रुपयांवरून ५५० डॉलर करण्यात आले. १३ सप्टेंबर २०२४ रोजी किमान निर्यात मूल्य हटविले आणि २० टक्के निर्यात शुल्क लागू केले. उन्हाळी कांदा दर्जेदार असल्यामुळे २० टक्के निर्यात शुल्क असूनही कांदा निर्यात होत होती. खरीप कांदा शेजारील देशांना निर्यात होतो, २० टक्के निर्यात शुल्क रद्द केल्यास काही प्रमाणात निर्यात वाढू शकते. त्यामुळे शेतकरी संघटना, विरोधक २० निर्यात शुल्क रद्द करण्याची मागणी करीत आहेत. राज्यात उत्पादित होणाऱ्या उन्हाळी (रब्बी) कांद्याला देशभरातून मागणी असते. पण, खरीप कांद्याच्या बाबत असे नसते. नोव्हेंबरपासून राज्यात खरीप कांद्याची काढणी सुरू होते. याच काळात दिल्लीच्या परिघातील सुमारे १५० किलोमीटर परिसरात उत्पादीत होणारा खरीप कांदाही बाजारात येतो. पहिल्या टप्प्यात राजस्थानमधील अलवर येथील कांदा बाजारात येतो. त्या पाठोपाठ पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशातील कांदा बाजारात येतो. हा कांदा सुमारे आठ लाख टनांच्या आसपास असतो. इतक्या मोठ्या प्रमाणावरील कांद्यामुळे दिल्लीसह उत्तर भारताची दोन महिन्यांची कांद्याची गरज भागते. त्यानंतर गुजरात, कर्नाटकातील कांद्याची काढणी सुरू होते, त्यामुळे दक्षिण भारताचीही गरज पूर्ण होते. त्यामुळे राज्यात उत्पादित होणाऱ्या कांद्याला मागणी असत नाही. केंद्र सरकारने नाफेड आणि एनसीसीएफला प्रत्येकी २.५ लाख टन, असे एकूण पाच लाख टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट दिले होते. प्रत्यक्षात दोन्ही संघटनांनी किती दराने, किती कांदा खरेदी केला, याची माहिती आजवर कधीही जाहीर केलेली नाही. गैरव्यवहाराचे आरोप झाल्यानंतर केंद्र सरकारच्या पथकाने दोन वेळा तपासणी करून अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. पण, नेमका काय गैरव्यवहार झाला, हे दोन्हीही संस्थांनी जाहीर केलेले नाही. चांगला कांदा खरेदी केल्याचे दाखवून सरकारचे पैसे लाटले आणि कांदा देण्याची वेळ आली तेव्हा कमी दर्जाचा, सडलेला कांदा ग्राहकांना दिला. त्यामुळे या प्रकरणी सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे. नाफेड आणि एनसीसीएफकडून होणारी खरेदी शेतकरी आणि ग्राहकहिताची असणे गरजे आहे. तसे होताना दिसत नाही. सध्या व्यापारी १२ ते १६ रुपये दराने कांदा खरेदी करीत आहेत. तोच कांदा पुणे, मुंबईत ४५ ते ७० रुपये किलो दराने विक्री होत आहे. ग्राहकहितासाठी केंद्र सरकारने कांद्याच्या किरकोळ विक्री दरावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.

**- ओंकार कुलकर्णी**

## पंचांग

शनिवार विक्रम संवत्- २०८१
मार्गशीर्ष शके संवत्- १९४६ संवत्सर - क्रोधीनाम
अयन- उत्तराणायण मास- मार्गशीर्ष ऋतु- सौर हेंमत वर्षा
कृष्ण पक्ष तिथि : षष्टी १२:२१:३३
नक्षत्र : पूर्वाफाल्गुनी ३०:१३:५९+
योग : प्रीति १८:२२:१६ करण : वणिज १२:२१:३३ करण : विष्टि २५:२२:५०+ सूर्य : धनु चन्द्र : सिंह हिजरी सन् - १४४६ मुस्लीम मास - जमादिलाखर तारीख - १९ विशेष उत्तरायणारंभ सौर शिशिर ऋतू प्रारंभ मोरया गोसावी पुण्यतिथी- चिंचवड (पुणे)

## राशी भविष्य...

**मेष** — शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर
सामाजिक यशात थोरामोठ्यांचा सहभाग अपेक्षित राहील. काहींना नवा प्राप्तीमार्ग हाती आल्याचा आनंद होईल.

**वृषभ** — शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:दक्षिण. आर्थिकदृष्ट्या अनेक मोठे प्रश्न हातावेगळे करू शकाल. नोकरी व्यवसायात अनुकूल घटना घडतील.

**मिथून** — शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण. निरनिराळ्या सुचणाऱ्या कल्पना व्यावसायिकदृष्ट्या आत्ताच अंमलात आणू नका. जवळचा प्रवास करा.

**कर्क** — शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: पश्चिम. नोकरी-व्यवसायात फार मोठा धोका पत्करणे सध्या तरी योग्य ठरणार नाही. मुलांच्या संबंधातील प्रश्न सुटतील.

**सिंह** — शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम. एखादी महत्त्वाची पण विलंबाने झालेली कृती फायद्याची जाणवेल. काही नवीन आलेले प्रस्ताव विचाराधीन राहतील.

**कन्या** — शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पश्चिम
काहींना अचानक धनलाभाच्या संधी मालामाल करतील. दीर्घ सहलीचा आनंद सहकुटुंब लुटाल.

**तूळ** — शुभ रंग:केसरी, शुभ दिशा : उत्तर.
काही विशेष कामानिमित्त आपणास लांबच्या प्रवासाचे बेत आखावे लागतील.

**वृश्चिक** — शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:उत्तर
वैवाहिक जीवनात वैवाहिक साथीदाराचा पूर्ण पाठिंबा आपले मनोधैर्य वाढवणारा ठरेल.

**धनू** — शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर
आर्थिकदृष्ट्या कोणत्याही आश्वासनांवर विसंबून न राहता हाती येईल तेच खरे ही भूमिका घ्या.

**मकर** — शुभ रंग: लाल, शुभ दिशा: पूर्व
उद्योगधंद्यात काही व्यवहार अनपेक्षित फलदायी ठरतील. संततीच्या महत्त्वाच्या प्रश्नामध्ये निर्णायक यश मिळेल.

**कुंभ** — शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व
नोकरी-व्यवसायात मोठे लाभ होतील तसे परिचितांचा गट वाढेल. आपल्या कामात त्याचा उपयोग करून घेऊ शकाल.

**मीन** — शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व
व्यापारी वर्गाला आपले व्यापारकौशल्य सिद्ध करता येईल. महत्त्वाचे निर्णय फायदेशीर ठरतील.

## पारावरचा फड



घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि त्यांचे कार्य शतको न शतके देशासाठी, प्रत्येक घटकासाठी प्रेरणादायी आहे. समता, न्याय, बंधुता हा जीवनाचा मार्ग त्यांनी दाखवून दिला आहे. मानवी हक्कांची देण त्यांनी दिली आहे. त्यांच्या घटनेचा कितीजणांनी अभ्यास केला असेल. पण दुर्दैवाने त्यांच्या नावाने भांडवल आणि निव्वळ गैरअर्थ, समज यातून पेटवापेटवीचा धंदा करीत राजकीय पोळी भाजण्याचा उद्योग होतो. त्यातल्या त्यात संविधानबदल आणि त्याच्या दोन्ही बाजू, दोन्ही विचारसरणी हा भाग तर निराळाच. आता दस्तुरखुद्द केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा यांचे डॉ. आंबेडकर यांच्याबद्दल वक्तव्य आणि त्याचा बागुलबुवा झाला, त्यातून दोन्ही बाजूने आंदोलने सुरु आहेत. संसदेसमोर काँग्रेससह विरोधी पक्षाची निदर्शने आणि त्यावेळी भाजपच्या खासदाराशी धक्काबुक्कीतून राहुल गांधी यांच्यावर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा असले प्रकार झाले. एकूणच हे राजकारण कोणत्या दिशेने चालले आहे, यासंदर्भात पारावरची चर्चा...!

**बाबूराव :** आपलं घटनाकार आन् समद्यास्नी मानूस म्हनून जगन्याचा संविदानिक आदिकार देणाऱ्या डॉ. बाबासायबाच्या नावानं जे काय राजकारन चाललंया ते वंगाळ हाय.

**पांडूनाना :** व्हय, मला सांग. ह्या राजकारन्यासानी बाबासायबानं काय सांगितलं ते कळत न्हाय का?

**बाबूराव :** कळाया किती शानी राजकारनी हायती?

**पांडूनाना :** म्हजी?

**बाबूराव :** तुला म्हाईत हाय का? देशातलं ६० परास आदिक टक्के आमदार, खासदार काय बाय गुन्यात आडकल्यालं हायती. आन् कितीजनास्नी बाबासायबांची घटना वाचून म्हाईत हाय?

**पांडूनाना :** ते बी खराय म्हन. निम्म्यापरास नॉन मॅट्रीकबी आसत्यात. ग्रॅजुएट, उच्चशिक्षित तर सोडाच.

**बाबूराव :** मग त्यानास्नी काय कळतंया देश, राज्य कस चालवायाच? ह्यो जगन्नाताचा रत हाय. इलेक्शान हुत्यात. चार-चार टरम झाल्या तरी खासदार, आमदार म्हनून जबाबदाऱ्या आन् कामकाज कळत न्हायती.

**पांडूनाना :** आता बग न्हवं. बाबासायबाच्या नावानं आमितभाई शाहा काय बोललं आन् त्याचा ईपरीत आरथ काडत सत्ताधारी, इरोदक भांडाय लागलं.

**बाबूराव :** व्हय त्यातनं राहुल गांधीबाबा आन् ते खासदार सारंगी हानामारी, खुनापातुर पोचलं म्हन.

**पांडूनाना :** ह्ये काय खरं नसनार हाय. पन पेटवाय आन् भांडाय कायबाय कारनं लागत्यात समद्यास्नी.


**बाबूराव :** पन ह्यातनं काय साद्य करत्यात?

**पांडूनाना :** आरं लोकास्नी फसवायचं आन् म्हागाई, आन् इतर मुद्द्यापासनं भरकटायचा उद्योग.

**बाबूराव :** ह्येलाच म्हंत्यात राजकारन!

**- अमृत चौगुले**

## उपदेश कथा



### ईश्वरनिष्ठा

एक ईश्वरभक्त होता. तो व त्याचे कुटुंब सन्मार्गी होते परंतु त्याला बायको व मुलांची फार काळजी वाटे. आपली मुले सज्जन आहेत पण बाहेरचे जग तसे नाही. आपल्या मुलांना बदमाश लोक फसवतील या काळजीने तो ग्रासला होता. एके दिवशी त्याची पत्नी त्याला म्हणाली, 'आपली मुलं इतकी गुणी आहेत व घरातही सर्व सुख असताना आपण नेहमी कसल्या चिंतेत असता?' त्यावर तो म्हणाला, 'आपली मुले गुणी व सज्जन आहेत पण या फसव्या जगात त्यांचा कसा निभाव लागणार, याची मला चिंता वाटते. त्यामुळे मला रात्री झोपही लागत नाही.' पत्नी म्हणाली, 'अहो, तुम्ही ईश्वराची भक्ती करता, शेवटपर्यंत तुम्ही अशी काळजी करत राहणार का?' तो म्हणाला, 'जेव्हा माझा मृत्यू जवळ आला आहे असे वाटेल तेव्हा मी देवाची प्रार्थना करेन की देवा, मी आता चाललो, तू अत्यंत दयाळू आहेस, माझी मुलं नीतिमान आहेत, तू त्यांचे दुष्टांपासून रक्षण कर.' हे ऐकून पत्नी म्हणाली, 'जी प्रार्थना तुम्ही शेवटी करणार, ती प्रार्थना आत्ताच करा, प्रपंचाचा सर्व भार त्या दयाळू ईश्वरावर सोपवून तुम्ही निर्भर राहा.

' **कथा उपदेश** : प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी झटा.

## दिनविशेष...



२००४- ब्राझिलचा रोनाल्डिन्हो या वर्षीचा सर्वोत्कृष्ट फुटबॉलपटू. २००६- इंग्लंडचा वेगवान गोलंदाज स्टीव्ह हार्मिसन एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्त. २००६- इंफाळमध्ये बस दरीत कोसळून २२ ठार.

जन्म- १९०३- भालचंद्र दिगंबर गरवारे या गरवारे उद्योग समूहाचा पाया घालणाऱ्या उद्योजकाचा जन्म. १९२१- भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी प्रमुख न्यायाधीश प्रफुल्लचंद्र नटवरलाल भागवती यांचा जन्म.

निधन- १८२४- कंपवाताचा मानवी मेंदूशी संबंध आहे. हे सिद्ध करणाऱ्या जेम्स पार्किनस्नचा मृत्यू. त्याचे नाव या रोगाशी 'पार्किन्सन्स डिसीझ,' असे कायमचे जोडले गेले.

१९७१- निवृत्तीनाथ रावजी पाटील तथा पी. सावळाराम यांचे निधन. २००६- तुर्कमेनिस्तानचे राष्ट्रपती सपार्मुरत नियोजोव यांचे निधन.


२००७- सुप्रसिद्ध कवी डॉ. हरिवंशराय बच्चन यांची पत्नी व महानायक अमिताभ बच्चन यांच्या आई तेजी बच्चन यांचे निधन.

## प्रशासकीय अधिकारी अन् राजकारण

देशात न्यायालय, सनदी सेवा, पोलीस असे कोणतेही क्षेत्र असो या क्षेत्रातील वरिष्ठ पदावरून निवृत्त झाल्यानंतर कोणत्यातरी राजकीय पक्षाचे सभासद होऊन निवडणुका लढविण्याचे किंवा राज्यपालसारखे एखादे पद घेऊन सत्ताधारी पक्षाची री ओढण्याचे काम जोमात सुरू आहे. यापूर्वी अशा एखाद दुसऱ्या अधिकाऱ्याच्या ज्ञानाचा उपयोग देशासाठी व्हावा म्हणून त्याचे राजकीय पुनवर्सन केले जायये. मात्र आता असा प्रघात पडताना दिसून येत आहे. अगदी लोकसभा निवडणुकीत अनेक पोलीस किंवा न्याय क्षेत्रातील दिग्गजांनी निवडणुका लढविल्याचे दिसून आले आहे. मात्र असे अधिकारी जेव्हा राज्यपाल किंवा लोकप्रतिनिधी होतात तेव्हा अनेक प्रश्न उपस्थित झाल्याचे राज्याने पाहिले आहे. भगतसिंह कोश्यारी या भाजपच्या नेत्याने जेव्हा महाराष्ट्राचे राज्यपाल पद भूषविले त्यावेळी राज्यात काय परिस्थिती निर्माण झाली होती हे देशाने अनुभवले आहे. तर दुसरीकडे किरण बेदी यांच्या विषयीसुद्धा असाच प्रसंग उद्‌भवला होता. हे लोकप्रतिनिधी जनमानसात रूजणारे त्यांच्याच रमणारे आहेत. त्यामुळे त्यांना राज्यपाल पदी नियुक्त केल्यानंतर त्यांचे वर्तन हे त्यांच्या पूर्वीच्या पदासारखेच राहिले त्यामुळे राजकीय बखेडा निर्माण होण्याचे प्रसंग उद्‌भवले. त्यामुळे अशा प्रशासकीय अधिकार्यांचे पुनवर्सन करताना आता राजकीय पक्षांनीदेखील सारासार विचार करणे गरजेचे आहे.

**- शंभूराज देशचौगुले, कोल्हापूर**

## जन की बात...




# रात्रीच्या जेवणानंतर गोड खाणे धोकादायक

रात्रीच्या जेवणानंतर अनेकांना गोड खायला आवडते. बरेच लोक रात्रीच्या जेवणानंतर आइस्क्रीम खायला बाहेर पडतात. याबाबात आरोग्य तज्ज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ म्हणाले की, रात्री उशिरा गोड पदार्थांचे सेवन केल्याने इन्सुलिन सेन्सिटिव्हिटी कमी होते. त्यामुळे चयापचय विकारांचा धोका वाढतो. रात्री उशिरा जास्त साखरयुक्त पदार्थ खाल्ल्याने त्याचे चरबीत रूपांतर होते, ज्यामुळे वजन वाढते. रात्रीच्या वेळी गोड पदार्थ खाल्ल्याने झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. त्यामुळे शरीरास पुरेशी विश्रांती मिळत नाही. कारण- त्यामुळे हार्मोनल आणि चयापचय क्रिया बाधित होते. साखरेच्या सेवनाने झोपेचे नियमन करणारे हार्मोन मेलाटोनिनवर दबाव निर्माण होतो. त्याच वेळी कॉर्टिसोल हार्मोनमध्ये वाढ होते. हा हार्मोन तणावास कारणीभूत ठरतो. त्याचा तुमच्या झोप, विश्रांतीवर वाईट परिणाम होतो. याव्यतिरिक्त डॉ. हिरेमठ यांनी म्हटले की, रात्रीच्या जेवणानंतर नियमितपणे गोड पदार्थ खाल्ल्याने न्यूरोपॅथी, रेटिनो पॅथी, मधूमेह आणि किडनीसंबंधित आजारांचा धोका वाढतो, असे सांगितले.

रात्रीच्या वेळी गोड पदार्थ खाल्ल्याने जळजळ आणि धमन्यांचे नुकसानदेखील होऊ शकते आणि त्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो. पण रोज अशा प्रकारे तुम्ही गोड पदार्थ खात असाल, तर घ्रेलिन व लेप्टिन यांसारख्या भूक नियंत्रित करणाऱ्या हार्मोन्सवरही परिणाम होतो. त्यामुळे अति खाण्याची लालसा वाढवते, असे डॉ. हिरेमठ म्हणतात. रात्री उशिरा गोड पदार्थ खाण्याची सवय रोखण्याबाबत डॉ. हिरेमठ यांनी म्हटले की, पौष्टिक पदार्थ खाण्यावर भर द्या. तसेच, आरोग्यदायी पर्याय आणि वर्तणूक पद्धतीवर लक्ष केंद्रित करा. शरीरास मॅग्नेशियम किंवा क्रोमियमसारखे पोषक घटक मिळतील अशा पदार्थांचे सेवन करा. त्यासाठी तुम्ही आहारात पालेभाज्या, शेंगदाणे आणि तृणधान्याचा समावेश करू शकता. तुम्हाला गोड खाण्याचा आनंद घ्यायचा असेल, तर दिवसाच्या सुरुवातीला गोड पदार्थ खा. कारण- यावेळी तुमची चयापचय क्रिया अधिक सक्रिय असते.

**दिनेश मुळे, सांगली**

## साखर महाग होण्याची शक्यता



देशातील मागील वर्षी साखरेचे उत्पादन ७४. ०५ लाख टन होते . यंदा ते उत्पादन घटून १५ डिसेंबर पर्यंत ६१. ३९ लाख टन एवढे कमी झाले . म्हणजेच एकूण उत्पादन १७ टक्के कमी झाले. यंदा महाराष्टात साखरेचे उत्पादन कमी झाले आहे ही माहिती इंडियन शुगर अंडा बायो एनर्जी मॅनुफॅक्टरर्स असोसिएशनच्या संघटनेने दिली आहे हे नुकतेच वाचण्यात आले. साखरेचे उत्पादन कमी झाल्याने साखरेच्या किमती वाढू शकतात. त्यामुळे यंदा ग्राहकांना साखर महाग दराने घ्यावी लागण्याची शक्यता आहे. यंदा महाराष्ट्रातील साखर कारखाने सुमारे १५ ते २० दिवस उशिराने हंगाम सुरू झाला. याचा परिणाम साखरेचे उत्पादन कमी होण्यावर झाला त्याचप्रमाणे कर्नाटक राज्यातील साखर कारखाने सुद्धा १५ ते २० दिवस उशिरा सुरू झाले होते. यंदा देशातील सुमारे ४७७ फॅक्टरीज मध्ये हे उत्पादन झाले तर मागील वर्षी ही संख्या ४९६ एवढी होती यंदा उत्तर प्रदेश साखर उत्पादनात प्रथम क्रमांकावर आहे .

**शांताराम वाघ, पुणे**

# विधानसभा निवडणुकीनंतर शिरूर तालुक्यात अवैध धंद्याचा सुळसुळाट

जनप्रवास : प्रतिनिधी



निमगाव भोगी : राज्यात एक महिन्यापुर्वी विधानसभा निवडणुका पार पडल्या. त्यानंतर राज्यात महायुतीची सत्ता आली. शिरुर-हवेली तसेच आंबेगाव-शिरुर विधानसभा मतदार संघात महायुतीचे दोन्ही उमेदवार विजयी झाले. त्यानंतर महिनाभरातच शिरुर तालुक्यातील शिक्रापुर, रांजणगाव एमआयडीसी आणि शिरुर पोलिस स्टेशनच्या हद्दीत बेकायदेशीर गुटखा विक्री, पान मसल्याच्या नावाखाली खर्रा विक्री, गावठी दारु, जुगार, मटका तसेच अनेक अवैध धंद्याचा सुळसुळाट झाला आहे.

लोकसभा निवडणुकीपुर्वी पुणे जिल्ह्यात अनेक वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. पुणे ग्रामीण पोलिस अधिक्षक म्हणुन पंकज देशमुख यांची नियुक्ती झाल्यानंतर पुणे जिल्ह्यातील सर्व अवैध धंद्याना मोठ्या प्रमाणावर आळा बसला. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतरही अवैध धंदे बंदच होते. मात्र विधानसभा निवडणुक झाल्यानंतर पुणे जिल्ह्यात अवैध धंद्याना पुन्हा सुरवात झाली आहे. तसेच शिरुर तालुक्यातील शिरुर, रांजणगाव एमआयडीसी आणि शिक्रापुर पोलिस स्टेशन हद्दीतही पुन्हा अवैध धंद्याचा सुळसुळाट झाला आहे.

**शिरुर तालुक्यात पोलिसांचा धाक आहे का...?**

शिरुर तालुक्यात काही पोलिस, तसेच आमदार, खासदार यांचे नातेवाईक स्वत:च्या खाजगी चारचाकी गाडयांना पोलिस, आमदार, खासदार अशा विविध नावाच्या पाट्या लाऊन अनेकजण बिनधास्तपणे वावरत आहेत. तसेच अनेक दुचाकी गाड्यांना फॅन्सी नंबरप्लेट तर काही दुचाकी बुलेट गाड्यांना कर्णकर्कश आवाजाचे सायलेन्सर लावलेले असुन या गाड्या सर्रासपणे शिरुर तालुक्यातील वर्दळीच्या ठिकाणी वावरत असतात. त्यामुळे गुन्हेगारीच प्रमाण वाढत असुन शिरुर तालुक्यात खरंच गुन्हेगारांना पोलिसांचा धाक आहे का...? असा प्रश्न सर्वसामान्य लोकांना प्रश्न पडला आहे.

**तालुक्यात काळ्या काचांच्या गाड्यांचा सुळसुळाट...?**

शिरुर तालुक्यात अनेक चारचाकी गाडयांना काळ्या काचा असुन त्यातल्या अनेक गाड्या राजकीय पुढाऱ्यांच्या नातेवाईकांच्या आहेत. सर्वसामान्य व्यक्तीने जर वाहतुकीचा एखादा नियम मोडला तर पोलिस तात्काळ त्याच्यावर कारवाई करतात. परंतु राजकीय व्यक्तींच्या नातेवाईकांवर कारवाई करण्यासाठी मात्र पोलिस धजावत नाहीत. त्यामुळे राजकीय लोकांना वेगळा न्याय आणि सर्वसामान्य लोकांना वेगळा न्याय असेच काहीसे चित्र सध्या शिरुर तालुक्यात दिसत आहे.



# संत सावता सोसायटीच्या चेअरमन पदी तनपुरे

**व्हा. चेअरमन पदी शिवाजी शिरसाठ**

जनप्रवास : प्रतिनिधी

टाकळीभान : श्रीरामपुर तालुक्याच्या पुर्वभागातील प्रतिष्ठेच्या व जिल्हा सह.बँकेचे संचालक करण ससाने यांच्या मार्गदर्शनाखालील संत सावता माळी वि.वि.कार्य. सह. सोसायटीच्या नुतन चेअरमन पदी जेष्ठ संचालक बाबासाहेब तनपुरे यांची तर व्हा. चेअरमन पदी शिवाजी शिरसाठ यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सहाय्यक निबंधक कार्यालयाचे सहकार अधिकारी आर.के.जाधव व मुख्य लिपिक आर.एस. जोशी यांनी निवडणुक निर्णय अधिकारी यांनी या निवडी घोषित केल्या. यावेळी जेष्ठ नेते ज्ञानदेव साळुंके, माजी सरपंच मंजाबापु थोरात, शिवाजी शिंदे, दत्तात्रय नाईक, बाजार समितीचे संचालक मयुर पटारे, मधुकर कोकणे, भाऊसाहेब मगर मान्यवर उपस्थित होते.

येथील श्री संत सावता माळी वि.वि.कार्य. सोसायटी गेल्या १५ वर्षांपासुन सभासदाभिमुख कामकाज करुन सातत्याने शंभर टक्के कर्जाचा वसुल करीत आहे. गेल्या पंचवार्षिक निवडणुकि नंतर प्रत्येक वर्षी नवीन पदाधिकारी निवडीचा निर्णय संचालक मंडळाने घेतला होता. त्यामुळे चेआरमन बाबासाहेब लोखंडे व स्थापने पासुन व्हा. चेअरमन पद सांभाळणारे चंद्रकांत लांडगे यांनी आप आपल्या पदाचे राजीनामे दिल्याने सहाय्यक निबंधक कार्यालयाकडुन पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. तर भटक्या वि.जा. मतदार संघातील एका रिक्त जागेवर संचालक नियुक्त करण्यासाठीही कार्यक्रम घोषीत करण्यात आल्याने भटक्या जा. वि.जा. मतदार संघाच्या संचालक पदी जलाल फरीद कुरेशी यांची नियुक्ती करण्यात आली. तर चेअरमन व व्हा. चेअरमन पदासाठी अनुक्रमे बाबासाहेब दत्तात्रय तनपुरे व शिवाजी रभाजी शिरसाठ असे दोनच अर्ज दाखल झाल्याने निवडणुक निर्णय आधिकारी जाधव व जोशी यांनी वरील प्रमाणे बिनविरोध निवडी झाल्याचे घोषीत केले.



# शिक्रापुरात मतीमंद मुलांच्या शाळेत विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी

जनप्रवास : प्रतिनिधी

शिक्रापूर : ता. शिरुर येथील हिवरे रोड परिसरातील श्री छत्रपती प्रतिष्ठान संचलीत निवासी मतीमंद मुलांची कृषी कार्यशाळा येथे मतीमंद मुलांच्या आरोग्याच्या सुविधेसाठी विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी शिबिर संपन्न झाले आहे. शिक्रापूर ता. शिरुर येथील हिवरे रोड परिसरातील श्री छत्रपती प्रतिष्ठान संचलीत निवासी मतीमंद मुलांची कृषी कार्यशाळा येथे बुधराणी हॉस्पिटल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी पन्नास विद्यार्थ्यांचे नेत्र तपासणी करण्यात आले, यावेळी संस्थेचे अध्यक्ष शशिकांत गाडेकर यांनी डोळ्यांची निगा कशी राखावी याबाबतची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत साळवे यांनी केले तर विकास खाडे यांनी आभार मानले.

# विविध क्षेत्रातील व्यक्तींचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी करिअर घडवावे : नम्रता बिरादार

जनप्रवास : प्रतिनिधी




ओतूर : विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगती करून ,या कार्यक्रमाच्या निमित्ताने व्यासपीठावरील उपस्थित असलेले न्यायाधीश,वकील,डॉक्टर आणि पोलीस दल अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी करिअर घडवावे असे प्रतिपादन तालुका विधी सेवा समितीच्या अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व मुख्य न्यायाधीश मे.नम्रता बिरादार यांनी येथे केले.

तालुका विधी सेवा प्राधिकरण व रोटरी क्लब नारायणगाव हायवे यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक शिबीर व आरोग्य तपासणी शिबीर गुरूवार दि.१९ रोजी अनुदानित प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा कोळवाडी ( ता.जुन्नर ) येथे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष अध्यक्षस्थान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना न्यायाधीश बिराजदार ह्या बोलत होत्या.

कायदेविषयक शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. रोटरी क्लब नारायणगाव हायवे अध्यक्ष तथा जुन्नर तालुका वकीलबार असोसिएशनचे अध्यक्ष अँड. अरूण गाडेकर यांनी बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण,मुलांच्या हक्काबद्दल कर्तव्याबद्दल त्याचप्रमाणे आजच्या काळातील मोबाईल मुळे वाढत्या गुन्हेगारीचे विदारक चित्र वर्णन करून मुलांना यापासून दूर राहण्याचे आव्हान केले.याप्रसंगी अँड.राम कर्पे

यांनी मानवी हक्क आणि कर्तव्य याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक श्री एल.जी थाटे साहेब ओतूर पोलीस स्टेशन यांनी त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना इंस्टाग्राम, फेसबुक व मोबाईल पासून दूर राहा व चांगल्या प्रकारचा अभ्यास करून स्पर्धा परीक्षा मार्फत आपलं करिअर घडवा अशा प्रकारचे मार्गदर्शन केले.अँड.जयराम तांबे यांनी काव्यातून कायदा,हक्क व कर्तव्य समजावून सांगताना मंचावर एक वेगळेच काव्यमय वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष निवड प्राचार्य श्री गायकर सर यांनी केली. प्रास्ताविकात शिवप्रेरणा शिक्षण संस्थेच्या सचिव मंदाकिनी दांगट यांनी शिबिराचा उद्देश, शिवप्रेरणा शिक्षण संस्थेच्या शाळांचा इतिहास संस्थेच्या शाळांमधून आज पर्यंत उच्च पदावर असणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा नाम उल्लेख करत संस्थेच्या सर्व शाळांचे शिक्षकांचे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कौतुक अभिनंदन केले. या कार्यक्रम प्रसंगी जुन्नर तालुक्याचे माजी आमदार बाळासाहेब दांगट यांनी आरोग्य शिबिराचे उद्घाटन करून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.डॉ. पंजाबराव कथे ,डॉ. घोरपडे,हृदयरोग तज्ञ. डॉ.आशुतोष बोळीज आरोग्य शिबिरामध्ये कॅन्सर कान , नाक घसा तपासणीतून तपासणी, डोळे तपासणी, महालॅब जुन्नर, अर्थोपेडिक अस्थिरोग तपासणी, केसांच्या समस्या व होमिओपॅथी उपचार ,मानसिक आजार उपचार आणि हृदयरोग तपासणी यासंदर्भात संस्थेच्या चारही शाळातील सुमारे चारशे विद्यार्थ्यांची कर्मचाऱ्यांची व परिसरातील पालक ग्रामस्थ यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली डॉ. मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशन मार्फत सर्वांची डोळे तपासणी करण्यात आली व मोफत चष्मे वाटप तसेच मोफत औषधोपचार करण्यात आला. याप्रसंगी अनेक डॉक्टर व नर्सेस उपस्थित होत्या. या कार्यक्रम प्रसंगी डॉ. पुष्पलता शिंदे ,धोंडीभाऊ मोरे, रो.अनिता गाडेकर, न्यू इंग्लिश स्कूल हिवरे न्यू इंग्लिश स्कूल धामणखेल सावळाराम बुवा दांगट विद्यालय उंब्रज व अनुदानित प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा कोळवाडी चे मुख्याध्यापक ,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी तसेच आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन गणेश मोढवे व महेंद्र कुमकर सर यांनी केले तर अँड.हेमंत भास्कर यांनी आभार मानले.

# सुखी, समृध्द जीवनाचा सुवर्ण मार्ग म्हणजे ध्यानधारणा

**प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन**

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : आजच्या स्पर्धात्मक जीवनशैलीत मानसिक ताण, झोप न येणे, भीती वाटणे यांसारखे मानसिक विकार वाढत आहेत. या समस्यांवर मात करण्यासाठी मेडिटेशन हा एकच उपाय आहे. मन शांत, तन शांत आणि विचार शांत ठेवण्यासाठी ध्यान हा सर्वोत्तम मार्ग आहे. आनंदी, तणावमुक्त जीवन जगण्यासाठी ध्यान (मेडिटेशन) करायला हवे, असे प्रतिपादन ब्रह्माकुमारीच्या सरिताबेन राठी यांनी केले. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने 'पहिल्या जागतिक ध्यानदिना'निमित्त सरिताबेन राठी यांच्या मेडिटेशन सत्राचे आयोजन केले होते. 'सूर्यदत्त'च्या बावधन प्रांगणातील बन्सीरत्न सभागृहात झालेल्या कार्यक्रमात सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक व अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, आदी उपस्थित होते.

# राहूरी शहरात नागरी सुविधाचा बोजबारा

**माजी उपनगराध्यक्ष रावसाहेब तनपुरे यांचे निवेदन**

जनप्रवास : प्रतिनिधी



राहुरी : शहरात नागरी सुविधाचा बोजबारा उडाला असून नगरपालिका कडून कोणत्याही स्वरूपात पूर्तता केली जात नाही. शहरात पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. स्वच्छता, आरोग्य याकडेही दुर्लक्ष झाल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उभा राहिला आहे. २९ कोटीची पाणीपुरवठा योजना पूर्ण केली तरीही पाणीपुरवठा सुरळीत का नाही ? असा प्रश्न माजी उपनगराध्यक्ष रावसाहेब राधुजी तनपुरे यांनी राहुरी नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की राहुरी शहरात नुकताच पाणीपुरवठ्याचा बोजबारा उडाला आहे. शहरातील काही भागात अजूनही मध्यरात्री पहाटे २:३० वा ४:१५ वा पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे नागरिकांना कडकच्या थंडीत उठून पाणी भरावे लागते. या वेळेला पाणी येते का नाही याची शाश्वती नसते असे नागरिकांकडून सांगितले जात आहे. कोणत्याच भागात पाण्याची निश्चित वेळ नाही त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे. नगरपालिकेने २९ कोटीची पाणीपुरवठा योजना पूर्ण केली. तरीही पाणीपुरवठा सुरळीत नाही. या योजनेत राहुरी शहर मोटार मुक्त केले जाणार होते तसेच नागरिकांच्या घराघरात थेट किचन पर्यंत विना मोटरपाणी मिळणार होते परंतु अजूनही नागरिकाना मोटारी लावून पाणी किचन पर्यंत घ्यावे लागत आहे. २९ कोटीच्या योजनेचे काय! योजना पाण्यातच गेल्यासारखी आहे ? प्रशासकांनी याबाबतीत सविस्तर लक्ष घालून येत्या आठ दिवसात पाणीपुरवठा सुरळीत करावा. पाणीपुरवठा विभागाकडे कंत्राटी कामगार आहेत असे असतांना नागरिकांना नवीन नळ कनेक्शन घेणेसाठी खोदाईसाठी खर्च करावा लागत आहे यापुढे प्रशासक यांनी लक्ष द्यावे. यापुढे नवीन नळ कनेक्शन धारकास नगरपालिकेने खोदाई करणेसाठी खर्च करण्यास सांगू नये. तसेच योजना झाली असेल तर नागरिकांना यांच्या घरात विना मोटर पाणी कसे जाईल यासाठी प्रयत्न करावेत.

शहराच्या एसटी स्टैंड परिसरातील मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य आहे. कनगर रोड, नांदूर रोड या भागात कचरा मोठ्या प्रमाणावर साचला आहे. शहरात इतरही भागात घाणीचे साम्राज्य आहे. प्रशासकाने या ठिकाणीही लक्ष देण्याची गरज आहे. सर्व बाबीची प्रशासकाने दखल घेऊन शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करावा. कचरा उचलणे बाबतही कार्यवाही जलदगतीने करावी अन्यथा आम्हांला उपोषण करावे लागेल याची नोंद घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे

या निवेदनावर माजी उपनगराध्यक्ष रावसाहेब तनपुरे, नारायण धोंगडे, माजी नगरसेवक अक्षय तनपुरे, दिनेश उंडे, सत्यवान पासवान, योगेश मुसळे, महेश वराळे, भाऊ बर्डे आदींच्या सह्या आहेत

# रूईछत्रपती फाटा – पठारे वस्ती रस्त्याचे काम दुसऱ्यांदा पाडले बंद

**ठेकेदाराची दंडीलशाही; नियमात काम न केल्यास ग्रामस्थांच्या रोषाला सामोरे जा : दत्ता पवार**

जनप्रवास : प्रतिनिधी

पारनेर : तालुक्यातील रूईछत्रपती फाटा ते पठारे वस्ती रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे केले जात असल्याने हे काम ग्रामस्थांनी गुरुवार दि. १२ रोजी बंद पाडले होते.यानंतर कामात कुठलीही सुधारणा न करताच संबधीत ठेकेदाराने मंगळवार दि १७ रोजी हे काम पुन्हा चालू केले. हे काम पूर्वीसारखेच निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. त्यांनी पारनेर तालुका दूध संघाचे अध्यक्ष दत्ता नाना पवार, वाळवणे देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष नितीन पठारे यांना याबाबत कल्पना दिली. पवार व पठारे यांनी पुन्हा दुसऱ्यांदा कामावर जाऊन कामाची पाहणी केली असता ठेकेदार हा डांबराचा वापर कमी करत असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ काम थांबवण्याच्या सूचना दिल्या. व नियमात काम न केल्यास ग्रामस्थांच्या रोषाला सामोरे जावे लागेल असा इशाराही दिला.

याबाबत अधिक माहिती अशी की, गेली एक वर्षापूर्वी रूईछत्रपती फाटा ते पठारे वस्ती रस्त्याचे काम मंजूर झाले होते. मात्र ठेकेदाराच्या आडमुठेपणा मुळे हे काम उशिरा सुरू करण्यात आले. अवघ्या दोन दिवसात रस्त्यावर खडी टाकून काम उरकविण्याचा ठेकेदाराचा प्रयत्न ग्रामस्थांनी हाणून पाडला. दोन दिवसांपूर्वी सुरू केलेले कामात डांबराचा कमी वापर करणे, पाणी कमी वापरणे, रोलिंग न करणे आदी तक्रारी ग्रामस्थांनी यावेळी केल्या.

पवार यांनी पीडब्ल्यूडीचे अधिकारी कोतकर यांना फोन केला व कामात सुरू असलेला निकृष्ट



पणा उघड केला. मात्र शासकीय इंजिनिअरच ठेकेदाराला पाठीशी घालत असल्याचा आरोप दत्ता नाना पवार यांनी केला आहे. यावेळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

रूईछत्रपती फाटा ते पठारे वस्ती रस्ता दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा रस्ता आहे. गेली २५ वर्षांपूर्वी या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. हा रस्ता व्हावा ही गेली अनेक वर्षांपासूनची मागणी ग्रामस्थांची होती. रूईछत्रपती येथे ग्रामीण आरोग्य केंद्र असल्याने सुपा परिसरातील नागरिकांना या रस्त्यावरून ये- जा करावी लागते. तसेच शेतकऱ्यांनी पिकवलेला शेतीमाल मुख्य बाजारपेठ असलेल्या सुपा, पारनेर, नगर, पुणे याठिकाणी नेण्यासाठी या रस्त्याचा वापर केला जातो. यासह शाळेतील विद्यार्थी, दुध उत्पादक शेतकरी, सुपा औद्योगिक वसाहतीमधील कामगार यांना रात्री अपरात्री या रस्त्यावरून ये-जा करावी लागते. रस्त्यासाठी निधी मंजूर झाला रस्त्याने कामही सुरू झाले मात्र ते अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असल्याने ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

**ठेकेदाराला आश्रय कोणाचा ही तर दंडीलशाही !**

शासकीय निधी खर्च करून तो बनविण्यात येणारा रस्ता हा इस्टिमेट प्रमाणे केला जातो. यादरम्यान स्थानिक ग्रामस्थ अथवा प्रवासी यांनी काही तक्रारी केल्या तर समोरासमोर येऊन त्याचे शंका निर्सन केले जाते. परंतू रूईछत्रपती फाटा ते पठारे वस्ती रस्त्याचा ठेकेदार हा दंडीलशाहीने वागत असल्याचे दिसून आले. दि.१२ डिसेंबर रोजी बंद केलेले काम कुणालाही न जुमानता त्याने दि. १७ डिसेंबर रोजी सुरू केले. हे काम देखील ग्रामस्थांनी हाणून पाडले. मग या ठेकेदाराला आश्रय कुणाचा असा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

# सत्कर्म फाउंडेशनच्यावतीने श्री भानोबा मंदिर परिसराची स्वच्छता

जनप्रवास : वार्ताहर



पाटस : येथील कुसेगावची श्री भानोबा देवाची यात्रा नुकतीच संपन्न झाली. यात्रेनंतर मंदिर परिसरात साचलेला कचरा सत्कर्म फाउंडेशन, पाटस यांच्यावतीने गोळा करून मंदिर परिसराची साफसफाई करण्यात आली.

कुसेगाव येथील श्री भानोबा देवाची यात्रा सालाबाद प्रमाणे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दोन दिवस चाललेल्या यात्रेमुळे मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचला होता. त्यामुळे मंदिर परिसरात अस्वच्छता दिसून येत होती. तसेच तेथे पडलेल्या नारळाच्या शेंड्या व फुलांमुळे मंदिर परिसरात दुर्गंधी पसरली होती. सदर कचरा सत्कर्म फाउंडेशन, पाटस यांच्यावतीने गोळा करून मंदिर परिसराची साफसफाई करण्यात आली.

पाटस येथील सत्कर्म फाउंडेशन नेहमीच काही ना काही आगळीवेगळी संकल्पना राबवत असते. याही वेळेस यात्रेमुळे मंदिर परिसरात होणारा कचरा लक्षात घेऊन मंदिर परिसराची साफसफाई करण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून तो अंमलात आणला. यातून सत्कर्म फाउंडेशनने नागरिकांना आपल्या परिसराची स्वच्छता राखण्याचा संदेश दिला. त्यांच्या या स्वच्छता मोहिमेमुळे कुसेगाव येथील नागरिकांनी त्यांचे कौतुक केले.

यावेळी त्यांच्या मदतीला कुसेगावचे संतोष भोसले, उत्तम रुपनवर, ग्रामपंचायत सदस्य दिपक रूपनवर, किरण गायकवाड, महेश रुपनवर, पै. विनोद रूपनवर, शिवाजी रुपनवर, अमित शितोळे, किशोर चव्हाण, किशोर शितोळे व आदर्श सरपंच मनोज फडतरे हे होते.

सदर स्वच्छता मोहिमेत सत्कार फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक नागरगोजे यांच्यासह अनिल ठवरे, पत्रकार मिलिंद शेंडगे, प्रणय काकडे, दत्तात्रय सूर्यवंशी, मेजर आबासाहेब चोरमले, निलेश भागवत, केतन वायभासे, प्रथमेश जाधव, वैभव पानसरे, शंकर आखाडे इ. सदस्य सहभागी झाले होते.

## थोडक्यात



### गुजराथी परिवार व झालानी परिवाराने ७४ वर्षापासून जपला ऋणानुबंध

अहिल्यानगर : शहरातील कापड बाजार म्हणजे अगदी मोक्याची जागा आणि हीच जागा कोणताही मोबदला न घेता गुजराती परिवाराकडून झालानी परिवारास परत देण्यात आली.शहरातून या दोन्ही परिवारांचा कौतुकाचा वर्षाव होत आहे.ज्या दुकानापासून आपली व्यवसायाची सुरुवात झाली्. आणि भरभराट झाली ते दुकान कोणत्याही मोबदल्याशिवाय परत द्यायचे असा सर्वानुमते निर्णय गुजराती परिवाराने घेतला दत्त जयंतीचा मुहूर्त साधून झालानी परिवारातील सुधीर,डॉ.कैलास, दीपक,जगदीश,राजेश ,रोहित, अक्षत, सौरभ, डॉ.अश्विन, निखिल, नमन, निहार आणि सलोनी या सर्वांना बोलावून यथोचित शाल,श्रीफळ व बुके देऊन सत्कार केला्.आणि मनापासून झालानी परिवाराचे आभार मानले. गुजराथी परिवार व झालानी परिवार यांच्याकडून सामाजिक बांधिलकीचे दर्शन. असं म्हणतात,कृतज्ञता ही जो व्यक्त करतो.त्याला आणि ज्याच्याबद्दल व्यक्त केली जाते त्याला असे दोघांचेही जीवन सुंदर बनवते.अशीच कृतज्ञता व्यक्त केली जात आहे.अहिल्यानगर शहरातील सुप्रसिद्ध बंबईवाला मिठाईचे संचालक आणि सर्व झालानी परिवार व गुजराथी परीवार यांनी ७४ वर्षापासूनचा ऋणानुबंध जपला आहे.

### एनएसडीसी आणि फिजिक्सवालाच्या भागीदारीतून भारत इनोव्हेशन ग्लोबल उपक्रमाची सुरुवात

पुणे : नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन इंटरनॅशनल (एनएसडीसी इंटरनॅशनल) आणि भारतीय एडटेक कंपनी फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) यांनी संयुक्तपणे भारत इनोव्हेशन ग्लोबल प्रायव्हेट लिमिटेड (बीआयजी) हा उपक्रम सुरू केला आहे. हा उपक्रम म्हणजे भारताला शिक्षणाच्या एका जागतिक केंद्रामध्ये परिवर्तित करण्याचे लक्ष्य प्राप्त करण्याच्या दिशेने उचलले गेलेले पाऊल आहे. बीआयजी हा उपक्रम शिक्षण व मनुष्यबळाची गरज यांचा मेळ साधण्यावर लक्ष केंद्रित करतो व हे करताना लवचिक, तंत्रज्ञानापासून प्रेरित अध्ययनाच्या मार्गांनी अभ्यासक्रम व रोजगारक्षमता यांच्यातील दरी भरून काढण्याचा प्रयत्न करतो. बीआयजीमधून विविध स्तरांतील विद्यार्थ्यांना लक्ष्य केले जाणार आहे, ज्याची सुरुवात शाळांतील ११ व १२ वीच्या इयत्तांपासूनच कौशल्य प्रशिक्षणाला अभ्यासक्रमात औपचारिकरित्या समाविष्ट करण्यापासून केली जाणार आहे.

### नगरमधील राष्ट्रीय कामगार संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी उमेश साठे

अहिल्यानगर : राष्ट्रीय कामगार संघटना (अहमदनगर)



अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी उमेश साठे यांची निवड करण्यात आल्याची माहिती राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जाधव यांनी दिली. अहिल्यानगर येथील शासकीय विश्रामगृह येथे राष्ट्रीय कामगार संघटना संस्थापक अध्यक्ष अशोक जाधव धनगावकर यांच्या हस्ते हे नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष अनिस खा पठाण, राष्ट्रीय सचिव शेख हरून नुरामत, राष्ट्रीय सहसचिव सय्यद रफिक युसुफ मार्गदर्शक तथा बांधकाम कामगार नोंदणी अधिकारी चंद्रपूर आत्माराम धनगर, नाका कामगार प्रदेशाध्यक्ष गोरख गव्हाणे अनेकांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याशेजारी बॅरीकेट लावा : आव्हाड

अहिल्यानगर : अनेक वर्षापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याची मागणी करण्यात आली असून ही मागणी मान्य झाली व जुन्या पुतळ्याशेजारी नवीन पुतळा उभारण्यासाठी सुशोभीकरण करण्यात आले. व सुशोभीकरण करण्याचे काम पूर्ण झाले असून देखील मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नवीन पुतळा बसवण्यात आला नसून जुना पुतळा आहे त्या ठिकाणीच ठेवण्यात आलेला आहे मात्र त्याला संरक्षण भिंत नसल्याने कोणतीही घटना घडू शकते व शेजारी लावण्यात आलेले पिविंग ब्लॉक वर दुपारच्या सुमारास वाहन गेली व पेविंग ब्लॉक खचून सुदैवाने पुतळ्यावर वाहन गेली नाही त्यामुळे मोठा अनर्थ टळला असून. अशी कोणतीही घटना घडू नये त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला बॅरीकेट लावण्यात यावे अशी मागणी रिपाई आंबेडकर पक्षाचे रोहित आव्हाड, बौद्धचार्य संजय कांबळे, भीमसैनिक जिवा कांबळे, आरपीआय आठवले गटाचे अविनाश भोसले यांनी मनपा आयुक्त यांची भेट घेऊन मागणी केली आहे.

### तालुकास्तरीय स्पर्धेत माळवाडगाव शाळेचे घवघवीत यश

माळवाडगाव : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे झालेल्या श्रीरामपूर तालुका विविध गुणदर्शन व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये तालुक्यातील माळवाडगाव येथील जिल्हा परिषद शाळेने घवघवीत यश मिळविले आहे. हस्ताक्षर स्पर्धेत कुमार गटात देवयानी सुनील आसने हिने तर वेशभूषा नुसार सादरीकरण कुमार गटात प्रसन्ना राजेंद्र गोरे या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक मिळवला असून त्यांची जिल्हास्तरीय होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उद्धव शेळके, उपाध्यक्ष पत्रकार संदिप आसने व सर्व सदस्य तसेच सरपंच मीना मोरे, उपसरपंच शाम आसने व सर्व ग्रामपंचायत सदस्य यांनी या विद्यार्थिनींचे कौतुक केले. या विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक देविदास मुंतोडे सर, शेळके सर, श्रीमती बोर्डे मॅडम, मारिया साळवे मॅडम, संगीता साळवे मॅडम, श्रीमती तोडमल मॅडम, पाचपिंड सर, धोंगडे सर, श्रीमती बोबडे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

# सोलर पंप मिळेपर्यंत वीज जोड द्या

## आ.आशुतोष काळेंची हिवाळी अधिवेशनात मागणी

जनप्रवास : वार्ताहर



कोळपेवाडी : महायुती शासनाने शेतकऱ्यांच्या वीज पंपासाठी सोलर उर्जेचा वापर करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह असून शेतकऱ्यांचे ७.५ एचपी पर्यंतच्या वीजपंपाचे वीज बिल माफ करून मागेल त्या शेतकऱ्याला सोलर पंप देण्याचा निर्णय अतिशय महत्वाचा असून शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायद्याचा आहे. परंतु महावितरणकडे शेतकरी नवीन वीज कनेक्शनची मागणी करण्यासाठी गेले असता त्यांना प्राधान्याने सोलर पंप मागणीचे अर्ज भरण्यासाठी सांगितले जात आहे. मात्र शेतकऱ्यांना सोलर पंप उपलब्ध होण्यासाठी जवळपास चार ते सहा महिन्याचा कालावधी लागतो. त्या दरम्यान शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यात अडचणी येवून शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना सोलर पंप मिळेपर्यंत नवीन वीज जोड द्यावी अशी आग्रही मागणी आ.आशुतोष काळे यांनी सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनात केली आहे.

हिवाळी अधिवेशनात आ.आशुतोष काळे यांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नाकडे लक्ष वेधतांना ते म्हणाले की, महायुती सरकारने राज्यातील जनतेच्या सर्वांगीण हिताला प्राधान्य देवून अनेक महत्वाकांशी निर्णय घेतले असून शेतक-यांच्या अडचणी दुर करण्यासाठी शेतकऱ्यांना आधार देण्याचा सरकारकडून निश्चितपणे प्रामाणिक प्रयत्न केले जात आहे.शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी शेतकऱ्यांना ७.५ एचपी वीजपंपाचे वीज बिल माफ करून भविष्यात वीज बिल भरावेच लागणार नाही यासाठी अनुदानावर वीज सोलर पंप दिले जात आहे. हा शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्वाचा निर्णय असून त्यामुळे शेतकऱ्यांचा वीज बिलाचा खर्च कायमचा दूर होवून त्यांच्या आर्थिक अडचणी दूर होणार आहेच. त्याच बरोबर शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होवून जंगली जनावरांच्या दहशतीखाली रात्री पिकांना पाणी देण्याचा त्रास कायमचा बंद होवून जंगली जनावरांपासून त्यांची सुटका होणार आहे. सोलर पंप योजना शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे परंतु जोपर्यंत सोलर पंप शेतकऱ्यांना उपलब्ध होत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी नवीन वीज जोड मिळणे गरजेचे आहे. तसेच नदीकाठी अनेक शेतकरी जागा घेवून विहीर बांधतात व त्या ठिकाणाहून शेतीसाठी पाईपलाईनच्या माध्यमातून पाणी आणतात त्या ठिकाणी सोलर पंप बसविणे शक्य नाही त्या शेतकऱ्यांना देखील नवीन वीज जोड द्यावी अशी मागणी आ.आशुतोष काळे यांनी केली.

# आठरे पाटील पब्लिक स्कूलचे शनिवारी वार्षिक स्नेहसंमेलन

**विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने अनेक उपक्रमांचे आयोजन**

जनप्रवास : प्रतिनिधी

अहिल्यानगर : शहराच्या सावेडी विभागातील, वडगांव-गुप्ता रोड वरील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाते.या उपक्रमात विद्यार्थी हे उत्साहाने सहभागी होऊन, आपलया सुप्त गुणांना वाव देतात, याच उपक्रमांतर्गत शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ शनिवार दि.२१ डिसेंबर, २०२४ रोजी दुपारी १:०० वा. आयोजित करण्यात आलेले आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून अहिल्यानगर शहराचे आमदार संग्राम जगताप तसेच सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक नामवंत व्यक्ती ही उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी व मान्यवरांच्या शुभहस्ते वर्षभरात घेण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धा व इतर परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिके व स्मृतिचिन्हे देऊन गुण-गौरव करण्यात येणार आहे.तसेच शाळेच्या मैदानावर कवायत संचालन, रोप मललखांब, मललखांब, लेझीम, झांज, जिम्नॅस्टिक, घोडेस्वारी अशा विविध क्रीडा प्रकारांची रोमांचक प्रात्यक्षिके आणि सांस्कृतिक कार्यक्रमात विविध नृत्य, लोककला, देशभक्तीपर नृत्य पारंपारिक वेशभूषेत सादर करणार आहेत.



# त्रिमूर्तीमध्ये सुर्यनमस्काराच्या कार्यशाळेचे आयोजन

जनप्रवास : प्रतिनिधी

टाकळीभान : विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य राखण्यासाठी नियमित सूर्यनमस्कार करणे गरजेचे आहे सकाळी सूर्योद्यानंतर श्वासाचे नियमन करून एका विशिष्ट क्रमाने १२ पवित्रे करणे याला सूर्यनमस्कार म्हणतात . सूर्यनमस्कारामुळे आपले आरोग्य चांगले राहते आणि आपल्या स्मरणशक्तीचा ही विलक्षण विकास होतो . सूर्यनमस्कार ही तथाकथित सूर्य - उपासनाच आहे असे प्रतिपादन संदीप सुधीर कासार संस्थापक अध्यक्ष श्री श्री रविशंकर विद्यामंदिर वडाळा महादेव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताने केले. त्रिमूर्ती माध्यमीक विद्यालय घोगरगाव येथे सुर्यनमस्काराच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले प्रसंगी ते बोलत होते. वडाळा महादेव येथे ४ फेब्रूवारी २०२५ रोजी रथसप्तमी निमित्ताने भव्य जिल्हा स्तरीय ( सूर्यजन्म)योग स्पर्धा आयोजित केली असून सर्वांना या स्पर्धेत भाग घेण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. यावेळी सूर्यनमस्कार कसे करतात त्याची प्रात्याक्षिके करून दाखविले. कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य संतोष जावळे यांनी विद्यार्थ्यांनी रोज सूर्यनमस्कार व योग नियमितपणे करावा असे आवाहन केले. यावेळी संदीप काळे, मनेष वेताळ, नितीन साळवे, अर्चना जगताप, अनिल पटारे, ललिता डिके ,अमोल बहिरट, रेखा दिवे, विकास कौटे, कृष्णा शिंदे, प्रियंका कोरडे, पूजा ढोकणे, वनिता नानेकर आदी उपस्थित होते. संभाजी गारुळे यांनी आभार मानले.

# मांडवगण येथील सिध्देश्वर मंदीरातील दानपेटी चोरणारा आरोपी चार तासात गजाआड

जनप्रवास : प्रतिनिधी



श्रीगोंदा : तालुक्यातील मांडवगण येथील सिध्देश्वर मंदीरातील दान पेटी व दान पेटीतील रोख रक्कम चोरी करणारा आरोपी श्रीगोंदा पोलिसांनी ४तासाच्या आत जेरबंद केला

सविस्तर वृत्त असे की, १६ डिसेंबर २०२४ रोजी रात्री १०/४५ वाजण्याच्या सुमारास तालुक्यातील मांडवगण गावातील सिद्धेश्वर मंदिराच्या आतील गाभा-यातील एक फुट लाकडी दानपेटी सह १७,०००/- रुपये रोख रक्कम अंदाजे (निश्चीत रक्कम माहीती नाही) कोणीतरी चोरुन नेली असल्याबाबत देवस्थान मंदीराचे पुजारी पोपट गणपत खराडे, वय ७३ वर्षे, सिद्धेश्वर महादेव मांडव्य ऋषी देवस्थान ट्रस्ट रा. मांडवगण , ता. श्रीगोंदा यांच्या फिर्यादवरुन श्रीगोंदा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचा गुन्हा दाखल होताच गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन सदर गुन्हयाचा तपास. पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पोहेकों एन ए गाडगे हे करत असताना पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी श्रीगोंदा पोलीस स्टेशन गुन्हे शोध पथकातील पोकों/आनंद मैड, पोकों/संदीप राऊत, व श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोकों/संदीप जाधव, पोकों/फारुक मन्यार, पोकों/सचिन गोरे, पोकों/संदीप शिरसाठ, पोकों/संदीप आजबे, पोकों/योगेश भापकर यांना आरोपीचा शोध घेण्याकरता रवाना केले असता, तांत्रीक तपासाच्या आधारे आरोपी बाळु वसंत घोडके वय ४१ वर्षे रा. महाडुळवाडी. मांडवगण ता. श्रीगोंदा याने केला असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयातील आरोपीचा शिताफीने शोध घेवुन ४ तासाच्या आत पोलिसाने मांडवगण गावच्या शिवारात अटक करून त्यांस सदर गुन्हयात दिनांक १७ डिसेंबर२०२४ रोजी अटक करुन न्यायालयात हजर केले असता. न्यायालयाने त्यांस पाच दिवसा ची पोलीस कस्टडी रिमांड सुनावले असता पोलीस कस्टडी दरम्यान आरोपी बाळु वसंत घोडके याच्याकडून नमुद गुन्हयात चोरुन नेलेली २००/- रुपये किंमतीची दानपेटी व दान पेटीमधील १७,६००/- रुपये किमतीची रोख रक्कम हस्तगत करुन जप्त करण्यात आली आहे.

# मानवी जीवाला नरदेह मिळाला पण कळाला नाही : दादा महाराज खर्डे

जनप्रवास : प्रतिनिधी

माळवाडगाव : मानवी जीवाला हा नरदेह मिळाला पण तो कळाला नाही संसारातले सुख जवसाच्या दाण्या एवढे व मधमाशांच्या थेंबाएवढे आहे दु:ख मात्र पर्वता एवढे आहे असा उपदेश वैजापूर तालुक्यातील शिरसगाव येथील दादा महाराज खर्डे यांनी माळवाडगाव खडकवस्ती येथे कीर्तनातून भाविकांना केला

आपण सद्गुरु गंगागिरी महाराज, ब्रह्मलीन सद्गुरु नारायणगिरी महाराज यांचे पूजनीय वारकरी आहात. साधुसंत महात्मे हे जगाच्या कल्याणासाठी तर माणसाला जागे करण्याचे महान असे कार्य करतात जीवन जगत असताना भगवंत परमात्म्याचे नामस्मरण चिंतन करा कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही मनुष्य देह वाईट नाशवंत आहे या देहाचा शरीररुपी शिडीचा वापर करून भगवंत पांडुरंग विठोबाचे दास झाले पाहिजे प्रत्येक जण संसारात नित्याने चिंतन करतो पण परमार्थ कार्यात चिंतन करत नाही संसाराच्या अधीन जाऊन सुखाची अपेक्षा करत असतो परमात्मा सत्य आहे मायेचा आहे या मायेमुळे माणसाला परमार्थ कार्याचा विसर पडला आहे सुख जवसासारखे पण दु:ख मात्र पर्वता एवढे आहे साधुसंत प्रपंच संसार न करता जीवन जगत आहे माणसाला जागे करण्यासाठी ते वैकुंठातून या भूमीत जन्माला आले आहे कीर्तन हे करमणुकीचे साधन नसून मानवी अंतकरणातील कण काढण्याचे महान कार्य करत असतात तेव्हा आपण कीर्तनात अंतर मुखी झालो पाहिजे देवाच्या दारात माणसाने एक क्षणभर उभा राहून हरी नामाचे चिंतन केले पाहिजे असे निरूपण दादा महाराज खर्डे यांनी कीर्तनातून भाविकांना केले संतोष थोरात यांनी महाराजांचे संत पूजन केले तर पत्रकार विठ्ठलराव आसने यांनी आभार मानले.

# प्रगती विद्यालयासमोरील उघड्या डीपीला संरक्षण कवच बसविण्याची मागणी

जनप्रवास : प्रतिनिधी

राहुरी : शहरातील प्रगती विद्यालयासमोर असलेल्या उघड्या डीपीला संरक्षण-कवच बसविण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते अनुसंगम शिंदे यांनी उपकार्यकारी अभियंता श्री.बार्से यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे भर पेठेत असलेल्या या उघड्या डीपी पासून भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रगती विद्यालयातील विद्यार्थ्यांची डीपी समोरील रस्त्यावरून ये-जा चालू असते. प्रगती विद्यालयासमोरील मैदानात दलित-आदिवासी समाजाच्या लोकांची वस्ती आहे. त्या वस्तीतील लहान-लहान मुले मैदानावर खेळत असतात व त्यांचीही वर्दळ या डीपीच्या आसपास असते.भविष्यात काही हानी झाल्यास त्या होणाऱ्या



घटनेला जबाबदार कोण ? एम.एस. ई. बी. ने लवकरात-लवकर या उघड्या डीपीला संरक्षण कवच बसवावे, अशा प्रकारची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आलेली आहे.

# प्राईड ॲकेडमीमध्ये संस्कारक्षम पिढी घडवण्याचे काम : भाऊसाहेब मगर

## आजी- आजोबा मेळावा उत्साहात संपन्न

जनप्रवास : वार्ताहर

टाकळीभान : प्राईड अकॅडमी येथे आजी- आजोबा मेळाव्यासारखे उपक्रम घेऊन संस्कारक्षम पिढी घडविण्याचे उत्कृष्ट काम केले जाते असे प्रतिपादन टाकळीभान प्री स्कूल मध्ये आजी आजोबा मेळाव्या प्रसंगी माजी सरपंच भाऊसाहेब मगर यांनी केले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विवेक तुपे होते.

याप्रसंगी माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक ज्ञानेश्वर मुरकुटे, मा. सभापती व प्राईड अकॅडमीच्या संस्थापिका डॉ. वंदनाताई मुरकुटे, राजेंद्र कोकणे, सुनील रणनवरे, बाळासाहेब बेरड, अण्णा शेळके, बाबू तागड, घुमनदेवचे सरपंच

श्रीपाद गायकवाड, बाळासाहेब कांगुणे आदी उपस्थित होते.




यावेळी मगर बोलताना म्हणाली की आजोबा व घरातील नातवांचं अनोखे नाते असते, नातवाचे लाड, हट्ट आजोबा लाडाने पुरवत असतात. या कार्यक्रमाद्वारे शाळेतील आपल्या नातवांचे कौतुक आजोबांना पाहायला मिळते. नातवांनाही यामध्ये आनंद मिळतो. व येथील शिक्षण पद्धती पाहून निश्चितच या शाळेची विद्यार्थी संख्या भविष्यामध्ये मोठ्या संख्येने वाढून प्राईड अकॅडमीची वाटचाल प्रगतीच्या दिशेने सुरू राहील. यावेळी डॉ. वंदनाताई मुरकुटे म्हणाले की पाच वर्षाच्या आत मुलांच्या मेंदूचा विकास होत असल्याने यावेळी त्यांना योग्य समजेल अशा सोप्या पद्धतीचे शिक्षण व संस्कार होणे महत्त्वाचे असते. भक्कम पायावरच पुढील देशाचे सुजाण नागरिक तयार होतात. व चांगले नागरिक घडवण्याची जबाबदारी आमची आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्राईड अकॅडमी मध्ये फोनिक्स द्वारे व डिजिटल द्वारे अत्याधुनिक शिक्षण पद्धतीनचे शिक्षण दिले जाते. सर्वांचे प्रेम व सहकार्यामुळे प्राइड अकॅडमीची घोडदोड यशस्वी सुरू असून आपल्या सर्वांचे यास आशीर्वाद आहेत असे त्या म्हणाल्या. यावेळी बाळासाहेब कांगुने, सुनील रणनवरे यांनीही प्राईड अकॅडमी शाळेच्या प्रगतीचे कौतुक करून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. प्रारंभी प्राईड अकॅडमी शाळेच्या प्रगती विषयी शिक्षिका जयश्री वाडेकर यांनी माहिती दिली. यावेळी आजी-आजोबांनी आपल्या पाल्यांचे कौतुक करून येथील शाळेमुळे त्यांच्यामध्ये अमुलाग्र बदल झाल्याचे मनोगतात सांगितले. काही पालक आजोबांना आपल्या नातवांचे कौतुक करताना व प्रगती विषयी सांगताना अश्रू अनावर झाले.या कार्यक्रम प्रसंगी श्रीधर गाडे, बंडू बोडखे ,अर्जुन राऊत,रावसाहेब वाघुले, अशोक शिंदे, आप्पासाहेब वाघुले,अंबादास तुपे ,उत्तम पवार, पंढरीनाथ बिरदवडे, केतन शिंदे,ज्ञानेश्वर वखरे, राजेंद्र परदेशी, प्रभाकर बारस्कर , भागवत दवंगे आदींसह पालक आजी -आजोबा विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन आदिती जंगम यांनी तर आभार ज्ञानेश्वर मुरकुटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रदीप गोराणे ,सुप्रिया कोकणे, निकिता शिरसाठ यांनी परिश्रम घेतले.




# बावडा येथील एसटी बसथांबा इमारतीची दुरावस्था

जनप्रवास : प्रतिनिधी

बावडा : इंदापूर ते सराटी दरम्यान बावडा येथील आंबेडकर उद्याना नजीक असणाऱ्या एसटी बसथांबा निवारा इमारतीची मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झालेली दिसून येत आहे.लाखो रुपये खर्च करून प्रवासी नागरीक यांच्यासाठी एसटी बसथांबा निवारा इमारत उभारण्यात आली होती.गेल्या ०८ वर्षांपासून या ठिकाणच्या एसटी बसथांब्याची निवारा इमारत प्रचंड घाणीचे साम्राज्य पसरल्यामुळे धुळ खात पडली आहे.एसटी बस थांब्याच्या दुरावस्थे अभावी रस्त्याच्या कडेला भर उन्हामध्ये शालेय विद्यार्थी व प्रवाशांना एसटी बसची प्रतीक्षा करत उभे राहावे लागते.या ठिकाणचा एसटी बस थांबा हा तळीरामांचा अड्डा बनला आहे.

बावडा गावातील वालचंदनगर चौक, भांडगाव चौक, निरा नरसिंहपुर चौक या ठिकाणी शालेय विद्यार्थी व प्रवाशांची मोठी वर्दळ पाहायला मिळते.या ठिकाणी तासनतास शालेय विद्यार्थी व प्रवासी भर उन्हात एसटी बसची प्रतीक्षा करत उभे राहत असतात त्यामुळे या ठिकाणच्या चौकामध्ये शालेय विद्यार्थी व प्रवाशांच्या सोयीसाठी एसटी बस थांबा निवारा शेंड उभारण्यात यावे अशी अनेक दिवसांन पासूनची बावडा गावातील ग्रामस्थांची मागणी आहे.इंदापूर –अकलूज रस्त्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्याना नजीक असणाऱ्या एसटी बसथांब्याची इमारत स्वच्छतेअभावी गेल्या ०८ वर्षापासून धुळखात पडली आहे.या इमारतीचा वापर शालेय विद्यार्थी व प्रवासी नागरिकांना होत नसल्यामुळे हा एसटी बस थांबा असून नसल्यासारखा आहे.एसटी बसथांबा दुरावस्थे अभावी शालेय विद्यार्थी व प्रवासी नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

शालेय विद्यार्थी व प्रवाशांची गैरसोय लक्षात घेता आंबेडकर उद्याना शेजारील एसटी बस थांब्याच्या झालेल्या दुरावस्थे संदर्भात इंदापूर आगार प्रमुख यांनी तात्काळ लक्ष घालून या ठिकाणच्या एसटी बस थांब्याची स्वच्छता करून हा एसटी बस थांबा वापरा योग्य करावा त्याचप्रमाणे भांडगाव चौक व वालचंदनगर चौक येथे नव्याने एसटी बस थांबा शेडची उभारणी करण्यात यावी अशी ग्रामस्थातून व प्रवासी वर्गातून मागणी केली जात आहे.

# मार्स पेटकेअरने पाळीव प्राण्यांच्या पालकत्वाची माहिती प्रसिद्ध

पुणे : पाळीव प्राण्यांची काळजी आणि पोषण या क्षेत्रातील जागतिक अग्रणी असलेल्या, मार्स पेटकेअरने आपल्या ग्लोबल पेट पॅरंट सर्व्हेमधून महत्त्वपूर्ण माहिती प्रसिद्ध केली आहे. या सर्व्हेमध्ये जगभरातील २०,००० हून अधिक पाळीव प्राण्यांचे पालक (कुत्रा आणि मांजर मालक) सहभागी झाले होते, ज्यामध्ये भारतातील १००० उत्तरदाते देखील सामील होते. या सर्वेक्षणातून पाळीव प्राण्यांचा आपल्या जीवनावर होणारा महत्त्वपूर्ण प्रभाव दिसून येतो. मार्सच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या सर्वेक्षणांपैकी एक असलेल्या या अभ्यासातून असे दिसून आले की दोन–तृतीयांश पाळीव प्राणी मालकांनी त्यांच्या कुत्रा किंवा मांजरीला त्यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा भाग मानले आहे.

पाळीव प्राण्यांचे पालकत्व वाढत असताना, लोक पाळीव प्राण्यांना त्यांच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग मानत आहेत.

# मैदानी खेळाला व शिक्षणाला अधिक महत्त्व द्या : गटविकास अधिकारी भाऊसाहेब आहीरे

जनप्रवास : प्रतिनिधी

राहाता : शिक्षण आणि संस्काराने परिस्थितीवर मात करून जीवनमान व परिस्थिती बदलता येते हे सिद्धार्थ स्पोर्ट क्लबच्या अनेक सदस्यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखविले आहे शिक्षणाला अधिक महत्त्व द्या स्पर्धा परीक्षांकडे लक्ष केंद्रित करून जिद्द मेहनत व चिकाटी बाळगा अधिकारी होऊन प्रगतशील व विकसित समाजासाठी विकासाचे वाटसरू व आधारस्तंभ बना असे आवाहन राहाता तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी भाऊसाहेब अहिरे यांनी केले

सिद्धार्थ स्पोर्ट क्लब गौतमनगर मित्र परिवारा कडून बालपण एकत्रित घालविलेल्या परंतु शासन सेवेत तसेच इतर ठिकाणी उच्चपदस्थ अधिकारी व विविध क्षेत्रात पदाधिकारी व मान्यवर म्हणून नावलौकिक प्राप्त केलेल्या मित्रांचा गुणगौरव तथा स्नेह मेळावा महेंद्र बनकर,संजय गायकवाड ,कैलास पवार, राहुल त्रिभुवन,राजेंद्र जावळे यांच्या संकल्पनेतून आयोजित केला होता.

कार्यक्रमाचे प्रारंभी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून डॉ.बाबासाहेबआंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुरेगाव येथील सरपंच वाल्मीक आप्पा कोळपे होते.राहाता तालुका पंचायत समितीचे गट विकास अधिकारी भाऊसाहेब अहिरे, कोपरगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक



दिलीप पगार ,अंबडचे पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक हारून शेख ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र मेहरखांब ,आदर्श शिक्षक बापू दिवे ,सेवा कार्यातील सामाजिक कार्यकर्ते वसंतराव खरात, अनिल शिवरकर, दीपक गरुड, आप्पासाहेब भांड, बंडू वाके ,प्राध्यापक राजेंद्र चव्हाण, कर्जत येथील रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक संकुलाचे कार्यालयीन अधीक्षक सुरेश पवार, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना गटविकास अधिकारी भाऊसाहेब अहिरे म्हणाले की मोबाईलवर खेळ खेळून आयुष्याचा खेळ करण्यापेक्षा मैदानी खेळा बरोबरच शिक्षणाला अधिक महत्त्व देऊन जीवनाचा चांगला मेळ घाला मैदानी खेळ शारीरिक स्वास्थ्या बरोबरच जीवनात शिस्त व संस्कार देतात मात्र त्या तुलनेत बदलत्या युगात मोबाईल वरील खेळ आपले व कुटुंबाचे शारीरिक स्वास्थ्य हरपून बसण्यास व संस्कार मोडीत काढण्यात कारणीभूत ठरत आहे हे मोठे दुर्दैव आहे. परिस्थिती कितीही खडतर असली तरी शिक्षण परिस्थितीवर मात करते त्याचा प्रत्यक्ष अनुभव सिद्धार्थ स्पोर्ट क्लब मधल्या प्रत्येक सदस्यांनी घेतलेला आहे

यामुळे परिस्थितीच्या नावाने रडत बसण्यापेक्षा शिक्षणाला अधिक महत्त्व देऊन स्पर्धा परीक्षांवर लक्ष केंद्रित करा जिद्द चिकाटी व मेहनतीच्या जोरावर स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करून अधिकारी बना व सामाजिक विकासात योगदान द्या विकासाचे आधारस्तंभ व्हा असे आवाहन गटविकास अधिकारी भाऊसाहेब आहीरे यांनी केले.

# सौ. सुशीलामाईंच्या विचारांचा दूरदर्शीपणा आजही प्रेरणादायी : सौ. काळे

## स्व.सौ.सुशीलामाई काळे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न

जनप्रवास : वार्ताहर

कोपरगाव : पूर्वी महिलांना समाज प्रत्येक बाबतीत अलिप्त ठेवत असे. आज अशी परिस्थिती नाही. पूर्वीची स्त्री ही खऱ्या अर्थाने अष्टावधानी आणि दूरदर्शी विचारांची होती. याचा प्रत्यय स्व.सौ. सुशीलामाईंच्या व्यक्तिमत्त्वातून येतो.जे आपल्या मागे आहेत त्यांना सोबत घेऊन त्यांच्या आनंदात आनंद मानणाऱ्या कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांनी नेहमीच दुसऱ्यांच्या प्रगतीत आणि दुसऱ्याच्या सुखातच आनंद मानला. तीन दशकापूर्वी ग्रामीण भागात अशी परिस्थिती होती की,आठवीनंतर मुलींची संख्या कमी होत असे. त्यावेळी सौ.सुशीलामाई काळे यांनी कर्मवीर शंकररावजी काळे यांना मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू करण्याचा आग्रह धरल्यामुळे राधाबाई काळे कन्या विद्यामंदिर उभे राहिले. त्याचा फायदा घेवून मोठ्या प्रमाणात मुली उच्च शिक्षण



घेऊन प्रगती करीत आहेत. सौ. सुशीलामाईंच्या विचारांचा हा दूरदर्शीपणा आजही आपल्याला प्रेरणा देतो आणि त्याचा मला अभिमान वाटत असल्याचे प्रतिपादन गौतम बँकेच्या माजी संचालिका सौ. पुष्पाताई काळे यांनी केले.

कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव–कोळपेवाडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे कन्या विद्यालयात, स्व. सौ. सुशीलाताई ऊर्फ माईसाहेब काळे यांचे स्मृतिप्रीत्यर्थ भव्य वक्तृत्व स्पर्धा पार पडल्या. यावेळी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना त्या बोलत होत्या. त्या म्हणाल्या की,वक्त्याने नेहमी विषय समजून घेऊनच बोलले पाहिजे.विद्यार्थ्यांच्या जीवनात, स्पर्धा असल्याशिवाय प्रगती होत नाही. त्यामुळे सर्वांनी स्पर्धेचे नेहमीच स्वागत करून स्पर्धेत सहभागी झाले पाहिजे आणि सहभागी होणाऱ्यांना प्रोत्साहन सुद्धा दिले पाहिजे. स्पर्धेत सहभागी होतांना स्पर्धा ही नेहमी निकोप राहील यासाठी प्रयत्न करून स्पर्धा संपली की, ज्ञान आणि प्रेमातून मैत्री वृद्धिंगत करून एकमेकांप्रती आदर वाढवा असा मौलिक सल्ला सौ.पुष्पाताई काळे यांनी उपस्थित स्पर्धकांना दिला.

याप्रसंगी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन शंकरराव चव्हाण, संभाजीराव काळे,.अरूण चंद्रे, कचरू कोळपे, भाऊसाहेब लूटे, बाळासाहेब ढोमसे, डॉ.आय.के. सय्यद, माजी प्राचार्य शेख, सतीश नरोडे, पराग काळे, रयत संकुलाचे प्रमुख प्राचार्य प्रकाश चौरे,प्राचार्या सौ. हेमलता गुंजाळ, मुख्याध्यापक राजेंद्र पाचोरे, उपप्राचार्य मधुकर गोडे, प्र.पर्यवेक्षक सुरेश खंडिझोड आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी व्हा.चेअरमन शंकरराव चव्हाण यांनी विद्यालयासाठी अकरा हजार रुपये देणगी दिली. प्रास्ताविक नितीन बारगळ यांनी केले. सूत्रसंचालन श्रीम.स्मिता पाटील यांनी केले तर सिद्धार्थ कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बांधकाम व्यवसायात अधिकाधिक महिलांनी आले पाहिजे : हिरानंदानी

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : देशातील अन्य उद्योग, व्यवसायापेक्षा बांधकाम व्यवसायात वाढीचा वेग अधिक आहे. भारतात आज साधारणात २० टक्के व्यवसायवृद्धीचा दर बांधकाम क्षेत्रात आहे, भविष्यात यात अधिक वाढ होईल. यामुळे पुरुष प्रधान समजल्या जाणाऱ्या बांधकाम व्यवसायात अधिकाधिक महिलांनी आले पाहिजे असे मत नॅशनल रिअल स्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल (N-REDCO/ नरडेको) चे राष्ट्रीय अध्यक्ष आणि प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक निरंजन हिरानंदानी यांनी केले.

नॅशनल रिअल स्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल (N-REDCO/ नरडेको) माहीची स्थापना केली आहे. गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय, सर्व क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणारी राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च संस्था आहे. रिअल इस्टेट क्षेत्रातील महिला उद्योजकांना त्यांच्या महत्त्वकांक्षा पूर्ण करण्यासाठी 'माही' व्यासपीठाची स्थापना करण्यात आली आहे. हॉटेल शेरटॉन ग्रॅण्ड येथे 'नरडेको माही' आयोजित 'अध्यक्ष पदभार स्विकारण्याचा सोहळा' कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानवरून हिरानंदानी बोलत होते.

# वनविभागात खोदकाम करण्यासाठी वापरण्यात आलेले पोकलेन जप्त

**या गुन्ह्यातील आठ आरोपींची नावे तपासात निष्पन्न**

जनप्रवास : प्रतिनिधी

ओतूर : जुन्नर तालुक्यातील मौजे वडगाव कांदळी राखीव वनकक्ष क्र.४४ मध्ये अवैध रित्या विहीर खोदण्याच्या गुन्हे प्रकरणी आरोपी राजाराम ज्ञानदेव फापाळे यास जुन्नर न्यायालयाने दि १७ रोजी तीन दिवसांची वन कोठडी सुनाविन्यात आली होती. त्यानंतर दि.२० रोजी पुन्हा आरोपीस न्यायालयात हजर केले असता, आरोपीस न्यायालयीन कोठडी सुनावली असून दि.३ जानेवारी २०२५ पर्यंत त्याचं जामीन राखून ठेवला असल्याची माहिती असल्याची माहिती ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी लहू ठोकळे यांनी दिली.

विहीर खोदकामासाठी वापरण्यात आलेले पोकलेन मशीन वनविभागाकडुन जप्त करण्यात आले असून या गुन्ह्यातील आठ आरोपींची नावे तपासात निष्पन्न झाली असल्याचे वनविभागाच्या सूत्रांनी सांगितले.

वडगाव कांदळी राखीव वनकक्ष क्र.४४ मध्ये अवैध रित्या विहीर खोदण्याच्या गुन्ह्या प्रकरणी या गुन्ह्यात सहभागी असणारे विनोद बर्डे व त्याचे सहकारी गणेश रामदास माळी, जयवंत हिरामण बर्डे, नाथा तुकाराम



बोऱ्हाडे, कैलास मधुकर बर्डे, मंजय निवृत्ती निकम,शरद हिरामण बर्डे, किसन हिरामण बर्डे हे आठ जण तसेच अन्य इसम यांच्यावर ही वनविभागाकडुन कडक कारवाई करण्यात येणार असल्याची श्री ठोकळे यांनी सांगितले.

मौजे वडगाव कांदळी, येडगाव, हिवरे तर्फे नारायणगाव, खोडद, निमगाव–सावा, बोरी बु इत्यादी गावांमधील लोकांना आव्हान करण्यात येते की राखीव वनक्षेत्रामध्ये अतिक्रमण करणे अवैध रित्या खोदकाम करणे, वन्यप्राणी शिकार करणे, अवैध वृक्षतोड अथवा अशा कोणत्याही कृत्यास, कोणत्याही प्रकारे सहकार्य केल्यास वनविभागाकडुन सबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील असेही श्री ठोकळ यांनी सांगितले.

सदर कारवाई जुन्नर वनविभागाचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते, सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे,ओतूरचे वनपरिक्षेत्र लहु ठोकळ,परिविक्षांधीन वनपरिक्षेत्र अधिकारी निकीता बोटकर यांनी केली असून, पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी लहू ठोकळ हे करीत आहेत.

# मनपा अतिक्रमण विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात आयआय लाईन बाजार येथील नागरिकांची आयुक्तांकडे तक्रार

## अतिक्रमण कारवाईपूर्वी कायदेशीर नोटीसीने कळविण्याची मागणी

जनप्रवास : प्रतिनिधी

नगर : औरंगाबाद रोडवरील (जुना हॅरिस रस्ता), अहिल्यानगर येथील आयआय लाईन बाजार परिसरात विना नोटीस विना परवानगी महापालिकेच्या अतिक्रमणाच्या नावाखाली बेकायदेशीर कारवाई करण्यात येत असल्यासंदर्भात आयुक्त यशवंत डांगे यांना अजय मकासरे, नदीम जहागिरदार, शेख तन्वीर चांद, जमाल शेख, सय्यद वाहीद अब्दुल हमीद, पन्नालाल कटारिया,आरिफ अहमद शेख, नवेद शेख अल्ताफ, शेख सादिक अहमद, एस. डी. पटेल आदींनी निवेदन दिले. निवेदन स्वीकारल्यानंतर आयुक्त यशवंत डांगे यांनी जागांच्या कागदपत्रांची तपासणी करून त्यानंतर कारवाई करू, असे आश्वासन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, महापालिकेच्या



अतिक्रमण विरोधी पथकाची कारवाई सुरू असून, आम्ही सर्व रहिवासी वरील परिसरात वास्तव्यास असून, मोठ्या प्रमाणात येथे नागरी वस्ती आहे. येथील मालमत्ता आमच्या कायदेशीर मालमत्ता आहेत. मागील काही दिवसांपासून मनपा अधिकारी व कर्मचारी दर दोन दिवसाआड विना परवानगी विना नोटीस आमच्या मालकी हक्काच्या जागेत येतात व मोजमाप करून वेगवेगळ्या ठिकाणी खुणा लावत आहेत.

# ३ हजार विद्यार्थ्यांच्या सामुहिक वंदे मातरम्

## गायनातून राष्ट्रीय एकात्मतेचा अद्वितीय आविष्कार

पुणे : राष्ट्रीय एकता आणि देशभक्तीचे प्रतीक असलेले, बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेले रवींद्रनाथ टागोर यांनी संगीतबद्ध केलेले 'वंदे मातरम' हे प्रेरणागीत पुण्यातील तब्बल ३ हजार शालेय विद्यार्थ्यांनी एकत्रित गायले. यावेळी 'भारत माता की जय' आणि 'जय हिंद' चा एकच जयघोष स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर घुमला. तीन हजार विद्यार्थ्यांचा एकसंध आवाज आणि त्यातून व्यक्त झालेल्या देशप्रेमाने वातावरण भारावून गेले.

हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेतर्फे हिंदू सेवा महोत्सवाचे आयोजन स.प.महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले आहे. त्यामध्ये सामुहिक वंदे मातरम कार्यक्रमांतर्गत वीरमाता, वीरपत्नी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मेजर जनरल अमर कृष्णा (नि.), हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेचे राष्ट्रीय संयोजक गुणवंत कोठारी, संस्थेचे अध्यक्ष अशोक गुंदेचा, महोत्सवाचे अध्यक्ष कोहिनूर ग्रुपचे कृष्णकुमार गोयल, संस्थेचे महामंत्री किशोर येनपुरे, विंग कमांडर विनायक डावरे (नि.), अर्चना सिंग, माजी सैनिक सुनील काळे, यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमात वीरमाता, वीरपत्नी यांचा सन्मान करण्यात आला. राज्याच्या विविध भागातून वीरमाता, वीरपत्नी यावेळी उपस्थित होत्या. वंदे मातरम् या गीताचा इतिहास यावेळी कार्यक्रमात सांगण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी समूहगान सादर केले.

# कलाविष्कार व नृत्याविष्काराने प्रेक्षक झाले मंत्रमुग्ध

## सेनापती बापट विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न

जनप्रवास : प्रतिनिधी

पारनेर : अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे सेनापती बापट विद्यालय येथे मंगळवार दिनांक १७ डिसेंबर व १८ डिसेंबर २०२४ रोजी स्नेहसमेलन व पारितोषिक समारंभ उत्साहात संपन्न झाला. स्नेहसंमेलन एकूण चार सत्रांमध्ये मध्ये पार पडले मुख्य बक्षिस वितरण समारंभ पारनेरचे प्रसिद्ध युवा उद्योजक राजेश भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह आदरणीय छायाताई फिरोदिया यांना अभिप्रेत असलेले स्नेहसंमेलन दरवर्षी विद्यालयाकडून घेतले जाते असे सांगितले. आयुष्यात उज्वल यश संपादन करायचे असेल तर विद्यार्थ्यांमध्ये जिद्द आणि चिकाटी असणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली व प्रमुख अतिथींचा सन्मान करण्यात आला. शालेय प्रगतीच्या अहवालाचे वाचन विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कुलकर्णी यांनी केले. अध्यक्षीय भाषणात राजेश जी भंडारी यांनी विद्यार्थ्यांना आयुष्यामध्ये उज्वल यश संपादन करायचे असेल तर जिद्द आणि चिकाटी यांच्याबरोबरच आपल्या कामावर नितांत श्रद्धा असणे गरजेचे आहे असे सांगितले. आयुष्यातील इच्छित ध्येय प्राप्त करण्यासाठी आपले लक्ष ध्येयावर केंद्रित करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष, सल्लागार मंडळाचे




सदस्य, शाळा समितीचे चेअरमन अनिल भंडारी, शाळा समितीचे को– चेअरमन विलास कटारिया, शाला समिती सदस्य गुळवे सर, जगदाळे सर, डॉक्टर किशोर कुमार पुरकर व सिद्धार्थ वसतिगृहाचे संपत पवार सर यांचे हस्ते विद्यार्थ्यांना कला व क्रीडा क्षेत्रातील नैपुण्याबद्दल पारितोषिके प्रदान करण्यात आली. पारितोषिकाचे स्वरूप रोख रक्कम भेटवस्तू व प्रमाणपत्र असे होते. यादी वाचन ढोकळे सर यांनी केले. सूत्रसंचालन रायसोनी यांनी केले. आभार यावर्षीचे शिक्षक प्रतिनिधी श्री काकडे सर यांनी मानले.

दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात विज्ञान, चित्रकला व रांगोळी प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले व विद्यार्थ्यांनी शारीरिक शिक्षण प्रात्यक्षिके सादर केली. दुपार सत्रात पारनेरचे कलाप्रेमी शिरीष साळवे यांच्या हस्ते नटराजाचे पूजन करून रंगमंचाला श्रीफळ वाढविण्यात आले. विद्यार्थ्यांनी एका चढ एक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. अनेक कार्यक्रमांनी उपस्थितांना ठेका धरायला लावला. शाळा समिती सदस्य अमित जाधव यांनी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी उपस्थिती राहुल विद्यार्थ्यांचे कौतुक केले सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या इयत्ता दहावीतील विद्यार्थिनींनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमासाठी पालक वर्ग व विद्यालयाचे माजी विद्यार्थी खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.पस्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.संतोष कुलकर्णी, शिक्षक प्रतिनिधी श्री. दादाभाऊ काकडे ,विद्यार्थी प्रतिनिधी चि.ऋषिकेश पवार, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु.श्रुतिका महांडुळे सर्व अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# आपण जेव्हा एखाद्याच्या प्रेमात पडता

आपण जेव्हा एखाद्याच्या प्रेमात पडता तेव्हा ती व्यक्त आपल्याला खूप आवडत असते. जसे लहान मूल आपल्या आई वडिलांना आपले आदर्श समजते तसेच हेही असते. आपला जोडीदार परफेक्ट आहे. या भ्रमावर ही रोमॅण्टिक पसंती अवलंबून असते.

लग्नानंतर आपल्याला जाणवते की, ज्या व्यक्तीशी आपले लग्न झाले आहे तो आपल्या अपेक्षेप्रमाणे नाही. आपल्यात व त्याच्यात व्यक्तिमत्त्वाशिवाय इतर बरेच फरक आहेत. आपला जीवनाबद्दलचा दृष्टिकोन वेगवेगळा आहे. काम करण्याची पद्धत वेगळी आहे इ.


आपण आपल्या कल्पनेनुसार, अपेक्षेनुसार जोडीदाराला बदलण्याचा प्रयत्न करू लागता. इथूनच दुरावा निर्माण होतो. जर आपल्याला आपला संसार टिकवायचा असेल तर असहमत होण्याऐवजी सहमत व्हायला शिका व जो जसा आहे तसाच राहू द्या. या मार्गाने आपण एकमेकांविषयी खरा आदर जोपासू शकाल. आपण एकमेकांच्या आवडी-निवडींचा व रूचीचा आदर कराल तर आपले नाते सहज व निकोप राहील.

आदर करणे याचा अर्थ दुसऱ्या व्यक्तीत जे काही वेगळे आहे ते पसंत करणे. या गोष्टी जाणून घेण्यास व स्वीकारण्यास वेळ लागतो. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, आपण जोडीदाराला 'तू तुझ्या मार्गाने जा, मी माझ्या मार्गाने जाते' असे म्हणावे. आदर म्हणजे आपल्याला परस्परांच्या जवळ आणणारी गोष्ट.

# एकविसाव्या शतकात स्त्री-पुरुषांमध्ये लैंगिक संबंधांबद्दलची समज वाढली आहे

पुरूष लग्नाआधी जसे वागतात, तसेच लग्नानंतर वागले तर निम्मे घटस्फोट टळतील; आणि लग्नानंतर वागतात तशा लग्नाआधी वागल्या तर निम्मे विवाह होणारच नाहीत ! हे बोलणाऱ्याचे अनुभवाचे बोल असतील कदाचित; पण ही शक्य कोटीतली घटना नाही, हे सांगायलाच नको.

'लिव्ह इन रिलेशनशीप'च्या या काळात घटस्फोटाचं प्रमाण अमाप वाढलं आहे. मात्र, विवाहांची संख्या तेवढीच वाढली आहे. तेव्हा वरील विधानामुळे चर्चे च्या भेंडोळ्यात अडकून पटण्याचं कारण नाही. ज्यांनी आपल्या ताज्या पुस्तकाक या विधानाचा उल्लेख केला आहे, त्या सुप्रसिद्ध वकील मृणालिनी देशमुख यांनी धक्कादायक विधान करताना म्हटलं आहे, 'लग्न टिकत नाही-संसार टिकतो ! आणि तो प्रेमामुळे टिकत नाही, तर बांधिलकीच्या भावनेमुळे टिकतो.' जगात आजही इतर कोणत्याही प्रगत देशापेक्षा भारतात विवाहसंस्था स्थिर आहे आणि टिकणाऱ्या संसाराची संख्या मोठी आहे. या टिकाऊपणाचं मूळ भारतीय परंपरेमध्ये, संस्कारामध्ये आणि नाही म्हटलं तरी सामाजिक अप्रतिष्ठेच्या भीतीमध्ये आहे. श्रीमती देशमुख यांची 'घटस्फोट तज्ज्ञ' म्हणून ख्याती आहे. आदित्य चोप्रा, आमिर खान यांच्या सारख्या बड्या 'व्हीआयपीं'चे घटस्फोटांचे खटले त्यांनी चालवले आहेत. 'ब्रेकिंग अप' नावाचं पुस्तकच त्यांनी त्यांच्या अनुभवांवरून लिहिल आहे. घटस्फोटांचे चटपटीत किस्से सांगण्यासाठी त्यांनी हे पुस्तक लिहिलेलं नाही. घटस्फोट कमी व्हावेत; तसंच घटस्फोटानंतरचं जीवन, त्यावर झालेले घटस्फोटाचे परिणाम हे सांगून देशमुखांना माणसांना दिलासा द्यायचा आहे. त्यांच्याकडे एखादी 'डायव्होर्स केस' आली, तर त्या ती ताबडतोब न्यायालयात नेत नाहीत. घटस्फोटाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या त्या जोडप्याला देशमुख आधी कौटुंबिक सल्लागाराकडे पाठवतात. मात्र, या सल्ल्याचा उपयोग झाला नाही आणि जोडप्याचं मन निवळलं नाही, तर त्यांचा घटस्फोट अटळ आहे, अशी खात्री पटली तरच त्या केस कोर्टात नेतात.



तरूण पिढीमध्ये विवाहाबद्दल गांभीर्याची आणि जबाबदारीची भावना अद्याप आहे; मात्र धीर नसल्यामुळे आणि लग्नानंतरच्या परिस्थितीशी, वातावरणाशी जुळवून घेत नाही म्हणून तरूण जोडप्यांमध्ये घटस्फोटाचं प्रमाण वाढल आहे, असं श्रीमती देशमुख यांचं १७ वर्षांच्या व्यावसायिक अनुभवावर आधारित निदान आहे. बहुतांशी घटस्फोट जोडीदारांनी केलेल्या विश्वासघाताच्या संशयामुळे होतात, असं त्यांचं निरीक्षण आहे.

एकविसाव्या शतकात स्त्री-पुरुषांमध्ये लैंगिक संबंधांबद्दलची समज वाढली आहे; पण पुरूषाची स्त्रीबद्दलची दुटप्पी भूमिका बदललेली नाही, असा त्यांचा वाढत्या घटस्पोटांबद्दल निष्कर्ष आहे. अद्यापि पुरूष पत्नीला आपली खासगी मालमत्ता समजतो. 'सोशलनेस' च्या नावाखाली तो इतर स्त्रियांशी मोकळेपणानं वागतो; मात्र पत्नी त्याच्या जवळच्या मित्राशी हसूनखेळून बोलताना दिसली, तर त्याचा जळफळाट होतो. पतीच्या चारित्र्याचा संशय आला, तर पत्नी त्याबद्दल सतत धुसफूस करते; परूषाला मात्र पत्नीच्या चारित्र्याचा संशय आला, तर तो मारझोडीपासून हत्येपर्यंत कोणताही हिंसक प्रकार घडू शकतो, असंही त्यांच्या निदर्शनास आलं आहे. आर्थिक परावलंबन आणि मुलं या कारणांमुळे आजही अनेक स्त्रिया वैवाहिक जीवनात अपमान आणि उपेक्षा सहन करत राहतात. घटस्फोट मागण्याची त्यांना हिंमत होत नाही. घटस्फोटामुळे सामाजिक अप्रतिष्ठा होईल अशी भिती सुशिक्षित महिलांनाही वाटते, असं श्रीमती देशमुख यांना १७ वर्षांच्या व्यावसायिक जीवनात आढळलं आहे. मात्र, सर्वसाधारणपणे आर्थिक स्वावलंबनामुळे स्त्रियांचा आत्मसन्मान तसंच आपले हक्क व अधिकार याबद्दलची त्यांची जाणीव वाढली आहे, हे त्या आवर्जून सांगतात.

नवविवाहीत जोडप्यांशी हितगुज करताना श्रीमती देशमुख म्हणतात, 'प्रेमात पडून लग्न करणं चांगलंच; पण प्रेम टिकवणं महत्त्वाचं आहे. ते फार कठीण आहे. प्रेम असूनही संसार मोडतात अशा केसेस मी हाताळल्या आहेत. कर्तव्य, जबाबदारी, बांधिलकी हेच गुण संसार टिकवण्यासाठी उपयोगी पडतात.

# एकमेकांवर दोषारोप करणे सोडा

पन्नाशीनंतर पुरुषात आपल्या संपूर्ण जीवनाविषयी एक आत्मनिरीक्षणाची भावना असते. त्यामुळे त्याला एक नवी जीवन दृष्टी मिळते व तो त्या दृष्टीला अनुरुप एका आदर्श पत्नीची कल्पना करतो. या टप्प्यावर पुरुष स्त्रीच्या शारीरिक सौंदर्याविषयी न बोलता एका उत्तम मैत्रिणीविषयी बोलतो. या वयातील स्त्रिया पुरुषांमध्ये माधुर्य व सज्ञनता शोधतात. या वयात माणसे स्वकेंद्रीत होतात व त्यांच्या भावना कोमल होतात.


जीवनसाथीसंबंधित आपल्या बदलत्या इच्छा, आकांक्षा व अपेक्षा आपल्या जीवनावर परिणाम करतात. जीवनातील अनुभवावरुन आपण जीवनाशी तडजोड करायला शिकून घेतो. तडजोड म्हणजे आपसातील मतभेदाचे सारे मुद्दे सोडून देणे नव्हे, तर परस्पर समजुतदारपणाने समस्या सोडवणे होय.



दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे स्वत:च्या रागावर नियंत्रण ठेवायला शिकणे. काही निराशेचे, क्रोधाचे क्षण जीवनाचा सामान्य भाग आहे व अतिशय उत्तम संबंधातही ते येत असतात हे लक्षात ठेवायला हवे.

एकमेकांवर दोषारोप करणे सोडा. वैवाहिक जीवनातील बहुतेकजण भांडणे यामुळेच होतात व त्याचा परिणाम फक्त राग व निराशा हाच होतो. राग एखाद्या समस्येचा सूचक असतो. जोडीदाराचा राग फालतू समजून टाळू नका. त्याकडे लक्ष द्या व त्याचे कारण जाणण्याचा प्रयत्न करा. यामुळे भविष्यात उद्‌भवणाऱ्या बऱ्याच समस्या टाळू शकाल. आपण आपल्या जोडीदारासोबत ज्या गोष्टींचा आनंद घेऊ शकता त्या दुर्लक्षू नका. हाच वैवाहिक जीवनाचा खरा आनंद आहे. वैवाहिक जीवन आनंदाने समृद्ध करण्यासाठी एखादा निश्चित फॉर्म्युला नसतो. कारण वेगवेगळ्या लोकांच्या आनंदात स्त्रोतही शोधणे व त्यात रस घेऊन आनंदी होणे यामुळेच वैवाहिक जीवन आनंदी होते.

# हृदयाच्या समस्या हा मोठा रिस्क फॅक्टर, त्यामुळे नैराश्येचे सावट येते



एकविसाव्या शतकात शारीरिक आरोग्यापेक्षा मानसिक आरोग्य जास्त ठरु लागले आहे. म्हणजे बहुतेक शारीरिक आजारांच्या मुळाशी निराश, दु:खी मनच आहे, याचा साक्षात्कार आधुनिक जगाला झाला. आता तर निरोगी, दिर्घायुषी होणे हेही मानसिक आरोग्यावरच जास्त अवलंबून आहे. म्हणजेच आशावादी असलेल्या महिलाच जास्त निरोगी आणि दिर्घायुषी बनतात, असा निष्कर्ष येथील 'वुमेन्स हेल्थ इनिशिएटीव्ह स्टडीज' या संशोधनातून निघाला आहे. वुमेन्स हेल्थ इनिशिएटीव्ह स्टडीजमध्ये सहभागी झालेल्या महिलांचे सर्वेक्षण पिटसबर्ग युनव्हर्सिटीने नुकतेच केले होते. सर्वेक्षणात त्यांनी महिलांमधील मृत्यूचे प्रमाण, त्यांचे आजार याचा सर्वे केला. १९९४ पासून सुरु झालेल्या सर्वेक्षणात ५० पेक्षा जास्त वयोगटातील एक लाख महिलांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या.

ज्या महिला आशावादी होत्या त्या वाईटापेक्षा चांगले घडेल अशी अपेक्षा करीत होत्या. त्यांच्यातील मृत्यूचे प्रमाण नैराश्यवादी महिलांच्या मृत्यूच्या प्रमाणापेक्षा १४ टक्क्यांनी कमी होते. तसेच हृदयविकाराने मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण ३० टक्क्यांनी कमी असते. तसेच आशावादी महिलांमध्ये रक्तदाब, डायबेटिस किंवा धुम्रपानाचे प्रमाण तुलनेने खूप कमी असते.

सर्वेक्षण करणाऱ्या पथकाचे प्रमुख हिलरी टिंडल असून, त्यांनी दुसऱ्या व्यक्तीबद्दल अतिशय अविश्वास दाखविणाऱ्या महिलांचाही अभ्यास केला व त्यांची तुलना विश्वासू महिलांशी केली. अति अविश्वास दाखविणाऱ्या महिलांच्या गटास 'सिनिकल होस्टाइल' म्हटले जाते. 'सिनिकली होस्टाइल' गटातील महिलांनी मान्य केले की, ज्यांना आमच्या इतकीही माहिती नाही, त्यांच्याकडून ऑर्डर घ्यावी लागते किंवा त्यापेक्षा कोणावरच विश्वास न ठेवणे चांगले. या प्रश्नावरुन असे दिसते की या महिला इतरांवर अविश्वास दाखविणाऱ्या आहेत. नैराश्यवादी महिलांमध्ये कॅन्सरने मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण २३ टक्के आहे. दशकापूर्वी जे लोक स्वत:ला अतिआशावादी मानत होते, त्यांच्यात मृत्यूचे प्रमाण तुलनेने खूप कमी होते. नैराश्यवादी असणाऱ्यांमध्ये हे प्रमाण जास्त आहे.

हृदयाच्या समस्या हा मोठा रिस्क फॅक्टर असून, त्यामुळे मोठ्या प्रमाणात नैराश्याचे सावट येते. म्हणून विशाल दृष्टीकोन बाळगणे अत्यंत आवश्यक आहे. या सर्वेक्षणात असेही आढळले आहे की, आशावादी वृत्ती स्त्रियांपेक्षा पुरुषांच्या रक्षणाचे कार्य अधिक चांगल्याप्रकारे करते. फक्त हृदयविकाराशी निगडीत जेवढे रोग आहेत, त्यापासून आशावादी स्त्री व पुरुषांचे सारखेच रक्षण करते, असेही पाहणीत आढळले. हृदयविकार हा स्त्रियांचा 'नंबर वन किलर' होय. तीनपैकी एका महिलेचा मृत्यू त्यामुळे होतो.

# हल्लीच्या परिपक्क सुना सासूपुढे झुकू इच्छित नाहीत

हल्लीच्या नव्या सुना परिपक्क, शिकल्या सवरल्या नंतरच लग्न करून सासरी येतात. त्यांना सासरी आल्यानंतर आपली अस्मिता धोक्यात दिसू लागते. घरात सासुला असलेला मान पाहून ती चकीत होते. नातेवाईक, शेजारी-पाजारी तिच्याशी आपुलकीने वागत असतात. प्रत्येक बाबतीत तिलाच विचारले जात असते.यामुळे प्रतिभावान, सुंदर, ऑलराउंडर सासुपुढे सुनेला आपली प्रतिमा धूसर झाल्यासारखी वाटू लागते. पूर्वीही सासू-सुनात भांडणे होत असत, पण सुनेला आपल्या पोझिशनची जाणीव असे. आपण लहान आहोत हे ती विसरत नसे. परंतु हल्लीच्या परिपक्क सुना सासुपुढे झुकू इच्छित नसतात. तिला इतरांसमोर दिखाव्यासाठी सासुच्या पाया पडणेही रूचत नसते. त्यात श्रध्दा तर अजिबात नसते. त्यातच माहेरच्यांचा पाठिंबा मिळाल्यामुळे सून सासू-शी वाद घालत राहाते. आर्थिक बाबतीत ती सासुपेक्षा जास्त हूशार असते. सीए. एम.बीए., एम.ए. (इकॉनॉमिक्स), एमएस्सी (मॅथ्स) झालेली, आकड्यांशी खेळणारी सून घरातील आर्थिक स्थितीबाबत अवाजवी नव्या पिढीची खास ओळख आहे. सूनही याच पिढीचा एक भाग आहे. सासूच्या दागिन्यांवर व सासरच्या बँक बॅलन्सवर तिची नजर खिळलेली असते.



याबाबत तिच्यात थोडाही स्वाभिमान नसतो.खरे तर घराची सत्ता मिळवण्यासाठी सुनेने थोडे दमाने घ्यायला हवे. थोडा धीर धरायला हवा.सत्ता अनुभवाशिवाय सांभाळता येत नसते. घर चालवणे एवढे सोपे नसते.

त्यासाठी सुनेने नम्र होऊन राहायला हवे. तरच ती सासू-सासऱ्यांचे प्रेम व अधिकार मिळवू शकते. प्रेमाने व समजुतदारपणेच हे युध्द जिंकता येते. तशीही सासू प्रेमाची भुकेली असते. सून तिला जेवढे प्रेम देईल त्याच्या कित्येक पटीने ती सुनेला देईल.

त्यामुळेच सासुकडून सत्ता हिरावून घेण्यापेक्षा हळूहळू ती स्वत:ची ती सत्ता सुनेच्या हाती सोपवीन. कारण तिलाही आता विश्रांतीची गरज असते.

# माणसाच्या जीवनात आनंदाचे क्षण खूपच विरळ असतात



आनंद घेण्यासाठी दुःखी, उदास बनवणाऱ्या परिस्थितींपासून दूर राहायला हवे. आनंद हा मोठमोठ्या गोष्टीत नसतो, तर छोट्या छोट्या गोष्टीत दडलेला असतो. माणसाच्या जीवनात आनंदाचे क्षण खूपच विरळ असतात. त्यामुळेच सतत आनंदात राहणे कठीण असते. चला तर त्याचा शोध घेऊ या.

* जेव्हा आपण घरात अगदी एकट्या असाल व बोअर झाला असाल तेव्हा आपण आपले आवडते नियतकालिक वाचू शकता वा घरातील एखाद्या लहान मोठ्या कामातून आनंद व मानसिक समाधान मिळवू शकता.

* फावला वेळ आपल्या कुटुंबीयांसोबत घालवा. थोडा वेळ जोडीदारासोबत बसून गतायुष्यातील आठवणी ताज्या करा. जोडीने जुने अल्बम्स पाहा.

* रोज थोडासा व्यायाम करा. जर एकटीला व्यायाम करणे पसंत नसेल, तर जोडीदारासोबत काही एक्झरसाइज करा, त्यामुळे मनोरंजही होईल व आरोग्यही सुधारेल.

* फावल्या वेळी संगीत ऐकणे एक उत्तम उपाय आहे.

* छोट्या कुरबुरी, भांडणे शक्य तेवढ्या लवकर विसरा.

* आपण आनंद वाटायला शिका. तरच आनंद सतत वाढत राहील.

* इतरांची निंदा व स्वतःची उपेक्षा टाळा. इतरांच्या निंदेने विनाकारण मानसिक ताण उत्पन्न होऊन आनंद मावळतो.

* स्वतःला जाणा व स्वतःच्या व इतरांच्या भावनांची कदर करा.

* आपल्याला बागकामाची आवड असेल, तर स्वतः रोपांना पाणी घाला.

* कधी कधी आपल्या जवळच्या मित्रांना, नातेवाइकांकडे सहकुटुंब व त्यांनाही आपल्या घरी जेवायला बोलवा.

* सुट्टीत अनाथाश्रमात वा रुग्णालयात जाऊन काही वेळ अनाथ मुलांमध्ये व रुग्णांमध्ये घालवा. त्यांना फळे, दूध वा भेटवस्तू देऊन त्यांच्याशी बोला, त्यांचे दुःख समजून घ्या. इतरांना आनंद दिल्यास आपले जीवन आनंदाने भरून जाते.

* जमेल तेवढी इतरांना मदत करण्याचा प्रयत्न करा.

* आपल्या रागावर व बोलण्यावर ताबा ठेवा. कारण त्यामुळे चांगले वातावरण बिघडू शकते.

* तणाव वा चिंता विनाकारण डोक्यात घेऊन बसू नका.

* जाणून बुजून कोणाशी भांडू नका. क्षुल्लक गोष्टींचा बाऊ करू नका.

* रोजची नवी सकाळ आपल्या जीवनात आनंदलहरी आणेत. संकटांशी झुंजायला व स्वतःवर प्रेम करायला शिकाल, तर सुख आपल्या पायाशी लोळण घेईल.

# जर एखाद्या व्यक्तीचा दोष दिसत असेल तर

योगायोगाने जेव्हा एखादा प्रसंग किंवा प्रवास करण्याची वेळ येते तेव्हा पालक आपल्या पाल्यास सोबत घेऊन वावरताना दिसतात. समाजामध्ये उजळमाथ्याने जगत असताना प्रत्येक पालक आपला मुलगा किंवा मुलगी (पाल्य) हा इतरांपेक्षा वेगळा असावा. त्याच्यामध्ये सारे सर्व गुण असावेत. यामुळे आपल्याला प्रतिष्ठा प्राप्त होईल. आणि यामुळेच समाजामध्ये काही चांगले-वाईट गुण असणारी माणसे त्यांचे व्यवहार, आचार-विचार आणि त्यांची मनोधारणा समजू शकेल. याकरिता समाजात मिसळणे आणि समाजाचे अनुभव आत्मसात करणे गरजेचे पडते.

हे अनुभव कामी येतात. जर एखाद्या व्यक्तीत एखादा दोष दिसत असेल तर तो पाहिल्यानंतर तो दोष आपल्यात येऊ नये आपल्या मुलांमध्ये असू नये ही भावना पालकांची असते आणि त्यामुळे पालक मुलांना त्या मुलामध्ये खेळू नकोस, ते चांगले नाहीत हे वारंवार बोलत असतात.

पण हे बोलणे योग्य नव्हे. मुलाला चांगले काय आणि वाईट काय हे त्याचे त्याने समजून घ्यावे आणि समजावे यासाठी समाजामध्ये मुलांना मिसळायला शिकविले पाहिजे. आयुष्याच्या स्पर्धेत सदासर्वकाळ जेता म्हणून जगायचे असेल आणि आपला मुलगा/मुलगी (पाल्य) विजेता म्हणून तयार व्हावा असा वाटत असेल तर प्रत्येक पालकाचे नैतिक कर्तव्य म्हणून मुलांना समाजामध्ये मिसळू द्या. समाजामध्ये मिसळल्यामुळे समाजातील चालीरिती, रितीरिवाज, परंपरा संस्कृती,संस्कार हे समजू शकतील. पालकांनी आपल्या मुलांना समाजामध्ये मिसळायला शिकविलेच पाहिजे.




हल्ली होतं काय, घरी कोणी पाहुणे आले की, मुले विशेषत: मुले आपापल्या खोलीत जाऊन बसतात, पाहुण्यांचे आदरातिथ्य करणे तर दूरच ति पाहुण्यांसमोरही येत नाहीत.

- कित्येक मुले तर आई वडिलांच्या मित्र-मैत्रिणींची टर उडवित असतात. त्यातून जर त्यांना पॉफ म्युझिक, इंटरनेट वा क्रिकेटविषयी माहिती नसेल तर त्यांना ही मुले अगदीच मागास समजून चेष्टा करायलाही मागे-पुढे पाहात नाहीत. ही मंडळी मुलांच्या वाढदिवसाला आली तरी मुले फक्त प्रेझेंट हसत आपल्या खोलीत निघून जातात व अंकल, आण्टींना विचारीतही नाहीत.
- या सवयी सुधारता येऊ शकतात. सर्वप्रथम पाहुणे ही सर्व कुटुंबाची जबाबदारी आहे, ती जाणीव मुलांना द्यावी. सर्वच नसले तरी काही पाहुण्यांच्या आदरातिथ्यात तरी मुलांना सहभागी करुन घेऊ शकता.
- महिन्यांतून किमान एक पाहुण्याशी सामाजिक संबंध बनवणे मुलांसाठी कठीण काम नाही. काही पाहुणे असेही असू शकतात, ज्यांच्या स्वागतासाठी मुलांना तयार करता येऊ शकते. त्यावेळी घरातील वातावरण कसे असावे हे मुलांना अगोदरच सांगू शकता, ही सुस्वागतम वा होम स्वीट होम चे पोस्टर बनवूनही आपल्या भावना व्यक्त करु शकतात.
- मुलांना आपल्या घरातील वैशिष्ट्यांचाही मान असावा. कोणी घरी आल्यानंतर त्यांना ते, या आपल्याला नवी रोपे दाखवतो, वा आमच्यासोबत व्हिडिओ गेम खेळता का ? किंवा आपण आणलेले प्रेझेंट मला खूप आवडले इत्यादी बोलू शकतात, मुले काय म्हणतील हे सर्वस्वी आपल्या कुटुंबातील परंपरेवर अवलंबून असते.

आपल्याला व आपल्या पाहुण्यांना संगीताची आवड असेल तर मुले त्यांना नुकत्याच खरेदी केलेल्या कॅसेटबद्दल बोलू शकतात. यासाठी आपले कौटुंबिक जीवन रोचक राखायला हवे.

जेणेकरुन मुलांकडे सांगण्यासारखे नेहमीच काही ना काही असेल. जर घरी पाहुण्यांची मुले आली तर त्यांच्यासोबत मुलांना आपली खेळणी खेळण्यात सहभागी करण्याची सवय लावा. तसेच आपण मुलांना पाहुण्यांची मुलाखत घेण्याची सवयही लावू शकता. आपली मुले प्रतिभावंत असतील तर त्याला सामाजिकतेची जोड दिल्यास ती लवकर यशस्वी होतील.

# नवऱ्यांचे प्रकार



खाली आम्ही काही नवऱ्यांचे प्रकार देत आहोत. आपला नवरा यापैकी कुठल्या प्रकारचा आहे ते ओळखा..

१) **प्रेमळ** : या ड्रेसमध्ये तू काय मस्त दिसतेस.

२) **उदार** : तुला हवी ती साडी घे.

३) **समजूतदार** : तू आज खूपच दमलेली दिसतेस. चला आज बाहेर जेवायला जाऊ.

४) **हौशी** : तुझ्यासाठी मोगऱ्याचा गजरा आणलाय बघ.

५) **प्रामाणिक** : मित्राने खूप आग्रह केला. पण मी फक्त दोनच पेग घेतले आणि सिगारेट तर ओढलीच नाही, तुला शब्द दिलाय ना.

६) **एकनिष्ठ** : अंग, ती माझी शाळतली मैत्रीण. पण, स्वभावाने एकदम खडूस, तुझ्यासारखी मनमिळाऊ नाही.

७) **कष्टाळू** : ऑफिसमधून येताना भाजी घेऊनच आलो. उगाच तुला परत मंडईत जायला त्रास नको.

८) **आज्ञाधारक** : मित्र पार्टीला बोलावत होता, पण, म्हटल आधी तुला विचारावे आणि मगच कळवावे.

९) **स्वाभिमानी** : मी काय तुझ्या शब्दाबाहेर आहे का?

१0) **काटकसरी** : मोत्यांचा नेकलेस काय करायचाय ? मण्यांची माळ घातलीस तरी चालेल. जातिवंत सुंदरीला काहीही शोभते.

११) **धाडसी** : तुझी आई आणखी किती दिवस राहणार आहे ?

१२) **मितभाषी** : हो !


१३) **खंबीर** : तू म्हशील तसे, तू आणि मी काय वेगळे आहोत का ?

१४) **आर्जवी** : मी चहा करणारच आहे, तुही घे ना !

तरी आपला नवरा वरीलपैकी कोणत्या प्रकारचा आहे ते लवकरात लवकर कळवा. आपला नवरा कोणत्याही प्रकारचा नसल्यास आम्ही जबाबदार नाही. आपलेच नशीब खोटे असे मानून गप्प बसावे.

■■■

# हिवाळ्यात आपण आपल्या पाळीव प्राण्यांना किती वेळा अंघोळ घालावी?





हिवाळा हा आपल्याप्रमाणेच पाळीव प्राण्यांसाठीही आव्हानात्मक असू शकतो. थंडी वाढल्याने अगदी नेहमीची अंघोळ करणे देखील अत्यंत कठीण वाटू शकते. त्यामुळे अनेक जण थंडीत एकावर एक स्वेटर घालतात आणि काही लोक अंघोळ न करता, परफ्युम्स वापरतात. पण, थंडीचा आपल्या पाळीव प्राण्यांच्या अंघोळीच्या दिनचर्येवर कसा परिणाम होतो? हे जाणून घेण्यासाठी थंडीच्या महिन्यांत पाळीव प्राण्यांची स्वच्छता राखण्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घेतला.

चेन्नईच्या ईस्ट कोस्ट पेट हॉस्पिटलमधील डॉ. रचना यांनी कुत्र्यांना महिन्यातून एकदा किंवा हिवाळ्यात अगदी आवश्यक असेल तेव्हाच अंघोळ घालण्याची शिफारस केली. थंड हवामानामुळे त्यांची त्वचा कोरडी पडते आणि त्यामुळे वारंवार अंघोळ करणे अनिष्ट ठरते. त्यांना स्वच्छ ठेवण्याचा आणि त्यांचे आरोग्य राखण्यासाठी नियमित घासणे हा एक चांगला मार्ग आहे, असे त्यांनी सांगितले.

डॉ. रचना यांनी, जास्त प्रमाणात अंघोळ केल्याने त्यांच्या त्वचेतून नैसर्गिक तेल निघून जाते आणि त्यामुळे कोरडेपणा, खाज सुटणे व रुक्षपणा येतो. अशा स्थितीत पाळीव प्राणी अस्वस्थ होतात.

SAVET या ॲनिमल बिझनेस युनिटचे हेड महेंद्र ग्रोव्हर यांनी, पाळीव प्राण्यांना पंधरवड्याने अंघोळ घालण्याचा सल्ला दिला किंवा त्यांच्या त्वचेचे आरोग्य जपताना त्यांची स्वच्छता राखण्यासाठी आठवड्यातून एकदा पाणी न वापरता, त्यांची साफसफाई करण्याचा सल्ला दिला.

माणसांप्रमाणे पाळीव प्राण्यांची त्वचा पातळ असते आणि त्यामुळे त्यांचे संरक्षणात्मक कवच गमावण्याची अधिक शक्यता असते, असेही त्यांनी सांगितले.

कार्निवेलचे बिझनेस हेड जे. एस. रामकृष्ण यांच्या मते, जास्त प्रमाणात अंघोळ केल्याने पाळीव प्राण्याचे थंड हवामानापासून नैसर्गिक संरक्षण कमकुवत होऊ शकते.

जर पाळीव प्राण्याची त्वचा खूप कोरडी झाली किंवा फर त्याचे इन्सुलेट गुणधर्म गमावत असेल, तर त्यांना सर्दी होऊ शकते किंवा ते त्वचेच्या संसर्गास अधिक संवेदनक्षम होऊ शकतात. हिवाळ्यात डेहराडून आणि मुंबईसारख्या प्रदेशांमध्ये विशेषतः हवेत आर्द्रता असते आणि जास्त अंघोळ केल्याने पाळीव प्राणी थंड वारे आणि हवामानाच्या परिस्थितीला असुरक्षित बनवू शकतात, असेही ते म्हणाले.

**हिवाळ्यात प्राण्यांची अशी घ्या काळजी**

डॉ. रचना यांनी हिवाळ्यात पाळीव प्राण्यांच्या काळजीसाठी सांगितलेल्या महत्त्वाच्या गोष्टी खालीलप्रमाणे :

**तापमानाचे निरीक्षण करा :** अत्यंत थंड किंवा वादळी परिस्थितीत कुत्र्याला चालण्यासाठी घेऊन जाणे टाळा.

**स्वेटर वापरा :** छोट्या केसांच्या प्राण्यांना चालताना कोट किंवा स्वेटर घाला; ज्याचा त्यांना फायदा होऊ शकतो.

**पंजे संरक्षित करा :** पाळीव प्राण्यांसाठी सुरक्षित डी-आयसिंग उत्पादने किंवा बुटीज वापरा; जेणेकरून त्यांचे पंजे मीठ आणि रसायनांपासून संरक्षित राहतील.

**चालल्यानंतरची काळजी :** शीत प्रदेशात बाहेर चालून आल्यानंतर पायांना बर्फ लागला असेल किंवा इतर ठिकाणी दवामुळे पाय ओले झाले असतील, तर तो ओलसरपणा काढून टाकण्यासाठी टॉवेलने त्यांचे पंजे पुसून टाका.

**उबदारपणा :** घरामध्ये आरामदायी, उबदार अंथरुणाची सोय करा.

**आहार :** हिवाळ्यात उर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांच्या अन्नाचे प्रमाण थोडे वाढविण्याचा विचार करा.

**अँटीफ्रिज एक्स्पोजर टाळा :** अँटीफ्रिज उत्पादने प्राण्यांपासून दूर ठेवा. कारण- ती चूकूनही त्यांनी खाल्ल्यास त्यांच्यासाठी ती अत्यंत विषारी ठरू शकतात.

**सर्दीची लक्षणे ओळखा :** थरथर कापणे, रडणे, आळस किंवा बाहेर पाऊल ठेवण्याची अनिच्छा यांसारखी लक्षणे ओळखा.

***

# बारीक दिसण्यासाठी ब्लाऊजची निवड कशी करावी?



एरवी बहुतांशजणी सलवार सूट, जीन्स असे कपडे घालत असल्या तरी सणासुदीच्या दिवशी किंवा काही लग्नसमारंभाच्या निमित्ताने हमखास साडी नेसतातच. अशी कधीतरीच आपण साडी नेसतो आणि त्यातही साडी नेसल्यावर जाड दिसतो, अशी भावना त्यावेळी अनेकजणींच्या मनात येतेच. असं तुमच्याही बाबतीत होत असेल तर ब्लाऊजच्या बाबतीतल्या या काही टिप्स फॉलो करून पाहा. कधी कधी आपली ब्लाऊजची निवड चुकते आणि मग त्यामुळे आपले दंड अधिक फुगीर वाटतात. आपण आहोत त्यापेक्षा जास्तच जाड दिसू लागतो. म्हणूनच अधिक स्लिम, आकर्षक आणि स्मार्ट लूक येण्यासाठी ब्लाऊजची निवड कशी करावी याविषयीची ही खास माहिती.

**बारीक दिसण्यासाठी ब्लाऊजची निवड कशी करावी?**

**ब्लाऊजचा गळा :** ब्लाऊजचा मोठा गळा प्रत्येकीलाच शोभून दिसतो असं नाही. त्यामुळे स्लिम दिसण्यासाठी ब्लाऊज शिवत असाल तर त्याचा गळा थोडा विचारपुर्वक शिवा. व्हि शेप नेक, बोट नेक किंवा मागच्या बाजुने बंद गळ्याचे ब्लाऊज घातले तर आपण जास्त स्लिम वाटतो. ज्यांची पिअरशेप बॉडी असेल अशांना पुढच्या बाजुने चौकोनी असणारा गळाही शोभून दिसतो. कधीतरी अशा पद्धतीचे ब्लाऊज ट्राय करून पाहा.

**बाह्या कशा असाव्या? :** बाह्यांची उंची आणि त्यावरचं डिझाईन यावरही तुम्ही जाड दिसता की बारीक दिसता हे अवलंबून असतं. फुल स्लिव्ह्ज बाह्यांमध्ये अनेकजणी स्लिम दिसतात. तसेच कोपऱ्यापर्यंत लांब बाह्या घातल्यावरही दंडांना व्यवस्थित शेप मिळतो आणि ते जास्त फुगीर दिसत नाहीत. दंड जाड असतील तर मेगा स्लिव्ह्ज, पफ स्लिव्ह्ज असणारे ब्लाऊज घालणं टाळावं.

**ब्लाऊजचं कापड कसं असावं? :** कधी कधी एखादा कपडा फुगतो आणि मग त्यामुळे त्या कपड्यात आपण जास्तच जाड दिसतो. म्हणूनच ब्लाऊज शिवण्यासाठीही फुगणारा कपडा घेऊ नका. ब्लाऊजसाठी नेहमीच सिल्क, शिफॉन, जॉर्जेट, क्रेप हे कपडे घ्यावे. चमकदार कपडा असेल तर अधिक स्लिम लूक येतो.

# जोडीदाराशी जवळीक साधताना महिलांनी लक्षात ठेवाव्यात 'या' ५ गोष्टी



पहिल्यांदाच जोडीदाराशी जवळीक साधताना मनात अनेक विचार येतात. महिलांना तर या प्रसंगी काही सुचेनासच होतं. आपल्या जोडीदाराला सेक्ससाठी कसं तयार करावं हे काही लोकांना चांगलच ठाउक असतं. मात्र सेक्ससाठी पुढाकार घेणं हे महिलांसाठी अधिक कठीण असतं. सेक्सबाबत अनेकांच्या मनात भीती देखील असते. जेव्हा तुम्ही जोडीदाराच्या भावना, मन ओळखू शकत नाही तेव्हा सेक्स करणं कठीण होऊन बसतं. पण तुम्ही चिंता करू नका. आपल्या जोडीदाराशी जवळीक साधताना कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत हे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

**चांगले कपडे परिधान करा** : सर्वप्रथम पुरुषांची नजर ही महिलांच्या कपड्यांवर जाते. त्यामुळे सेक्सदरम्यान चांगले कपडे परिधान करा. तुमचा जोडीदार तुमच्याकडे पाहतच राहिल अशाप्रकारचे कपडे तुम्ही परिधान करू शकता. तुमच्याकडे काळ्या रंगाचे शॉर्ट ड्रेस असतील तर रात्रीच्या वेळी तुम्ही ते परिधान करू शकता. सेक्सी ड्रेसमुळे पुरुष जोडीदार अधिक उत्साही होतात. हे कपडे तुम्ही तुमच्या जोडीदारासाठीच परिधान केले आहेत हे त्याला पटवून द्या.

**जोडीदाराला मॅसेज करा** : तुमचा जोडीदार जेव्हा संध्याकाळी घरी येईल तेव्हा चांगल्या मुडमध्ये तो असला पाहिजे असं तुम्हाला वाटत असेल तर त्याला मॅसेज करा. काही असे मॅसेज करा ज्यामुळे तुमचा जोडीदार अधिक उत्तेजित होईल. तसेच रात्री पुरुष जोडीदाराशी जवळीक साधू इच्छिता हे मॅसेजद्वारे तुम्ही त्याला सांगू शकता.

**चित्रपट पाहा** : तुम्ही तुमच्या जोडीदाराला रात्री चित्रपट पाहण्यासाठी तयार करू शकता. असे चित्रपट निवडा ज्यामुळे तुम्ही आणि तुमचा जोडीदार अधिक उत्तेजित होईल. आपल्या पुरुष जोडीदाराला चित्रपट पाहण्यास तयार करून तुम्ही त्याच्याशी जवळीक साधू इच्छिता हे दाखवून देऊ शकता.

**आधीचे क्षण आठवा** : तुम्ही एकत्रित घालवलेले प्रत्येक क्षण पुन्हा जगू शकता. हळूहळू तुम्ही तुमच्या जोडीदाराशी या क्षणांबाबत बोलू शकता. कोणत्या क्षणी तुम्ही अधिक जवळ आलात हे जोडीदाराला सांगू शकता. महिला जोडीदारासाठी सेक्सची सुरुवात करण्यास हा चांगला उपाय आहे.

**कोड वर्डमध्ये संवाद साधा** : जर तुम्ही या विषयाबाबत खुलेपणाने जोडीदाराशी संवाद साधत नसाल तर मजेशीर कोड वर्डचा देखील वापर करू शकता. कोड वर्डमध्ये संवाद साधल्याने तुमचा जोडीदारही अधिक उत्तेजित होऊ शकतो. आणि तुम्ही सेक्सचा आनंद घेऊ शकता.

# म्हणून दिवसातून एक केळ खा



आपल्या सगळ्यांना माहित आहे की, तुम्हाला कधी अचानक खूप कंटाळा आला आणि काही खाण्याची इच्छा झाली. पण आपल्याला असं काहीतरी खाण्याची इच्छा असते ज्यातून जास्त कॅलरीज मिळणार नाही. तर तेव्हा तुम्ही केळे खाऊ शकतात. केळे ही आपल्या आरोग्यासाठी चांगल्या असणाऱ्या फळांपैकी एक आहे. केळ्यात अँटीऑक्सिडंट्स, पाण्याचे आणि फायबरचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असते. पण अनेकांना माहित नाही की केळे खाल्याने अन्नपचन होण्यास मदत होते. चला जाणून घेऊया केळे खाण्याचे फायदे

केळे घेताना कोणतं केळे घेतलं पाहिजे?

पचनासाठी सगळ्यांत चांगली केळी ही पिवळी आणि ज्याच्या सालीवर तपकिरी रंगाचे छोटे छोटे ठिपके असतात. ती केळी सगळ्यात चांगली असते.

केळे सगळ्यात चांगल का आहे?

केळे खाल्याने आपल्या आतड्यांमध्ये बॅक्टेरिया जास्त काळ राहत नाही.

केळ्यात अँटीवायरल मोठ्या प्रमाणात आहे. या अँटीवायरलमुळे आपल्या शरीरात बॅक्टेरियाची वाढत होत नाही.

केळीमध्ये अँटीफंगल गुणधर्म आहेत.

आपल्या आतड्यांना कोणताही त्रास न देता केळी पचनास सोपी आहे.

जठर आणि आतड्यांमध्ये होणारी आग केळे खाल्याने कमी होते.

# भांड्यावरील स्टिकर निघत नसेल तर वापरा 'या' सोप्या टिप्स



जेव्हा तुम्ही नवीन भांडी खरेदी करतात, तेव्हा बऱ्याच भांड्यांवर कंपनीच्या नावाचे स्टीकर असतात. बऱ्याच वेळा भांडी किती ही वेळा वापरली तरी ते स्टिकर निघतं नाही. ते काढून टाकण्याच्या प्रयत्नात अनेक वेळा भांड्यावर ओरखडे देखील पडतात. परंतु त्यांना काढण्याचा प्रयत्न हा अयशस्वी ठरतो. भांड्यांवरचे स्टिकर काढण्यासाठी खाली दिलेल्या टिप्स नक्कीच वापरून पाहा.

**नेल पेंट रीमूव्हर वापरा**

नवीन भांड्यावरचे स्टिकर काढण्यासाठी नेल पेंट रीमूव्हर वापरू शकता. त्यासाठी कापसावर नेल पेंट रिमूव्हर किंवा स्पिरिट लावा आणि पाच मिनिटे त्या स्टिकरवर ठेवा. त्यानंतर स्टिकर काढा.

**गरम पाण्याचा वापर करा**

नवीन भांड्यावरचे स्टिकर काढण्यासाठी गरम पाण्याचा वापर करा. यासाठी आपण भांड्यात गरम पाणी घाला आणि थोडा वेळ असे ठेवा. त्यानंतर स्टिकर काढा. त्याने सहजपणे स्टिकर निघेल. काचेच्या पात्रात गरम पाणी वापरू नका हे लक्षात घ्या.

**डिटर्जंटचा वापर करा**

आपण स्टिकर काढण्यासाठी डिटर्जंटची मदत घेऊ शकता. यासाठी, एक चमचा डिटर्जंट घ्या आणि स्टिकरवर लाव. यानंतर, कपड्याच्या मदतीने काही सेकंद स्टिकरवर चोळा म्हणजे ते पूर्णपणे ओले होईल. त्यानंतर, दहा मिनिटे असे ठेवा. नंतर स्टिकर काढा.

**अल्कोहोलचा वापर करा**

नवीन भांड्यातून स्टिकर काढण्यासाठी अल्कोहोलचा वापर केला जाऊ शकतो. यासाठी कपड्यावर अल्कोहोल घ्या आणि त्याने स्टिकरवर स्क्रॅच करा. यामुळे लगेच स्टिकर निघेल.

**तेलाचा वापर करा**

नवीन भांड्याला असलेले स्टिकर काढण्यासाठी एक कपड्यावर तेल घ्या. स्टिकरच्या भागावर त्याने स्क्रॅच करा. यानंतर स्टिकर काढा.

# छान छान गोष्टी... एकीचे बळ मोठे असते

वाराणसीलगत एका गावातील एक सुतार रोज जंगलात जात असे. एकदा त्याने खड्यात पडलेल्या जंगली कुत्र्याच्या पिलाचा जीव वाचवला तेव्हापासून त्याला त्या पिल्लाचा लळा लागला. ते पिलू त्याला तेथे भेटत होते. ते पाहून इतरही जंगली कुत्रे त्याच्याजवळ येत असत.

परंतु त्यांना सर्वांना एका वाघाने फार त्रस्त करून सोडले होते. तो रोज त्यांच्यावर हल्ले करत होता. सुताराने एक योजना बनविली. नेहमीप्रमाणे वाघ डोंगराच्या माथ्यावर आला. सर्व कुत्री वेगवेगळ्या ठिकाणी थांबून त्याच्यावर भुंकू लागली. वाघाने चवताळून एका कुत्र्यावर झेप घेतली तसा तो कुत्रा खाली बसला. वाघाची उडी थेट त्या कुत्र्याच्या मागे असणाऱ्या एका मोठया खडयात पडली. सगळ्या कुत्र्यांनी त्याच्यावर धाव घेतली व त्याच्यावर हल्ला करून त्याला ठार केले.

**तात्पर्य :** एकीचे बळ मोठे असते.

## लौकिक राजा

जनकराजाच्या ज्ञानी अलिप्तपणाची ही कथा. राजा जनक कीर्तन ऐकण्यात दंग होता. कीर्तन अगदी रंगात आले होते. इतक्यात एक रक्षक धावत आला आणि त्याने जनकाच्या कानात हळूच सांगितले, 'महाराज! राजवाडयाला आग लागली आहे.' जनक म्हणाला, 'मी कीर्तन ऐकतो आहे. देवाची भक्ती करतो आहे. आत्ता काही सांगू नको. नंतर ये.' थोडा वेळ गेला. रक्षक पुन्हा धावत आला. म्हणाला, 'महाराज! आग भडकली आहे. कोठीघरापर्यंत थोडया वेळातच पसरेल.' तरीही जनक स्तब्धच होता. कीर्तन सुरूच होते. तेवढयात रक्षकाने तिसरी बातमी आणली, 'महाराज! आपला राजवाडा जवळजवळ जळून खाक झाला आहे आणि आता आग शहरात पसरण्याची शक्यता आहे. साऱ्या प्रजेची घरं जळून खाक होतील.' हे ऐकल्यावर मात्र जनक ताडकन उठला. म्हणाला, 'किर्तन थांबवा. मी गावात जातो. सगळ्या प्रजेच्या रक्षणाची काळजी मला घ्यावी लागेल. ती माझी जबाबदारी आहे.' म्हणजे राजाला स्वतःचा राजवाडयाचे दुःख नव्हते. प्रजेचा जीव, मालमत्ता त्याला वाचवायची होती. **तात्पर्य :** कर्तव्याला लिप्त आणि स्वतःच्या सुखसोयीशी अलिप्त राहिले तरच व्यक्तीचा लौकिक शतकानुशतके राहतो.


**ग्रामपंचायत नायगांव,ता.हवेली,जि.पुणे**

B-१ टेडर नोटीस क्र.१ सन २०२४/२५

ग्रामपंचायत नायगांव,ता.हवेली,जि.पुणे यांच्याकडुन खालील नमुद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पध्दतीने (दोन सीलबंद लिफाफा पध्दतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडुन मागविणेत येत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत नायगांव, ता.हवेली, जि.पुणे यांच्याकडुन दि.२३/१२/२०२४ ते दि.२९/१२/२०२४ या कालवधीत काम काजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दि.२३/१२/२०२४ ते दि.२९/१२/२०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत नायगांव येथे FHTC नळ कनेक्शन. | १३०९७८/- | दि. २३/१२/२०२४ ते दि. २९/१२/२०२४ | ५९०/- | १३०९/- |
| २ | ग्रामपंचायत नायगांव येथे शौचालय बांधकाम करणे. | ३४५९९५/- | | २३६/- | ३४९९/- |
| ३ | ग्रामपंचायत नायगांव येथे अंतर्गत गटर लाईन करणे. | २२३९८७/- | | २३६/- | २२३९/- |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.१) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे.२) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत नायगांव PDCC बँक शाखा उरूळी कांचन खाते क्र.०४६००१६०००००००४ वर किंवा ग्रा.प.कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील.३) यापुर्वी केलेल्या कामांचे काम पुर्णत्वाचे दाखले जोडावेत.४) इसारा रक्कम ग्रामपंचायत नायगांव ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा उरूळी कांचन खाते क्र. ०४६००१६०००००००४ .च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.५)आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल.

सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत नायगांव यांनी राखुन ठेवला आहे.

सही/- ग्रामपंचायत अधिकारी    सही/- सरपंच
ग्रामपंचायत नायगांव,ता.हवेली,जि.पुणे



**वर्षा लांडगे,उपविभागीय अधिकारी पुरंदर तथा दंडाधिकारी पुरंदर उपविभाग पुरंदर यांचे कार्यालय**

**जाहिर नोटीस**

या जाहिर नोटीसीद्वारे तमाम नागरिकांना कळविणेत येते कि, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि.११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११(२) व ३ नुसार जन्म मृत्यूच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्यूची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी संबंधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्याअनुषंगाने अर्जदार मोहन सोपान चौंडकर यांनी या कार्यालयाकडे जन्म मृत्यू नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३(३) नुसार या कार्यालयाकडे अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार अर्जदार यांनी त्यांची आई कै.कलावती सोपान चौंडकर यांचा मृत्यू नायगांव ता.पुरंदर,जि.पुणे येथे दि.१८/०२/२०२१ रोजी झालेचे नमूद करून सदर मृत्यूची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर मृत्यू नोंदणीबाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप/हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहिर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून १५ दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधीमध्ये लेखी आक्षेप/हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यू नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल.

आज दि.१९/१२/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी ही जाहिर नोटीस देणेत आली आहे.

क्र.फौज/ज.मृ./एसआर/७०/२०२४
दिनांक १९/१२/२०२४
ठिकाण : पुरंदर

शिक्का

सही/-
(वर्षा लांडगे)
उपविभागीय दंडाधिकारी पुरंदर
उपविभाग पुरंदर



**जाहिर नोटीस**

सर्व लोकांना कळविण्यात येते कि, खालील वर्णन केलेली जमीन मिळकत ही तान्हुबाई दादाभाऊ जांभळकर व विजय दादाभाऊ जांभळकर सर्व रा.उरळगाव ता.शिरुर जि.पुणे यांचे मालकीचे असुन त्यांच्या सदरची मिळकतीवर वारसा हक्कानुसार ताबा व वहिवाट असुन त्यांनी त्यांच्या वहिवाटी मध्ये असलेली खालील वर्णन केलेली मिळकत वर्ग २ ची (नवीनशर्त) असल्याने त्याची रितसर परवानगी आणुन त्यावरील असलेले शासकिय महसुल चलन जमा करुन खरेदी खताद्वारे विकत देण्याचे मान्य केलेले असुन सदर मिळकती बाबत त्यांचे स्वामीत्व निर्दोष,निजोखमी,मार्केटेबल असलेची हमी आमचे अशिलांनी दिलेली आहे. तरीही सदर मिळतीवर कोणाचाही काही बोजा,कोर्ट दावा,वारसा हक्क, करारदार,तोंडीबोली,बक्षीसपत्र,वाटणी,वहीवाट,एम.ओ.यु,कुलमुखत्यार,कुळ अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधीतांनी सदर नोटीस प्रसिध्दी पासुन दहा दिवसांच्या आत आपले असलेले हक्क हितसंबंध व हरकती या बाबत मुळ कागदपत्रासंह खालील पत्यावरती समक्ष भेटुन आमची खात्री पटवुन द्यावी. वरील मुदतीत कोणाची काही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे किंवा कोणाचाही काही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी तो जाणीवपुर्वक सोडुन दिलेला आहे असे समजण्यात येवुन आमचे अशिल पुढील जमिन विक्री परवानगी व खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर कोणाची कसलीही हरकत अगर तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतींचे वर्णन :-** उरळगाव ता.शिरुर,जि.पुणे येथील गट नं.२७८ एकुण क्षेत्र ११ हे.२८ आर +खराबा -०.०हे.०.०१ आर पैकी वरील व्यक्तीचे वारसा हक्काने हिस्सेनुसार मालकी हक्काने क्षेत्र १ हे. ८८ आर+खराबा क्षेत्र ०हे.०आर इतके असुन यांसी निरंतरचे वहिवाटी नुसार चर्तुसिमा-पुर्व.२६६/१ पश्चिम.२८१ दक्षिण-गट नं.पैकी भागा होलगुंडे

उत्तर:-गट नं.पैकी पोपट जांभळकर या प्रमाणे सदरचे नोटिसचा विषय असलेली संपुर्ण शेतजमिन मिळकत

सही/-
ॲड.एस.पी.थोरात
मु.पो.उरळगाव ता.शिरुर,जि.पुणे
मो.९७३०६००८९५



**SHRIRAM HOUSING FINANCE**

**श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

**मागणी सूचना**

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८
**शाखा कार्यालय:** क्र १०१, पहिला मजला, इमारत क्रमांक ९६, सुवर्णरेखा बुलेवार्ड, घोडके चौक, प्रभात रोड, पुणे – ४११००४, **वेबसाइट:** www.shriramhousing.in

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार/सहकर्जदार/जामिनदार यांनी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडून वित्तीय सहाय्यता घेतली आहे. आम्ही नमूद करीत आहोत कि , वित्तीय सहाय्यता घेतल्यानंतरही कर्जदार / जामीनदारांनी देय तारखेनुसार व्याज आणि मुद्दल रक्कम जमा करण्यात कसूर केलेली आहे . भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा वितरित निर्देशन / मार्गदर्शानुसार सदर खाते नॉन -परफॉर्मिंग ॲसेट्समध्ये वर्गीकृत करण्यात आले आहे. श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकारीनुसार सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ३ सहावाचिता कलम १३(२) अन्वये प्राप्त अधिकारा अंतर्गत सरफायसी कायदा २००२ च्या कलम १३(२) अन्वये खाली नमूद तारखांना मागणी सूचना वितरित करण्यात आली होती आणि त्यानुसार सदर सूचना प्राप्ती तारखेपासून ६० दिवसांच्या आत रक्कम पूर्णपणे जमा होईपर्यंत प्रासंगिक खर्च , शुल्क इत्यादी आणि सदर सूचनेत नमुद रकमेवरील करारदारने पुढील व्याजासह एकत्रित सूचनेत नमूद रक्कम जमा करण्याबाबत खालील कर्जदार/जामीनदार/तारणकर्ता यांना कळविण्यात आले होते.
या प्रकाशनाद्वारे त्यांना जारी करण्यात आलेल्या नोटिसा त्यांना याद्वारे सार्वजनिक नोटीसद्वारे त्याबद्दल कळविण्यात येत आहेत. कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे की, प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेसंदर्भात कायद्याच्या कलम १३ चे उपकलम (८) ची तरतूद आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | थकबाकी रक्कम | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता |
|---|---|---|
| १. में ओएम एक्स रे क्लिनिक (कर्जदार)<br>२. श्री.राहुल ज्ञानेश्वर पाटील (सह-कर्जदार),<br>३. श्रीमती रीना रोहिदास लोंढे (सह-कर्जदार)<br>४. श्री.ज्ञानेश्वर सखाराम पाटील<br>निवासाचा पत्ता आहे:<br>कार्यालय क्र.१०२ पहिला मजला, सीटीएस क्र.४२७०/७, तानाजी नगर, कालीकमत जवळ, चिंचवड गाव, पुणे, महाराष्ट्र-४१११०३३<br>येथे देखील: मालमत्ता पत्ता: फ्लॅट क्र७ साई निवास, S NO २९५, हिसा क्र.४८, काळेवाडी, केशवनगर, कान प्रभात कॉलनी, चिंचवडगाव, पुणे महाराष्ट्र -४१११०३३<br>एनपीए दिनांक : ०४.१२.२०२४<br>मागणी सूचना दिनांक ११-१२-२०२४ | तारीख: ०९-१२-२०२४ रोजी कर्ज संदर्भ क्र SLPHPUNH0001332 अंतर्गत रु. ३४,३४,४१९/-(रुपये चौत्तीस लाख चौतीस हजार चारशे एकोणीस फक्त) करारानुसार पुढील व्याजासह, पूर्ण आणि अंतिम पेमेंट केल्याच्या तारखेपर्यंत आनुषंगिक खर्च, खर्च शुल्क इत्यादीं सह वरील रकमेवर SHFL/NHB/ RBI द्वारे वेळोवेळी करारानुसार पुढील व्याजासह आणि/ किंवा निर्धारित केल्यानुसार.<br>**कर्जाची रक्कम**<br>कर्ज क्र. SLPHPUNH0001332 कर्ज वाटप केलेली रक्कम: रु. ३२,२०,८८६ /- (रुपये बत्तीस लाख वीस हजार आठशे श्याऐंशी फक्त) | स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, फ्लॅट क्र. ०७, मोजमाप ६४० चौ.फुट I.E ५९.४७, चौ.मी (बिल्ट अप एरिया), पहिल्या मजल्यावर, "साई रेसिडेन्सी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड" म्हणून बिल्डिंग क्वॉनमध्ये, जमिनीवर बांधलेले 1) सर्वेक्षण क्र. २९५, हिसा क्र. ४८ संबंधित सीटीएस क्र.१७०८ मोजमाप, ८०० चौ.मी. २) सर्वे क्र.२९५, हिसा क्र ४३ संबंधित सीटीएस क्रमांक १७०९ १६०० मोजमाप, 3) सर्व्हे क्र. २९५, हिसा क्र. ४० अनुरूप सीटीएस क्र १७१०मोजमाप, ९५० चौ.मीटर, चिंचवड, तालुका हवेली येथे वसलेले, जिल्हा पुणेसेमेला योजनेनुसार सीमा आहे: पूर्व: सोसायटी रोड, दक्षिण: सोसायटी रोड, पश्चिम: प्रवेश आणि रस्ता उत्तर: फ्लॅट क्र.०६ |
| १. श्री. प्रेमनंद पात्रा (कर्जदार)<br>२. श्रीमती मिठू पात्रा (सह-कर्जदार)<br>३. श्री. निशिकांत प्रेमानंद पात्रा (सह-कर्जदार)<br>निवासाचा पत्ता आहे:<br>फ्लॅट क्रएस २स्टिल फ्लोअर, लक्ष्मीपूजा निवास, सी टी एस नं ३२३ लक्ष्मी रोड, गणेश पेठ, एस पी फर्निचर जवळ, पुणे महाराष्ट्र भारत४१११००२<br>येथे देखील: मालमत्तेचा पत्ता: , कार्यालय क्र१,१ ला मजला, सैरत्न सीटीएस क्रमांक ९३०, दगडी नागोबा मंदिराजवळ, रविवर पेठ, पुणे४१११००२<br>एनपीए दिनांक : ०४.१२.२०२४<br>मागणी सूचना दिनांक ११-१२-२०२४ | तारीख: ०९-१२-२०२४ रोजी कर्ज संदर्भ क्र SLPHPUNH0001668.अंतर्गत रु. रु. ३४,१९,७४९/- (रुपये चौतीस लाख एकोणीस हजार सातशे एकोणपन्नास फक्त) करारानुसार पुढील व्याजासह, पूर्ण आणि अंतिम पेमेंट केल्याच्या तारखेपर्यंत आनुषंगिक खर्च, खर्च शुल्क इत्यादीं सह वरील रकमेवर SHFL/NHB/ RBI द्वारे वेळोवेळी करारानुसार पुढील व्याजासह आणि/ किंवा निर्धारित केल्यानुसार.<br>**कर्जाची रक्कम**<br>कर्ज क्र. SLPHPUNH0001668 कर्ज वाटप केलेली रक्कम: रु. ३१,०१,१४८ /- (रुपये एकतीस लाख एक हजार एकशे अट्टे चाळीस फक्त) | स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, कार्यालय क्र.०१, च्या क्षेत्राचे २९३ चौ.फू म्हणजे २७.२३ चौ.मी पहिल्या मजल्यावर, "सैरात्न" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या योजनेत, सीटीएस क्रमांक ९३०, रविवार पेठ, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे आणि खालीलप्रमाणे सीमा:<br>पूर्व: सीटीएस क्रमांक ९३१<br>पश्चिम: सीटीएस क्रमांक ९२९<br>दक्षिण: मुस्लिमांचे ग्रेडियार्ड<br>उत्तर: रस्ता |
| १. श्री.बाळासाहेब अप्पाराव खोसरे (कर्जदार)<br>२.सौ.पूजा बाळासाहेब खोसरे (सह-कर्जदार),<br>निवासाचा पत्ता आहे:<br>खोली क्रमांक ०२ क्रांतिवीर नगर एसआर क्र२७ 2A, स्वामी समर्थ कॉलनी, मातल निवास संचेती हायस्कूल, पुणे, महाराष्ट्र -४१११०३३<br>येथे देखील: मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट क्र ७०८७ वा मजला, एक्सआरबीआ अंबी बिल्डिंग क्रए४, GAT क्र ३६ ३७ ३९ ४०, ३३९ तळेगाव एमआयडीसी रोड आंबी पुणे४१०५०७<br>एनपीए दिनांक : ०४.१२.२०२४<br>मागणी सूचना दिनांक ११-१२-२०२४ | तारीख: ०९-१२-२०२४ रोजी कर्ज संदर्भ क्र SHLHCHWD0000235.अंतर्गत रु. रु. ११,३९,७२०/- (रुपये अकरा लाख एकोणचाळीस हजार सातशे वीस फक्त) करारानुसार पुढील व्याजासह, पूर्ण आणि अंतिम पेमेंट केल्याच्या तारखेपर्यंत आनुषंगिक खर्च, खर्च शुल्क इत्यादीं सह वरील रकमेवर SHFL/NHB/ RBI द्वारे वेळोवेळी करारानुसार पुढील व्याजासह आणि/ किंवा निर्धारित केल्यानुसार.<br>**कर्जाची रक्कम**<br>कर्ज क्र. SHLHCHWD0000235 कर्ज वाटप केलेली रक्कम: रु. १९,८०,०४१ /- (रुपये एकोणीस लाख ऐंशी हजार एकचाळीस फक्त) | स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, फ्लॅट क्र.७०८, मोजमाप २०८ चौ.फुट म्हणजे १९.३२ चौ.मी. (चटई क्षेत्र) सातव्या मजल्यावर, इमारत क्र. १४ मध्ये "एक्सआरबीआ अंबी" म्हणून ओळखले जाणारे कॉम्प्लेक्स, वर बांधले गेले १) लँड बेअरिंग गॅट क्र.३६ मोजमाप०० एच३६ म्हणजे ८४००चौ. मी.२) लँड बेअरिंग गॅट क्र.३७ मोजमाप ०० एच १७७ म्हणजेच १७७००चौ.मी. ३) लँड बेअरिंग गट क्र. 39 मोजमाप00 H11.5 R,4) लँड बेअरिंग गॅट क्र.40 मोजमाप०० एच १०३म्हणजे १३०० चौ.मी.५) लँड बेअरिंग गट क्र.३३९ मोजमाप 00 H89 म्हणजेच ८९०० चौ.मी.पूर्णपणे जमिनीचे मोजमापएच ६४.५ म्हणजे ४६४५ चौ.मीटर म्हणजे४६४५०चौ. मीटर, गाव आंबी, तालुका, मावळ, जिल्हा पुणे येथे वसलेले आणि खालीलप्रमाणे सीमा: पूर्व: फ्लॅट क्र. ७०७,पश्चिम : फ्लॅट क्र.७०९,दक्षिण: खुली जागा, उत्तर: पॅसेज |

उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता वर नमूद कर्जदार , सहकर्जदार आणि / किंवा त्यांचे जामीनदार (जेथे लागू असेल तेथे ) यांना येथे सूचना देण्यात येत आहे कि, त्यांना सदर सूचना प्रकाशन तारखेंपासून ६० दिवसांत वर नमुद केलेली थकबाकी रक्कम तसेच पुढील व्याज व लागू शुल्क व्याज एकूण जमा करावी . अन्यथा सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ चे कलम १३(४) आणि त्यातील लागू नियमाअंतर्गत कर्जदार व तारणकर्ता यांच्या प्रतिभूत मालमत्तेचा ताबा घेण्यासह प्रतिभूत मालमत्तेचा विरोधात सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या समाप्तीनंतर पुढील कारवाई केली जाईल . **कृपया नोंद असावी कि, सदर कायद्याच्या कलम १३(१३) अन्वये कोणत्याही कर्जदारास प्रतिभूत धनकोंच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय सूचनेत नमुद त्यांची प्रतिभूत मालमत्ता विक्री , भाडेपट्टा किंवा अन्य इतर प्रकारे हस्तांतर करता येणार नाही .**

ठिकाण - पुणे
दिनांक - २१-१२-२०२४

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

# कलाविश्व

## दरवाजाच्या आड काय आहे गुपित? 'सुशीला- सुजीत' सिनेमाचं पोस्टर चर्चेत




मराठी मनोरंजन विश्वात २०२४ मध्ये प्रेक्षकांना अनेक वेगवेगळ्या धाटणीचे सिनेमे पाहायला मिळाले. आता येत्या वर्षात बॉक्स ऑफिसवर नवीन काय पाहायला मिळणार याबद्दल प्रत्येकाच्या मनात उत्सुकता निर्माण झाली होती. अखेर आता २०२४ च्या वर्षाखेरीस पुढच्या वर्षी प्रदर्शित होणाऱ्या बहुचर्चित सिनेमाची पहिली झलक निर्माते व दिग्दर्शकांनी समोर आणली आहे.

गेल्या काही दिवसांपासून स्वप्नील जोशीच्या 'जिलबी' चित्रपटाची चांगलीच चर्चा रंगली होती. याशिवाय सध्या सगळे प्रेक्षक स्वप्नीलच्या गुजराती चित्रपटाची सुद्धा आतुरतेने वाट पाहत आहेत. या चर्चा सुरू असतानात अभिनेत्याने आपल्या चाहत्यांना आणखी एक आनंदाची बातमी दिली आहे. स्वप्नीलने त्याच्या आणखी एका मराठी चित्रपटाची घोषणा केलेली आहे.

स्वप्नील या (Susheela - Sujeet) चित्रपटाच्या माध्यमातून निर्माता आणि अभिनेता अशी दुहेरी जबाबदारी सांभाळणार आहे. स्वप्नीलचा 'सुशीला– सुजीत' हा सिनेमा पुढच्या वर्षी १८ एप्रिल २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'सुशीला– सुजीत' या सिनेमाचं पोस्टर आणि प्रदर्शनाची तारीख स्वप्नीलने आपल्या इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत जाहीर केली आहे.

'सुशीला–सुजीत'मध्ये स्वप्नील जोशी आणि सोनाली कुलकर्णी पहिल्यांदाच एकत्र स्क्रीन शेअर करणार आहेत. 'सुशीला– सुजीत' या चित्रपटाचा नेमका विषय नक्की काय आहे? आणखी कोणकोणते कलाकार यात दिसणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे.

चित्रपटाची कथा व दिग्दर्शनाची जबाबदारी प्रसाद ओकने सांभाळली आहे. प्रसाद ओकबद्दल सांगायचं झालं, तर त्याने आतापर्यंत कच्चा लिंबू, चंद्रमुखी, आणि हिरकणी सारख्या दमदार चित्रपटांचं दिग्दर्शन केलेलं आहे. त्यामुळे प्रसाद–स्वप्नीलची जोडी रुपेरी पडद्यावर काय जादू दाखवणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. 'सुशीला सुजीत' (Susheela Sujeet) या चित्रपटाची निर्मिती प्रसाद ओक, मंजिरी ओक, संजय मेमाणे, निलेश राठी आणि स्वप्नील जोशी असे पाच जण मिळून करणार आहेत. प्रेक्षक सुद्धा ही आगळीवेगळी कथा पाहण्यासाठी उत्सुक आहेत.

## आपल्याच राज्यात आपल्याला भीक मागवी लागतेय, सुबोध भावे असं का म्हणाला?



अभिनेता सुबोध भावेचा आज, २० डिसेंबरला 'हॅशटॅग तदेव लग्नम' चित्रपट प्रदर्शित झाला आहे. आनंद गोखले दिग्दर्शित 'हॅशटॅग तदेव लग्नम' चित्रपटात सुबोध भावे अथश्रीच्या भूमिकेत झळकला आहे. या चित्रपटात सुबोधसह अभिनेत्री तेजश्री प्रधान प्रमुख भूमिकेत आहेत. महत्त्वाचं म्हणजे 'हॅशटॅग तदेव लग्नम' चित्रपटगृहांबरोबर नाट्यगृहातही दाखवला जाणार आहे. त्यामुळे सध्या सुबोध भावे चर्चेत आहे.

काही दिवसांपूर्वी सुबोध भावेने 'मीडिया तक मराठी' या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीच्या सुरुवातीलाच सुबोधला विचारण्यात आलं की, मराठी चित्रपट आणखीन पुढे जाण्यासाठी अजून कोणते उपक्रम केले पाहिजेत? तेव्हा सुबोध भावे म्हणाला, मला सध्या असं वाटतं की, आधी चित्रपटगृह मिळवून द्या. तेवढं सुद्धा आम्हाला, आमच्या निर्मात्यांना खूप आहे. आम्हाला आमची हक्काची जागा मिळवून द्या. आपल्या विषयातल्या चित्रपटांना, आपल्याच भाषेतल्या चित्रपटांना आपल्याच राज्यात दरवेळेस भीक का मागवी लागते? हा मोठा संशोधनाचा विषय आहे.

पुढे सुबोध भावे म्हणाली की, मल्टीप्लेक्समध्ये पाच–सहा स्क्रीन असतात त्यातल्या दोन स्क्रीन तुम्हाला कायम स्वरुपी मराठी चित्रपटांसाठी का ठेवता येत नाही? आणि एखाद्या मोठ्या हिंदी चित्रपटाचा निर्माता थिएटरला धमकी कशी काय देऊ शकतो? कुठल्याही चित्रपटांना स्क्रीन द्यायची नाही, म्हणूनआणि हे तुमच्या राज्यात तुम्ही चालवून कसं काय घेऊ शकता? याच कारण ना सरकारला काही पडलंय, ना कलाकारांना काही पडलंय, ना प्रेक्षकांना काही पडलंय. कोणाला कशाचंच काही पडलेलं नाहीये. चित्रपट चालो, मरो, तो निर्माता मरो, काहीही घडतो त्याचं. मराठी भाषेचही काहीही घडो, आपाल्याला आपल्या चित्रपटाचं सोडून द्या, आपल्याला आपल्या भाषेचंही काहीही पडलेली नाहीये. ती भाषा आपण बोलो, न बोलो.

आता सांगली, कोल्हापूरमध्येही आपण रिक्षावाल्यांशी हिंदीत बोलायला लागतो. तेव्हा धक्का बसतो. हे हिंदीचं वार कुठंपर्यंत येणार आहे. आमच्यातले, चित्रपटात काम करणारे लोक त्यांना धड मराठी बोलता येत नाही. त्यांना मराठी लिहिता येत नाही. त्यांना मराठी वाचता येत नाही. स्वतःचे विचार आपल्या भाषेत मांडता येत नाही. ही आता भाषेची अवस्था आहे आणि आपल्याला आपली भाषा येत नाही, याचं वाईटही वाटतं नाही. आपल्या भाषेत आपले विचार व्यक्त करता येत नाही. महाराष्ट्रातील माणसं दोन वाक्य सुद्धा धड मराठी भाषेत बोलू शकत नाहीये. एकमेकांशी बोलताना मराठी माणूस कसा ओळखायचा तर आपली भाषा सोडून इतर भाषेचा आधार घेतो तो मराठी माणूस. कारण त्याला आपल्या भाषेत बोलणं, कमीपणा वाटतो, लाज वाटते. हे ज्याला वाटतं ना तो मराठी माणूस, असं स्पष्टच सुबोध भावे म्हणाला.

त्यानंतर अभिनेता म्हणाला, मला असं वाटतंच विमानात, मॉल, ५ स्टार हॉटेलमध्ये गेल्यानंतर इंग्रजी बोलता आलं पाहिजे किंवा हिंदीमध्ये बोलता आलं पाहिजे. पण महाराष्ट्रामध्ये मी का बोलू इतर भाषांमध्ये? मी मराठी भाषेत बोलेन तुम्ही इथे येऊन व्यवसाय सुरू केलाय ना. मग तुम्हाला त्या राज्याची भाषा आली पाहिजेत. मी गुजरातमध्ये गेलो तर मी गुजराती शिकेन. मी बंगालमध्ये गेलो तर बंगाली शिकेन. कारण मला त्या राज्याची भाषा आली पाहिजे. भारतात आहेत ना इतक्या भाषा मग त्या भाषा यायला नकोत. हा आग्रह कुठे करतोय आम्ही महाराष्ट्रात ना. आम्ही मध्य प्रदेशात चित्रपट लागला पाहिजे असा आग्रह करत नाहीये. मग इथेच जर तो लागला नाही तर कुठे लागणार आणि त्याला मराठी चित्रपट नाही, तर मराठी भाषेशी संबंधित असलेल्या प्रत्येक गोष्टीला इथे आदर, सन्मान मिळालाच पाहिजे.

# नाराज आमदारांना एकनाथ शिंदेंकडून श्रद्धा अन् सबुरीचा सल्ला: म्हणाले - पदे येतात जातात, मंत्रिपद न मिळालेल्यांना पुढच्या टप्प्यात संधी देणार



जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : विधानसभा निवडणुकीत महायुतीने प्रचंड बहुमत मिळवत सत्ता स्थापन केली. त्यानंतर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधी तसेच हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्र्यांचा देखील शपथविधी पार पडला. मात्र, महायुतीमधील घटकपक्षांमधील काही आमदारांना मंत्रिपद मिळाले नसल्याने नाराजीनाट्य देखील पाहायला मिळाले आहे. शिवसेना शिंदे गटातील अनेक आमदार नाराज असल्याची चर्चा आहे. यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले, पदे येतात जातात. ज्यांना मंत्रिपद दिले त्यांच्यात क्षमता आहे आणि ज्यांना दिले नाही त्यांच्यात क्षमता नाही, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. आमच्याकडे संख्या जास्त आहे, काहीवेळा काही लोकांना श्रद्धा आणि सबुरी ठेवावी लागते, असे शिंदे म्हणाले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, जे आमदार आता पहिल्या टप्प्यात मंत्री बनले नाहीत, ते पक्षाचे आणि संघटनेचे काम करतील. त्यांना दुसऱ्या टप्प्यात संधी देऊन पहिल्या टप्प्यातील आमदारांना तेव्हा पक्षाचे काम करायला सांगू. हे रुटीन आहे आणि हीच कामाची पद्धत आहे, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी दुसऱ्या टप्प्यात आमदारांना मंत्रिपदाची संधी मिळणार असल्याचे सूचित केले आहे.

दरम्यान, विजय शिवतारे आणि प्रकाश सुर्वे तसेच नरेंद्र भोंडकर यांनी देखील त्यांची नाराजी उघडपणे व्यक्त केली होती. यावर एकनाथ शिंदे म्हणाले, विजय शिवतारे यांनी येऊन मला सांगितले की एकनाथ शिंदे यांचा विश्वासू सहकारी या पदाशिवाय मला दुसरे काही नको. हेच सर्वात मोठे पद आहे. प्रकाश सुर्वे हे देखील मला येऊन भेटले आहेत. नरेंद्र भोंडेकर यांनीही मला येऊन सांगितले आहे. पण हे लोक आता पुन्हा जोमाने काम करणार आहेत. आमची जबाबदारी आता वाढली आहे, असे शिंदे म्हणाले.

पदे येतात आणि जातात, पदापेक्षा आपले उत्तरदायित्व आपले लोकांशी नाळ जोडली आहे त्यांच्याबरोबर आहे. मला काय मिळाले यापेक्षा महाराष्ट्रातील जनतेला काय मिळणार हे महत्त्वाचे आहे, असे एकनाथ शिंदे यांनी म्हंटले आहे. विजय शिवतारे यांनी नाराजी व्यक्त केली होती. मात्र,

मला मंत्रिपद मिळेल, अशी माझ्या घरच्यांना अपेक्षा होती. शपथविधी सोहळ्यासाठी ३७५ गाड्या तब्बल दहा तासांचा प्रवास करून नागपूरला आल्या होत्या, कार्यकर्ते देखील खूपच आग्रही होते. मात्र, मंत्रिपदाची संधी न मिळाल्याने दुसऱ्या दिवशी मी थोडा भावूक झालो आणि अनेक गोष्टी बोलून गेलो. पण माझ्या मनात असे काही नाही, पुढील काळात एकनाथ शिंदे जे पद देतील ते मला मान्य असेल, अशा शब्दात विजय शिवतारे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे, गेल्या ४ दिवसांपासून त्यांची असलेली नाराजी दूर झाल्याचं पाहायला मिळत आहे.

## आमदार निवास इमारतीच्या कामाला गती देऊन जानेवारी २०२७ पर्यंत बांधकाम पूर्ण करण्याचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे निर्देश



जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : विधिमंडळ अधिवेशनासह मंत्रालयातील विविध कामांसाठी मुंबईत येणाऱ्या आमदारांसाठी निवासाची व्यवस्था होण्याकरिता उभारण्यात येत असलेल्या मनोरा आमदार निवास इमारतीच्या बांधकामाला गती देऊन ते जानेवारी २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी उच्चाधिकार समितीच्या बैठकीत दिले.

मुंबई येथील मनोरा आमदार निवास प्रस्तावित पुनर्विकास प्रकल्पाचा आढावा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार मनोरा आमदार निवासाच्या बांधकाम आराखड्यात बदल करण्यात येत आहे. त्यामुळे हरित पट्टा, वाहनतळ, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प यासारख्या सुविधांचे ठिकाण आणि क्षेत्र यामध्ये बदल झाला आहे. या पार्श्वभूमीवर कामाच्या स्वरुपात झालेला बदल आणि त्याच्या वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली. मनोरा इमारतीच्या बांधकामाचा वेग वाढवून ठरलेल्या वेळेच्या आता सर्व कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात यावीत, असे निर्देशही अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले.

या बैठकीस विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विधानमंडळ सचिव जितेंद्र भोळे, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, लार्सन अँड टुब्रो कंपनीचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी लार्सन अँड टुब्रो कंपनीतर्फे सादरीकरण करण्यात आले.

## राज्यातल्या जीएसटी' कर संकलनात सुसूत्रता आणून पारदर्शकता आणणार : उपमुख्यमंत्री अजित पवार



जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : आपल्या देशाने एक देश एक कर' ही संकल्पना स्वीकारली आहे, त्याच माध्यमातून जीएसटी' करप्रणाली विकसित करण्यात आली आहे. राज्यातल्या शेतकऱ्यांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या वतीने अनेक सवलती, अनुदानाच्या योजना राबविण्यात येत आहेत. जीवनावश्यक वस्तूंसह कृषीक्षेत्राशी निगडीत खते, बी–बियाणे, औषधांवरील जीएसटी'तून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारच्या जीएसटी' परिषदेच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याची माहिती, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानपरिषदेत जीएसटी'च्या अनुषंगाने सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना दिली. राज्यातल्या जीएसटी' कर संकलनात अधिक सुसूत्रता, पारदर्शकता आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, देशातल्या एकूण कर संकलनापैकी १६ टक्के करसंकलन एकट्या महाराष्ट्रातून जमा होते. देशांतर्गत एकूण कर संकलनात महाराष्ट्राचा वाटा सर्वात मोठा आहे. यामुळे राज्यातल्या जीएसटी' करप्रणालीत अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. राज्याच्या सीमेलगतच्या भागातून होणारी कर चुकवेगिरीचे प्रकार थांबविण्यासाठी विशेष खबरदारी घेण्यात येईल.

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम २००२ (सुधारणा) विधेयक, २०२४' आज विधानपरिषदेत मंजूर करण्यात आले. या विधेयकाच्या माध्यमातून राज्य शासनाचा महसूल वाढवण्यार भर देण्यात आला आहे. या विधेयकानुसार सध्याच्या महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ मधील कलम ३७ नुसार वसुलीबाबत राज्याचा प्रथम भार विशिष्ट शर्तीच्या अधीन राहून होता. या विधेयकांच्या सुधारणेनुसार महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ अंतर्गत विनाशर्त प्रथम भार स्थापित झाल्यानंतर जलद गतीने वसुली करणे शक्य होणार आहे.

## मुंबई सेंट्रल एसटी स्थानकातून बस सेवा बंद?

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या मुंबई सेंट्रल बस स्थानक परिसराच्या कॉंक्रीटीकरण करण्याचे काम २३ डिसेंबरपासून सुरू होत असून, प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी मुंबई सेंट्रल बसस्थानकातून सुटणाऱ्या बाहेरील आगाराच्या बसच्या फेऱ्या २३ डिसेंबरपासून टप्प्याटप्प्याने पुढील दोन महिन्यासाठी परळ, दादर व कुर्ला नेहरूनगर बसस्थानकातून सोडण्यात येणार आहेत. दरम्यान मुंबई आगाराच्या फेऱ्या याच बसस्थानकातून सोडण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) सहकार्याने एसटीच्या राज्यभरातील १८३ बसस्थानकांच्या परिसराचे कॉंक्रीटीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. एमआयडीसी त्यासाठी सुमारे ६०० कोटी रुपये खर्च करणार आहेत. अनेक बसस्थानक परिसरातील काम सध्या प्रगतीपथावर असून त्याअंतर्गत लवकरच मुंबई सेंट्रल बसस्थानक परिसराच्या काँक्रीटीकरणाचे काम सुरू करण्यात येणार आहे.

सुमारे १,९०० चौरस मीटर इतक्या परिसराचे कॉंक्रीटीकरण करण्यात येणार असून त्यासाठी १ कोटी ६४ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर बस स्थानक परिसर खड्डेमय होणे, पाणी साचणे, धुळ उडणे अशा समस्या दूर होतील. दरम्यान, राज्यभरातून विविध आगारांच्या सुमारे १५५ बस दिवसभरात मुंबई सेंट्रल येथे येतात.

## गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढणार, दोषींवर मकोका अंतर्गत कारवाई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



जनप्रवास । प्रतिनिधी

नागपूर, : बीड, परभणी मधील घटना दुर्दैवी आहेत. या दोन्ही घटनांची सरकारने गंभीर दखल घेतली असून बीड जिल्ह्यातील हत्येच्या प्रकरणाची न्यायालयीन आणि एसआयटी अशी दुहेरी चौकशी केली जाईल. तर परभणी मधील संपूर्ण घटनेची न्यायालयीन चौकशी केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली.

बीड, परभणी घटनांमधील दोन्ही मृतांच्या कुटुंबियांना दहा लाख रुपयांची आर्थिक मदत केली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. त्यानुसार बीड मध्ये हत्या झालेल्या सरपंच संतोष देशमुख आणि परभणी मधील घटनाक्रमात मृत सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांना ही दहा लाखांची मदत देण्यात येणार आहे.

बीड मधील प्रकरणाची न्यायालयीन व एसआयटी मार्फत चौकशी करण्याबरोबर जिल्हा पोलीस अधिक्षकांची बदली करण्यात येईल. या प्रकरणातील दोषींवर मकोका अंतर्गत कारवाई करून बीड जिल्ह्यातील भूमाफिया, वाळूमाफियांसह इतर प्रकारच्या गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढू, अशी स्पष्ट भूमिकाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विधानसभेत मांडली. परभणीत पोलीस अधिकारी अशोक घोरबांड यांना निलंबित करून त्यांनी वाजवी पेक्षा अधिक पो–लीस बळाचा वापर केला आहे काय, याची चौकशी केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

बीड, परभणी येथील घटनेसंदर्भात विधानसभेत झालेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, परभणी जिल्ह्यातील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. भारताच्या संविधानाचा अपमान हा सर्व भारतीयांचा अपमान आहे. त्यामुळे हा अपमान सहन केला जाणार नाही. परभणी येथील कृत्य एका मनोरूग्णाने केले आहे. तो मनोरुग्ण असल्याचा स्पष्ट वैद्यकीय अहवालही उपलब्ध आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत सर्व राजकीय पक्षांनी तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे. या प्रकरणात कोंबिंग ऑपरेशन झाले नाही. परभणीत सकल हिंदू समाजाचा मोर्चा हा सर्वपक्षीय होता. या मोर्चात बांग्लादेशमधील हिंदूसंदर्भात मागणी करण्यात आली होती. त्यामुळे ही हिंदू विरूद्ध दलित अशी दंगल नाही.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपमानाचे पाप लपवण्यासाठी भाजपकडून फेक नॅरेटीव्ह पसरवण्याचा प्रयत्न": नाना पटोले




जनप्रवास । प्रतिनिधी

नागपूर – लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसदेच्या प्रवेशद्वारावर धक्काबुक्की केल्याचा कोणताही व्हिडिओ नाही. गृहमंत्री अमित शाह यांनी राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याने देशभरात संताप व्यक्त केला जात आहे. भाजपाच्या पोटात होते तेच ओठावर आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल भाजपाच्या मनात किती राग आहे ते उघड झाले. अमित शाहांचे हे पाप झाकण्यासाठी भाजपाकडून राहुल गांधी यांच्या विरोधात कुभांड रचून फेक नॅरेटिव्ह पसरवले जात आहे, असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

विधानभवन परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, सत्ताधारी भाजपाने लोकसभेला आखाडा बनवले आहे. सत्ताधारी पक्षाचे लोक संसदेत चर्चा होऊ देत नाहीत. देशाच्या एकतेसाठी काँग्रेस पक्षाचे दोन महत्वाचे नेते शहीद झाले. भाजपाने देश अदानीला विकण्याशिवाय दुसरे काहीही केलेले नाही. सरकार अदानीला वाचवण्यासाठी नौटंकी करत आहे. मोदी अदानींचे काय संबध आहेत ते जगजाहीर आहे. काँग्रेसने अदानी प्रश्नावर चर्चेची मागणी केल्याने सत्ताधारी भाजपाकडून खोट्या कथा रचून राहुल गांधी व काँग्रेस पक्षाला बदनाम केले जात आहे. राहुल गांधी यांना नरेंद्र मोदी किती घाबरतात हे यावरून स्पष्ट होते.

भारत जोडो यात्रेत नक्षलवादी विचाराच्या संघटना होत्या या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानावर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात आली तेंव्हा देवेंद्र फडणवीस हेच गृहमंत्री होते. त्यांच्याकडे अशी काही माहिती होती तर त्याचवेळी त्यांनी कारवाई करायला हवी होती. कारवाई न करणारे फडणवीस अकार्यक्षम गृहमंत्री आहेत असे म्हणायचे का. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, राहुल गांधी व भारत जोडो यात्रेची लोकप्रियता भाजपाला सहन होत नाही म्हणून भाजपाकडून असा अपप्रचार केला जातो.

भाजपाच्या गुंडांनी मुंबई काँग्रेसच्या कार्यालयावर हल्ला केल्याच्या निषेध करण्यासाठी काँग्रेससह महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधान भवन परिसरात जोरदार घोषणाबाजी करत भाजपाच्या गुंडगिरीचा निषेध केला.

□ संपादक – संजय प्रल्हाद भोकरे □ सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे–४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०–२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com